म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.

विषय आ°वा°

दा क्र. २०४७

BVBK-0402041

# बाल अरेबियन नाइट्स्

भाग पहिला



'मुला, नववा पुतळा तो हाच. ह्या स्त्रीसह तूं सुखानें राज्य कर.'   [ पृष्ठ १२४

# बाल अरेबियन नाइट्स्

## भाग पहिला

लेखक
त्र्यंबक पुरुषोत्तम थोरात

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगाव मुंबई

भाग १ व २ एकत्र किंमत २४ रुपये

© केशव भिकाजी ढवळे

पहिली आवृत्ती : १९३३
दुसरी आवृत्ती : १९३८
तिसरी आवृत्ती : १९४३
चौथी आवृत्ती : १९४५
पाचवी आवृत्ती : १९५०
सहावी आवृत्ती : १९५६
सातवी आवृत्ती : १९७६
आठवी आवृत्ती : १९८६

मुंबई वैभव प्रेस, मुंबई ४
यांनी छापलेल्या मूळ प्रतीचे
प्रोसेसिंग शिवराम गावकर
सन शाईन आर्ट
मोहत्ता भवन
वरळी, मुंबई ४०० १८
यांनी केले आहे.

प्रतिरूप मुद्रक
प्रकाश बाळकृष्ण ढवळे
प्रकाश प्रतिरूप
श्रीसमर्थ सदन
गिरगाव, मुंबई ४

प्रकाशक
धनंजय बाळकृष्ण ढवळे
केशव भिकाजी ढवळे
पहिली भटवाडी
गिरगाव, मुंबई ४

# दोन शब्द

संस्कृत वाङ्मयांत ज्याप्रमाणें पंचतंत्र, हितोपदेश, इत्यादि मनोरंजक व बोधप्रद ग्रंथ आहेत, त्याचप्रमाणें अरबी भाषेंतही पुष्कळ मनोरंजक वाङ्मय आहे. त्यापैकीं **अरेबियन नाइट्स्** ह्या ग्रंथास फारच उच्च स्थान प्राप्त झालें आहे. त्याची ख्याति त्या देशांतच नव्हे तर यूरोपखंडांतही पसरून त्या ग्रंथाचें प्रथम फ्रेंच भाषेंत भाषांतर झालें. पुढें त्यानें इंग्रजी भाषेंत प्रवेश केला. होतां होतां त्याची लोकप्रियता इतकी वाढली कीं, हल्लीं युरोपांतील जवळजवळ सर्व भाषांत त्याचीं भाषांतरें झालीं आहेत. मराठींतही कै. कृष्णशास्त्री चिपळूणकर वगैरे थोर विद्वानांनीं ह्या ग्रंथाचें भाषांतर केलें आहे.

ह्या ग्रंथांतील कथा जरी कल्पित आहेत, तरी त्या इतक्या चटकदार व अद्भुतरम्य आहेत कीं, त्या एकदां वाचावयास घेतल्यावर पुऱ्या केल्याशिवाय पुस्तक खालीं ठेवूं नये असें वाटतें. अशा प्रकारचें मनोरंजक वाङ्मय बालवाचकांच्या आटोक्यांत येऊन त्यांना मूळ ग्रंथांतील रसाचा आस्वाद सहज घेतां यावा, या हेतूनें त्यांतील बारा निवडक गोष्टी संदर्भ सुटूं न देतां व रसहानि होऊं न देतां अत्यंत संक्षिप्त करून ह्या पुस्तकांत संग्रहित केल्या आहेत. छपाई, बांधणी, व चित्रें या सर्व दृष्टींनीं पुस्तकाची आकर्षकता वाढविण्याचा प्रयत्न केला आहे.

लेखक

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | राणी शाहजादी | १ |
| २ | मासे धरणारा कोळी | ६ |
| ३ | सज्जन तो सज्जन | ११ |
| ४ | ठेंगणा कुबडा | १६ |
| ५ | अलनास्करचें मनोराज्य | २५ |
| ६ | थट्टेखोर अमीर | ३१ |
| ७ | कामर्लजेमान व बदूरा | ३८ |
| ८ | हरवलेला ताईत | ५८ |
| ९ | आंग्राद व आसाद | ७६ |
| १० | कृतघ्नपणाचें प्रायश्चित्त | ९६ |
| ११ | नववा पुतळा | १०६ |
| १२ | आंब्यानें केलेला अनर्थ | १२५ |

# बाल
# अरेबियन नाइट्स्
## भाग पहिला



'ताई, तुझ्या गोष्टी किती सुरस असतात!
मला सूर्योदयापर्यंत एक तरी गोष्ट सांग.'

ग्रंथालय
2079
बा.वी.

१

# राणी शाहजादी

प्राचीन काळीं पारस देशांत एक महाविख्यात बादशाह होऊन गेला. तो मोठा शूर असून त्याची प्रजा त्यास बापाप्रमाणें मान देत असे. त्याला शाहरियार व शाहजेमान असे दोन सुंदर, पराक्रमी व शाहणे पुत्र होते.

पुष्कळ वर्षें सुखानें राज्य केल्यावर तो बादशाह मरण पावला. तेव्हां वडील पुत्र शाहरियार गादीवर बसला. त्याची आपल्या धाकट्या भावावर अत्यंत प्रीति होती. शहाजेमानही फार विचारी असून त्याची आपल्या वडील भावाच्या ठिकाणीं अतिशय भक्ति होती. त्यामुळें तो त्याची मर्जी राखण्याविषयीं रात्रंदिवस झटत असे. भावाची संतोषवृत्ति पाहून बादशाहाला फार समाधान वाटलें. त्यानें त्याला तार्तरी देशाचें राज्य दिलें व मोठ्या सन्मानानें तिकडे पाठविलें. तेथें गेल्यावर शाहजेमान यानें समरकंद ही आपली राजधानी केली व तो मोठ्या शहाणपणानें राज्य करूं लागला.

सुमारें दहा वर्षें लोटलीं. शाहरियार बादशाहास आपल्या बंधूस भेटण्याची फार उत्कंठा लागली म्हणून त्यानें त्यास

बोलावून आणण्याकरितां आपल्या वजिरास पाठविलें. वजिरानें समरकंद येथें जाऊन आपण आल्याचें शाहजेमान ह्यास कळविलें; तेव्हां तो मोठ्या समारंभानें त्यास सामोरा येऊन भेटला. कुशल प्रश्न झाल्यावर वजिरानें बादशाहाचा प्रेमाचा निरोप त्यास कळविला. शाहजेमान ह्यासही बंधूस भेटण्याची उत्कंठा लागली होतीच. त्यानें आपल्या प्रधानास सर्व कारभार समजावून दिला आणि राज्यकारभार त्याजकडे सोंपवून तो आपल्या बंधूला भेटावयास गेला.

दोघां भावांची भेट झाली. दोघांच्या सुखदुःखाच्या गोष्टी झाल्या. शाहजेमान बरेच दिवस बादशहाच्या घरीं राहिला. तेथें त्यास बादशहाच्या बायकोचें बादशहावर प्रेम नाहीं असें दिसून आलें व तसें त्यानें एके दिवशीं बादशहास सांगितलें.

बादशहाला फार राग आला व त्यानें तात्काळ आपल्या देखत आपल्या राणीच्या मुसक्या बांधविल्या व तिचा तावडतोब शिरच्छेद करण्याचा वजिरास हुकूम केला. वजिरानें तो हुकूम लागलाच अमलांत आणिला. नंतर राजानें आपला असा निश्चय जाहीर केला कीं, 'रोज संध्याकाळीं एका नव्या स्त्रीशीं लग्न करावयाचें व दुसऱ्या दिवशीं सकाळीं तिचें डोकें मारावयाचें, म्हणजे तिच्या हातून वाईट गोष्ट व्हावयाची नाहीं.' नंतर बादशाहानें वजिरास आज्ञा केली कीं, 'दररोज मजकरितां नवी बायको आणून देत जा व दुसरे दिवशीं सकाळीं तिचा वध करीत जा.' ह्या हुकमाप्रमाणें त्या शहरांत नित्य एका कन्येचें बादशाहाशीं संध्याकाळीं लग्न

होऊन सकाळीं तिचा वध होऊं लागला. ह्या क्रूर कृत्यामुळें सर्वत्र हाहाकार उडून सर्वांच्या तोंडून बादशाह व वजीर ह्यांना शिव्याशाप मिळूं लागले.

त्या वजिरास शाहजादी व दिनारजादी अशा दोन कन्या होत्या. दोघीही सुस्वरूप व सद्गुणी होत्या. पण थोरली मोठी बहुश्रुत, विद्वान् व पवित्र आचरणाची होती व तिच्या अंगीं धैर्य, समयसूचकता, चातुर्य, ललितकलानैपुण्य इत्यादि पुष्कळ गुण होते. तिनें शहरांत बादशाहानें चालविलेल्या जुलुमास आळा घालण्याचा निश्चय केला. एके दिवशीं ती आपल्या बापास म्हणाली, 'बाबा, आज मला राणीपदाचा मान मिळेल असें करा.' वजीर तें ऐकून चकित झाला. तो कांहीं केल्या कबूल होईना. तेव्हां ती म्हणाली, 'तुम्ही माझें ऐकत नसल्यास मीच स्वतः जाऊन बादशाहास माझा उद्देश कळवीन.' तें ऐकून वजिरास फार वाईट वाटलें व निरुपाय होऊन त्यानें ती गोष्ट बादशाहास कळविली. बादशाहानें प्रथम त्याला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु मुलीचा हट्ट पाहून त्यानें तिला घेऊन येण्यास मोकळीक दिली.

बादशाहाची परवानगी मिळाल्यामुळें शाहजादीस फार आनंद झाला. 'आपण हें काम परोपकाराकरितां पतकरिलें असल्यामुळें त्यांत जरी अपयश आलें तरी वाईट वाटण्याचें कारण नाहीं.' अशा रीतीनें बोलून तिनें बापाची समजूत केली. नंतर तिनें आपल्या बहिणीस आपल्याजवळ बोलाविलें आणि सांगितलें कीं, "मी राजवाड्यांत गेल्यावर बादशहाला सांगून

तुला निरोप पाठवीन तेव्हां तूं तावडतोब निघून ये. रात्रीं राजवाड्यांतच रहा आणि पहांटेच्या वेळीं मला म्हण कीं, "ताई, दिवस उजाडतांच तूं मरणारच तरी तुला ज्या सुरस व अद्भुत गोष्टी येत आहेत त्यांतली एक गोष्ट मला सूर्योदयापर्यंत सांग. तुझ्या तोंडची शेवटची गोष्ट तरी मला ऐकूं दे." असें आपल्या बहिणीला सांगून ती ठरल्याप्रमाणें राजवाड्यांत गेली. बादशहा तिचें अप्रतिम लावण्य पाहून फार खूष झाला इतक्यांत शहाजादीनें डोळ्यांत आंसवें आणून बादशहाला विनंती केली कीं, "महाराज, माझी बहीण मजवर अत्यंत प्रीति करते. तेव्हां तिला जर आज राजवाड्यांत आणण्याची परवानगी द्याल तर सकाळीं आम्हांला शेवटची प्रेमाची भेट तरी घेतां येईल!"

बादशहानें हें तिचें म्हणणें कबूल केलें व ठरल्याप्रमाणें दिनारजादी राजवाड्यांत बहिणीकडे गेली.

पहांटे दोन घटका रात्रीस दिनारजादी शहाजादीला म्हणाली, "ताई, आतां तूं दोन घटकांचीच सोबतीण आहेस तुझ्या गोष्टी किती सुरस असतात त्यांची मला आठवण येते. तेव्हां मला सूर्योदयापर्यंत एकतरी गोष्ट सांग."

शहाजादीनें तसें करण्याविषयीं बादशहाची परवानगी घेतली आणि ती गोष्ट सांगूं लागली. होतां होतां उजाडलें तेव्हां ती एकदम थांबली. बादशहा ती गोष्ट ऐकत होताच. त्यालाही ती गोष्ट फार आवडली. पण गोष्ट अर्धवटच राहिली होती. तेव्हां बादशहानें त्या दिवशीं तिला मारण्याचें रहित

ळें. दरबारांत आल्यावर त्यानें नेहमींप्रमाणें बायकोस ारण्याचा हुकूम केला नाहीं. त्यामुळें वजिरास आनंद झाला.

दुसरे दिवशीं पहांटेस पुनः दिनारजादीनें गोष्ट पुढें ांगण्याची बहिणीस विनंति केली. बादशाहानेंही आज्ञा केली. ाप्रमाणें दररोज क्रम चालू लागला. शाहाजादीच्या गोष्टी ऐकण्याचा बादशाहास फार नाद लागला व तिचा वध करण्याचा विचार तो पुढें पुढें ढकलूं लागला.

अशा रीतीनें एक हजार एक रात्रीं राणी शाहजादीनें ादशाहास नित्य नव्या व मनोरंजक गोष्टी सांगून बहुत ातुष्ट केलें. त्याला तिच्या अंगचें लोकोत्तर धैर्य, अद्भुत मरणशक्ति, चातुर्य व इतर अलौकिक गुण पाहून फार आनंद ााला. त्याच्या अंतःकरणांत दया उत्पन्न होऊन तो तिला ामानें म्हणाला, 'तुझ्या गुणांनीं माझा कोप शांत झाला. ू माझ्या पूर्ण खात्रीस उतरलीस. मी माझा पूर्वीचा नियम द्द करून तुलाच आपली जन्माची सोबतीण केली आहे.' ा कृपेबद्दल शाहजादीनें बादशाहाच्या पायांवर डोकें ठेवून ापली कृतज्ञता दर्शविली.

पुढें बादशाहानें दरबारांत वजिरास सर्व गोष्ट सांगितली, ेव्हां त्याला व सर्व शहरवासीयांना अतिशय आनंद झाला, त्यांनीं शाहजादीला फार धन्यवाद दिले.

शाहजादीनें सांगितलेल्या अद्भुत गोष्टींपैकीं कांहीं गोष्टी ुढें दिल्या आहेत.

२

## मासे धरणारा कोळी

प्राचीनकाळीं एका समुद्रकांठच्या गांवीं एक कोळी राहत असे. तो फार दरिद्री होता तरी स्वभावानें सालस असून अल्पसंतुष्ट होता. मासे पकडण्याकरितां दररोज फक्त चारच वेळां जाळें टाकावयाचें असा त्याचा नेम होता.

एके दिवशीं त्यानें तीन वेळां जाळें टाकिलें; परंतु त्यास एकही मासा मिळाला नाहीं. त्यामुळें त्यास फार वाईट वाटलें. शेवटीं देवाची प्रार्थना करून चौथ्या खेपेस त्यानें जाळें टाकिलें, व कांहीं वेळानें वर ओढिलें तों त्यांतून एक मोठें पितळेचें भांडें वर आलें. त्याच्या तोंडावर शिशाचा पत्रा बसविलेला होता. तेव्हां कोळ्याला वाटलें, त्यांत कांहीं द्रव्य असलें पाहिजे. म्हणून त्यानें तो पत्रा हळूच काढला. तों त्यांतून धुराचा लोट निघूं लागला !

होतां होतां सर्व धूर बाहेर पडून त्यापासून एक मोठा थोरला भयंकर राक्षस उत्पन्न झाला. आणि तो कोळ्यास म्हणाला, 'मी तुझा प्राण घेतल्याशिवाय सोडीत नाहीं.'

कोळी म्हणाला, 'मी तुला सोडविलें त्याबद्दल मला हें बक्षीस काय ?' राक्षस म्हणाला, 'होय; मला माझी प्रतिज्ञा पुरी केलीच पाहिजे !' कोळी म्हणाला, 'तुला कशाबद्दल आणि कोणती प्रतिज्ञा करावी लागली ?'

राक्षस म्हणाला, "पूर्वी देव आणि राक्षस यांच्यामध्यें मोठें युद्ध झालें. त्या वेळीं सुलेमान राजानें देवांच्या तर्फे लढून आम्हां राक्षसांचा पराभव केला व त्याच्या वजिरानें मला पकडून राजापुढें उभें केलें. राजा मला शरण येण्यास सांगूं लागला. परंतु मी धीटपणानें उत्तर केलें, 'मी तुझें ऐकत नाहीं. तुला काय करावयाचें असेल तें कर.' तेव्हां मला शासन करण्याकरितां राजानें मला ह्या पितळेच्या भांड्यांत कोंबलें आणि वर पत्रा बसवून व त्यावर आपली मुद्रा ठोकून मला समुद्रांत बुडविलें ! त्या वेळीं मी स्वतःशीं निश्चय केला कीं, 'जो कोणी मला शंभर वर्षांचे आंत या भांड्यांतून बाहेर काढील त्याला मी मोठा श्रीमंत करीन.' परंतु शंभर वर्षें होऊन गेलीं. तरी मला कोणी बाहेर काढिलें नाहीं. नंतर मीं पुनः प्रतिज्ञा केली कीं, 'आतां पुढल्या शंभर वर्षांत जो मला खुला करील त्याला मी पृथ्वींतलें गुप्त धन देईन.' पण तीही शंभर वर्षें अशींच निघून गेलीं. नंतर मीं तिसऱ्यानें प्रतिज्ञा केली कीं, 'या शंभर वर्षांत मला जो कोणी सोडवील त्याला मी राजा करीन.' पण याही शतकांत माझ्या कोणी उपयोगी पडला नाहीं. तेव्हां शेवटीं मी संतापानें अशी शपथ वाहिली

कीं, ' इतःपर जर मला कोणी सोडविलें तर त्याचा मी तावडतोब प्राण घेईन.' त्याप्रमाणें आज तूं मला सोडविलेंस म्हणून आतां मी तुझा प्राण घेणार!"

कोळ्यानें आपल्यावर द्या करण्याविषयीं राक्षसाची पुष्कळ काकळूत केली परंतु व्यर्थ. राक्षस आपला हट्ट सोडीना. शेवटीं सुदैवानें कोळ्याला एक युक्ति सुचली. तो म्हणाला, ' तूं मला मारणार तर खरा. पण त्यापूर्वी मी तुला एक शंका विचारतों तिचें खरें उत्तर दे. तुला ईश्वराची शपथ आहे.' राक्षस म्हणाला, ' विचार. झटपट विचार.' कोळी म्हणाला, ' तूं ह्याच भांड्यांत होतास ही गोष्ट खरी काय?' राक्षस म्हणाला, ' होय.' कोळी म्हणाला, ' तुझा एवढा प्रचंड देह ह्या भांड्यांत मावणार कसा? मला प्रत्यक्ष दाखविल्याशिवाय ही गोष्ट मुळींच खरी वाटणार नाहीं.' राक्षसाच्या लक्षांत कोळ्याची हिकमत न आल्यामुळें तो म्हणाला, ' अरे, हा पाहा प्रत्यक्ष राहून दाखवितों.'

लगेच राक्षसाच्या अंगाचा धूर होऊं लागून तो भांड्यांत शिरत आहे असें कोळ्याच्या दृष्टीस पडलें. थोड्याच वेळांत सर्व धूर भांड्यांत शिरल्यावर त्यांतून आवाज निघाला, ' अरे अविश्वासू कोळ्या, आतां तरी तुला ही गोष्ट खरी वाटेल ना?' कोळ्यानें चपळाई करून तो शिशाचा पत्रा तावडतोब त्या भांड्यावर घट्ट बसविला, आणि म्हणाला, ' अरे लुच्चा, खरें, रे खरें! आतां तुला पुनः समुद्रांत फेंकून देतों आणि

सर्व कोळ्यांना वर्दी देऊन ठेवतों म्हणजे माझ्यासारखे ते फसणार नाहींत.'

राक्षसानें तसें न करण्याविषयीं व आपली पुनः सुटका करण्याविषयीं कोळ्याची फार विनवणी केली. तो अगदीं गरीब झाला. शेवटीं म्हणाला, 'मी शपथ घेऊन सांगतों, तूं मला सोड. मी तुला मारणार तर नाहींच पण तुझें जन्माचें दारिद्र्य दूर करीन.'

द्रव्याचें नांव ऐकतांच कोळ्याचें मन फिरलें. तथापि त्यानें त्याच्याकडून ईश्वराची शपथ घेवविली आणि नंतर भांड्याचें झांकण काढलें. ताबडतोब धुराच्या रूपानें तो राक्षस बाहेर आला व पूर्वीचें रूप घेऊन कोळ्यापुढें उभा राहिला. त्यानें तें भांडें लाथेनें समुद्रांत उडवून दिलें तेव्हां कोळी घाबरला. तथापि राक्षसानें त्यास धीर देऊन आपल्याबरोबर चलण्यास सांगितलें.

कोळ्यानें आपलीं जाळीं गोळा केलीं आणि तो राक्षसाच्या बरोबर निघाला. बरेच दूर गेल्यावर ते एका डोंगराच्या माथ्यावरून पलीकडील मैदानांत गेले. तेथें कांहीं अंतरावर एक तलाव लागला. त्यांत पांढरे, तांबडे, निळे व पिंवळे असे चार रंगांचे मासे होते. ते पाहून कोळ्यास मोठें नवल वाटलें. त्यानें आपलें जाळें तळ्यांत टाकलें व थोड्या वेळानें बाहेर काढलें तों त्यांत चार रंगांचे चार मासे सांपडले. तेव्हां राक्षस म्हणाला, 'मित्रा, हे मासे तूं

तुला निरोप पाठवीन तेव्हां तूं तावडतोब निघून ये. रात्रीं राजवाड्यांतच रहा आणि पहांटेच्या वेळीं मला म्हण कीं, "ताई, दिवस उजाडतांच तूं मरणारच तरी तुला ज्या सुरस व अद्भुत गोष्टी येत आहेत त्यांतली एक गोष्ट मला सूर्योदयापर्यंत सांग. तुझ्या तोंडची शेवटची गोष्ट तरी मला ऐकूं दे." असें आपल्या बहिणीला सांगून ती ठरल्याप्रमाणें राजवाड्यांत गेली. बादशहा तिचें अप्रतिम लावण्य पाहून फार खुष झाला इतक्यांत शहाजादीनें डोळ्यांत आंसवें आणून बादशहाला विनंती केली कीं, "महाराज, माझी बहीण मजवर अत्यंत प्रीति करते. तेव्हां तिला जर आज राजवाड्यांत आणण्याची परवानगी द्याल तर सकाळीं आम्हांला शेवटची प्रेमाची भेट तरी घेतां येईल!"

बादशहानें हें तिचें म्हणणें कबूल केलें व ठरल्याप्रमाणें दिनारजादी राजवाड्यांत बहिणीकडे गेली.

पहांटे दोन घटका रात्रीस दिनारजादी शहाजादीला म्हणाली, "ताई, आतां तूं दोन घटकांचीच सोबतीण आहेस तुझ्या गोष्टी किती सुरस असतात त्यांची मला आठवण येते. तेव्हां मला सूर्योदयापर्यंत एकतरी गोष्ट सांग."

शहाजादीनें तसें करण्याविषयीं बादशहाची परवानगी घेतली आणि ती गोष्ट सांगूं लागली. होतां होतां उजाडलें तेव्हां ती एकदम थांबली. बादशहा ती गोष्ट ऐकत होताच. त्यालाही ती गोष्ट फार आवडली. पण गोष्ट अर्धवटच राहिली होती. तेव्हां बादशहानें त्या दिवशीं तिला मारण्याचें रहित

केलें. दरबारांत आल्यावर त्यानें नेहमींप्रमाणें बायकोस मारण्याचा हुकूम केला नाहीं. त्यामुळें वजिरास आनंद झाला.

दुसरे दिवशीं पहांटेस पुनः दिनारजादीनें गोष्ट पुढें सांगण्याची बहिणीस विनंति केली. बादशाहानेंही आज्ञा केली. याप्रमाणें दररोज क्रम चालू लागला. शाहाजादीच्या गोष्टी ऐकण्याचा बादशाहास फार नाद लागला व तिचा वध करण्याचा विचार तो पुढें पुढें ढकलूं लागला.

अशा रीतीनें एक हजार एक रात्रीं राणी शाहजादीनें बादशाहास नित्य नव्या व मनोरंजक गोष्टी सांगून बहुत संतुष्ट केलें. त्याला तिच्या अंगचें लोकोत्तर धैर्य, अद्भुत स्मरणशक्ति, चातुर्य व इतर अलौकिक गुण पाहून फार आनंद झाला. त्याच्या अंतःकरणांत दया उत्पन्न होऊन तो तिला प्रेमानें म्हणाला, 'तुझ्या गुणांनीं माझा कोप शांत झाला. तूं माझ्या पूर्ण खात्रीस उतरलीस. मी माझा पूर्वींचा नियम रद्द करून तुलाच आपली जन्माची सोबतीण केली आहे.' या कृपेबद्दल शाहजादीनें बादशाहाच्या पायांवर डोकें ठेवून आपली कृतज्ञता दर्शविली.

पुढें बादशाहानें दरबारांत वजिरास सर्व गोष्ट सांगितली, तेव्हां त्याला व सर्व शहरवासीयांना अतिशय आनंद झाला, व त्यांनीं शाहजादीला फार धन्यवाद दिले.

शाहजादीनें सांगितलेल्या अद्भुत गोष्टींपैकीं कांहीं गोष्टी पुढें दिल्या आहेत.

२

# मासे धरणारा कोळी

प्राचीनकाळीं एका समुद्रकांठच्या गांवीं एक कोळी राहत असे. तो फार दरिद्री होता तरी स्वभावानें सालस असून अल्पसंतुष्ट होता. मासे पकडण्याकरितां दररोज फक्त चारच वेळां जाळें टाकावयाचें असा त्याचा नेम होता.

एके दिवशीं त्यानें तीन वेळां जाळें टाकिलें; परंतु त्यास एकही मासा मिळाला नाहीं. त्यामुळें त्यास फार वाईट वाटलें. शेवटीं देवाची प्रार्थना करून चौथ्या खेपेस त्यानें जाळें टाकिलें, व कांहीं वेळानें वर ओढिलें तों त्यांतून एक मोठें पितळेचें भांडें वर आलें. त्याच्या तोंडावर शिशाचा पत्रा बसविलेला होता. तेव्हां कोळ्याला वाटलें, त्यांत कांहीं द्रव्य असलें पाहिजे. म्हणून त्यानें तो पत्रा हळूच काढला. तों त्यांतून धुराचा लोट निघूं लागला !

होतां होतां सर्व धूर बाहेर पडून त्यापासून एक मोठा थोरला भयंकर राक्षस उत्पन्न झाला. आणि तो कोळ्यास म्हणाला, ‘ मी तुझा प्राण घेतल्याशिवाय सोडीत नाहीं. ’

कोळी म्हणाला, 'मी तुला सोडविलें त्याबद्दल मला हें बक्षीस काय ?' राक्षस म्हणाला, 'होय; मला माझी प्रतिज्ञा पुरी केलीच पाहिजे !' कोळी म्हणाला, 'तुला कशाबद्दल आणि कोणती प्रतिज्ञा करावी लागली ?'

राक्षस म्हणाला, "पूर्वी देव आणि राक्षस यांच्यामध्यें मोठें युद्ध झालें. त्या वेळीं सुलेमान राजानें देवांच्या तर्फे लढून आम्हां राक्षसांचा पराभव केला व त्याच्या वजिरानें मला पकडून राजापुढें उभें केलें. राजा मला शरण येण्यास सांगूं लागला. परंतु मी धीटपणानें उत्तर केलें, 'मी तुझें ऐकत नाहीं. तुला काय करावयाचें असेल तें कर.' तेव्हां मला शासन करण्याकरितां राजानें मला ह्या पितळेच्या भांड्यांत कोंबलें आणि वर पत्रा बसवून व त्यावर आपली मुद्रा ठोकून मला समुद्रांत बुडविलें ! त्या वेळीं मी स्वतःशीं निश्चय केला कीं, 'जो कोणी मला शंभर वर्षांचे आंत या भांड्यांतून बाहेर काढील त्याला मी मोठा श्रीमंत करीन.' परंतु शंभर वर्षें होऊन गेलीं. तरी मला कोणी बाहेर काढिलें नाहीं. नंतर मीं पुनः प्रतिज्ञा केली कीं, 'आतां पुढल्या शंभर वर्षांत जो मला खुला करील त्याला मी पृथ्वींतलें गुप्त धन देईन.' पण तीहीं शंभर वर्षें अशींच निघून गेलीं. नंतर मीं तिसऱ्यानें प्रतिज्ञा केली कीं, 'या शंभर वर्षांत मला जो कोणी सोडवील त्याला मी राजा करीन.' पण याही शतकांत माझ्या कोणी उपयोगी पडला नाहीं. तेव्हां शेवटीं मी संतापानें अशी शपथ वाहिली

कीं, 'इतःपर जर मला कोणी सोडविलें तर त्याचा मी तावडतोब प्राण घेईन.' त्याप्रमाणें आज तूं मला सोडविलेंस म्हणून आतां मी तुझा प्राण घेणार!"

कोळ्यानें आपल्यावर दया करण्याविषयीं राक्षसाची पुष्कळ काकळूत केली परंतु व्यर्थ. राक्षस आपला हट्ट सोडीना. शेवटीं सुदैवानें कोळ्याला एक युक्ति सुचली. तो म्हणाला, 'तूं मला मारणार तर खरा. पण त्यापूर्वी मी तुला एक शंका विचारतों तिचें खरें उत्तर दे. तुला ईश्वराची शपथ आहे.' राक्षस म्हणाला, 'विचार. झटपट विचार.' कोळी म्हणाला, 'तूं ह्याच भांड्यांत होतास ही गोष्ट खरी काय?' राक्षस म्हणाला, 'होय.' कोळी म्हणाला, 'तुझा एवढा प्रचंड देह ह्या भांड्यांत मावणार कसा? मला प्रत्यक्ष दाखविल्याशिवाय ही गोष्ट मुळींच खरी वाटणार नाहीं.' राक्षसाच्या लक्षांत कोळ्याची हिकमत न आल्यामुळें तो म्हणाला, 'अरे, हा पाहा प्रत्यक्ष राहून दाखवितों.'

लगेच राक्षसाच्या अंगाचा धूर होऊं लागून तो भांड्यांत शिरत आहे असें कोळ्याच्या दृष्टीस पडलें. थोड्याच वेळांत सर्व धूर भांड्यांत शिरल्यावर त्यांतून आवाज निघाला, 'अरे अविश्वासू कोळ्या, आतां तरी तुला ही गोष्ट खरी वाटेल ना?' कोळ्यानें चपळाई करून तो शिशाचा पत्रा तावडतोब त्या भांड्यावर घट्ट बसविला, आणि म्हणाला, 'अरे लुच्चा, खरें, रे खरें! आतां तुला पुनः समुद्रांत फेंकून देतों आणि


सर्व कोळ्यांना वर्दी देऊन ठेवतों म्हणजे माझ्यासारखे ते फसणार नाहींत.'

राक्षसानें तसें न करण्याविषयीं व आपली पुनः सुटका करण्याविषयीं कोळ्याची फार विनवणी केली. तो अगदीं गरीब झाला. शेवटीं म्हणाला, 'मी शपथ घेऊन सांगतों, तूं मला सोड. मी तुला मारणार तर नाहींच पण तुझें जन्माचें दारिद्र्य दूर करीन.'

द्रव्याचें नांव ऐकतांच कोळ्याचें मन फिरलें. तथापि त्यानें त्याच्याकडून ईश्वराची शपथ घेवविली आणि नंतर भांड्याचें झांकण काढलें. ताबडतोब धुराच्या रूपानें तो राक्षस बाहेर आला व पूर्वीचें रूप घेऊन कोळ्यापुढें उभा राहिला. त्यानें तें भांडें लाथेनें समुद्रांत उडवून दिलें तेव्हां कोळी घाबरला. तथापि राक्षसानें त्यास धीर देऊन आपल्याबरोबर चलण्यास सांगितलें.

कोळ्यानें आपलीं जाळीं गोळा केलीं आणि तो राक्षसाच्या बरोबर निघाला. बरेच दूर गेल्यावर ते एका डोंगराच्या माथ्यावरून पलीकडील मैदानांत गेले. तेथें कांहीं अंतरावर एक तलाव लागला. त्यांत पांढरे, तांबडे, निळे व पिवळे असे चार रंगांचे मासे होते. ते पाहून कोळ्यास मोठें नवल वाटलें. त्यानें आपलें जाळें तळ्यांत टाकलें व थोड्या वेळानें बाहेर काढलें तों त्यांत चार रंगांचे चार मासे सांपडले. तेव्हां राक्षस म्हणाला, 'मित्रा, हे मासे तूं

राजाकडे नेऊन त्याला नजर कर, म्हणजे तो तुला चांगलें बक्षीस देईल. तसेंच, तुला पाहिजे तर दररोज येथें येऊन मासे धरीत जा. मात्र एका दिवशीं एकदांच जाळें टाकायाचें असा नियम ठेव. तो मोडलास तर पश्चात्ताप पावशील.' इतकें बोलून त्यानें जमिनीवर लाथ मारिली. त्याबरोबर ती दुभंग होऊन राक्षस तींत गडप झाला व जमीन पूर्ववत् झाली.



म. सं. मं. ठाणे, वाचनालय
क्र. 2081 दिनांक
विषय

३

# सज्जन तो सज्जन

एका गांवांत दोन मनुष्य शेजारीं शेजारीं राहत असत. त्यांपैकीं एक फारच दुष्ट होता. तो आपल्या शेजाऱ्याचा पराकाष्ठेचा द्वेष करीत असे. दुसरा मनुष्य फार सज्जन होता. त्या दुष्ट मनुष्यानें स्नेहानें वागावें म्हणून त्यानें त्याच्यावर पुष्कळ उपकार केले होते. परंतु ते सर्व व्यर्थ गेले. शेवटीं आपण दूर राहिल्यानें कदाचित् ह्याचा द्वेष जाईल असें वाटून तो सज्जन मनुष्य, आपली सर्व जिंदगी व चीजवस्त विकून टाकून तेथून कांहीं कोसांवर असलेल्या राजधानीच्या नगरांत राहावयास गेला. तेथें त्यानें एक सोईवार घर विकत घेतलें. त्याला एक मोठें आंगण असून त्यांत एक जुनाट व बिनवापरती विहीर होती. तेथें तो सज्जन पुरुष विरक्तवृत्तीनें राहूं लागला. त्याचा थोरपणा पाहून पुष्कळ लोक त्याचे शिष्य झाले. अशा रीतीनें त्याच्या घराला महंताच्या मठाचें स्वरूप आलें. त्याच्या साधुपणाची कीर्ति हळुहळू चोहोंकडे पसरूं लागली, त्यामुळें नित्य त्याच्या दर्शनासाठीं लोक येऊं लागले. दूरदूरच्या

गांवांहूनही लोक त्याच्याकडे येत असत. ते आपलें संकट दूर होण्यासाठीं त्याच्याकडून देवाची प्रार्थना करवीत व बरें वाटलें म्हणजे त्याची कीर्ति गात गांवीं जात.

अशा रीतीनें त्याची कीर्ति त्याच्या मूळच्या गांवीं त्या दुष्ट शेजाऱ्याच्या कानीं गेली, तेव्हां त्याचा द्वेष पुनः जागा होऊन त्याला चैन पडूं देईना. तो आपला उद्योग सोडून त्या नगरास गेला आणि त्या साधूकडेच उतरला. त्या सज्जन पुरुषानें त्याला ओळखलें, तथापि त्यानें त्याचा पराकाष्ठेचा सत्कार केला. संध्याकाळ झाल्यावर तो दुष्ट मनुष्य म्हणाला, 'मला तुमच्याशीं एकांतांत कांहीं बोलावयाचें आहे. तेव्हां ह्या तुमच्या शिष्यांना जरा बाजूस होण्यास सांगा. आपण आंगणांत फिरत फिरत बोलूं.' साधूनें त्याप्रमाणें व्यवस्था केली व ते आंगणांत फिरत बोलूं लागले. फिरतां फिरतां त्या दुष्टानें त्या साधूला विहिरीच्या अगदीं कांठावर आणिलें आणि चटकन आंत ढकलून दिलें. असें घोर कृत्य करून तो तेथून झपाट्यानें निघाला व कोणाला न दिसतां मठाच्या वेशींतून बाहेर पडला, आणि तडक आपल्या घरीं जाऊन पोहोंचला. आपला दुष्ट हेतु सिद्धीस गेला ह्याबद्दल त्याला मोठा आनंद झाला. परंतु सज्जनांचा वाली ईश्वर असतो, हें त्या अधमास काय माहीत ?

ती विहीर फार जुनाट असल्यामुळें त्यांत यक्ष व यक्षिणी राहात होत्या. त्यांनीं त्या सज्जन पुरुषाला अलगज झेलून विहिरीच्या तळाशीं नेलें, त्यामुळें त्यास इजा झाली नाहीं.

ही ईश्वरी कृपाच होय असें तो साधु मनांत म्हणत आहे, तोंच त्याच्या कानीं पुढील संभाषण आलें. कोणी एक दुसऱ्यास म्हणतो, 'ज्या मनुष्यास आपण मृत्यूपासून वांचविलें तो कोण आहे असें तुला वाटतें ? तो एक मोठा सत्पुरुष आहे. त्याच्या गांवीं एक दुर्जन त्याचा द्वेष करूं लागला म्हणून तो ह्या गांवीं येऊन राहिला. परंतु येथेंही त्याची कीर्ति झालेली न साहून तो दुष्ट येथें आला व त्यानें ह्याला विहिरींत ढकलून दिलें. आपण साह्य केलें नसतें तर हा बिचारा मेला असता. ह्याच्या साधुत्वाची कीर्ति ऐकून ह्या देशचा राजा आपल्या दुखणेकरी मुलीला ह्याच्याकडे घेऊन येणार आहे. तिच्या सुंदर रूपास भुलून एक राक्षस तिला छळीत असतो. परंतु ह्या महंतापाशीं त्यावर उपाय आहे. ह्याच्या मठांत एक काळें मांजर आहे. त्याच्या शेंपटीचा गोंडा पांढरा आहे. त्याचे ात केंस विस्तवावर जाळून त्यांची धुरी देतांक्षणींच तो राक्षस ताबडतोब तिला सोडून जाईल व पुनः म्हणून तिचें नांव घेणार नाहीं.'

हें सर्व संभाषण त्या महंतानें ऐकिलें. नंतर उजाडल्यावर वर चढण्याचा मार्ग शोधून मोठ्या कष्टानें तो वर चढून आला. शिष्यमंडळी त्याचा तपास करीतच होती. त्यांना त्यास पाहून फार आनंद झाला. तो मठांत आल्यावर त्याचें आवडतें काळें मांजर त्याच्या मांडीवर येऊन बसलें. तेव्हां त्यानें त्याच्या शेपटीच्या टोंकाचे सात पांढरे केस काढून त्यांची एक पुडी करून ठेविली.

सुमारें दोन घटकांनंतर राजाची स्वारी मठांत येत असल्याची शिष्यांनीं वर्दी दिली. राजा आल्यावर त्याचा यथायोग्य आदरसत्कार करण्यांत आला. नंतर राजा म्हणाला, ‘माझ्या मुलीची प्रकृती बरी नाहीं म्हणून कांहीं उपाय विचारण्याकरितां मी आलों आहें. मला खचित वाटतें कीं, आपण माझ्या मुलीकरितां देवापाशीं प्रार्थना केली असतां तिला गुण येईल.’ महंत म्हणाला, ‘सरकार, आपल्या कन्येस येथें आणविली असतां ईश्वराच्या कृपेनें मी तिला चांगली बरी करीन.’ तावडतोब राजानें राजकन्येस मठांत आणविलें. तेव्हां महंतानें तिच्यापुढें निखारे ठेवून त्यांवर ते मांजराचे केस टाकिले, त्यांचा धूर डोळ्यांस लागल्याबरोबर राजकन्येनें मोठ्यानें आरोळी मारली व ती निश्चेष्ट पडली. तो राक्षस तिच्या अंगांतून निघून गेला. थोड्याच वेळांत ती सावध झाली व चटकन उठून ‘मी कोठें आहें? मला येथें कां आणिलें?’ वगैरे प्रश्न विचारूं लागली. राजानें तिला पोटाशीं धरून सर्व हकीकत सांगितली तेव्हां तिला महंताविषयीं फार पूज्यबुद्धि वाटूं लागली. नंतर राजानें महंताच्या उपकारांतून उतराई होण्याकरितां सर्व सरदारांच्या अनुमतीनें त्याच्याशीं आपल्या कन्येचा मोठ्या थाटानें विवाह केला व त्यासच आपला वजीर नेमिलें. कांहीं वर्षांनीं राजा स्वतः निपुत्रिक मरण पावला, तेव्हां सर्व प्रजाजनांनीं वजिरास एकमतानें आपला राजा नेमिलें.

हा सज्जन पुरुष राजा झाल्यावर, एके दिवशीं सर्व सरदारांसह स्वारीवर निघाला असतां त्याच्या मूळ गांवावरून स्वारी चालली. तेव्हां ती पाहण्याकरितां रस्त्याच्या दुतर्फा लोक उभे होते. त्यांमध्यें त्याचा द्वेष करणारा तो दुर्जन मनुष्यही होता. राजानें त्याला ओळखून एका कामदाराकडून त्यास बोलावून आणविलें व विचारिलें, ' कां मित्रा, बरा आहेस ना ? आज पुष्कळ दिवसांनीं आपली भेट झाली. ' नंतर त्यानें आपल्या खासगी जामदारखान्यांतून एक हजार मोहरा त्यास देण्याविषयीं हुकूम केला व स्वारी पुढें निघाली. अपकार करणाऱ्यांवरही जे उपकार करतात तेच खरे सज्जन होत !



## ४

# ठेंगणा कुबडा

तार्तरी देशांत काशगर म्हणून एक शहर आहे. त्या शहरांत एकदां एक शिंप्याचें जोडपें राहत असे. त्यांचें परस्परांवर फार प्रेम होतें. एके दिवशीं शिंपी दुकानांत असतां तेथें एक मुसलमान आला. तो अगदीं ठेंगू व कुबडा होता. त्यानें सारंगीवर एक गाणें गाइलें. तें शिंप्यास फार आवडलें व रात्रीं आपल्या बायकोचेंही मनोरंजन व्हावें ह्या हेतूनें त्यानें त्यास संध्याकाळीं आपल्या घरीं जेवावयास बोलाविलें. संध्याकाळ होतांच शिंपी दुकान बंद करून कुबड्यास घेऊन घरीं गेला. त्याच्या बायकोनें त्याच्या सांगण्यावरून तीन ताटें वाढून तयार केलीं व तीं तिघें जेवावयास बसलीं. जेवण चालू असतां त्या कुबड्याच्या घशांत माशाचें एक मोठें हाडूक अडकलें आणि लागलीच डोळे पांढरे करून तो मेल्यासारखा पडला. तें पाहून तीं दोघें नवराबायको फार घाबरून गेलीं. त्यांना असा धाक पडला कीं, कोतवालाच्या कानावर ही हकीकत गेल्यास आपणांस शिक्षा भोगावी लागेल. तेव्हां

ह्यांतून सुटण्यास काय युक्ति करावी? असा विचार करीत असतां त्यांस एक युक्ति सुचली.

त्यांच्याच आळींत एक यहुदी वैद्य राहत होता. त्याच्या घरीं त्यांनीं त्या कुबड्यास उचलून नेलें. दारावर थाप मारतांच वैद्याच्या दासीनें दार उघडलें, तेव्हां शिंपी तिला म्हणाला, 'वैद्यराजांना सांग कीं, आम्ही एक रोगी आणला आहे, त्याची प्रकृति तपासा. आम्ही आपली मेहनत फुकट घेत नाहीं.' असें म्हणून शिंप्यानें एक रुपया दासीस देऊन तो वैद्यास देण्यास सांगितलें. दासी निरोप सांगण्यास जातांच ह्या दोघांनीं तो मुडदा तसाच जिन्याशीं उभा ठेवून तीं गुपचूप घरीं निघून आलीं.

इकडे दासीनें तो निरोप वैद्यास सांगून रुपया दिला. त्याबरोबर वैद्य खूष झाला व दासीस दिवा आणण्यास सांगून घाईनें अंधारांतच जिन्यावरून उतरूं लागला. परंतु त्याचा धक्का त्या मुडद्यास लागून तो गडगडत खालीं पडला. नंतर वैद्यानें दिवा आणून पाहिलें, तों रोगी मरून गेला आहे. तेव्हां त्याला मोठी भीति वाटली. ह्याच्या खुनाचा आरोप आपणावर येईल, तेव्हां आतां काय करावें असा त्यास विचार पडला. शेवटीं त्यानें दार बंद करून तो मुडदा वर नेला व आपल्या बायकोला सर्व हकीकत सांगितली. बराच विचार केल्यावर तिला युक्ति सुचली व ती त्यांनीं लगेच अमलांत आणली. त्यांच्या शेजारीं एका मुसलमान वाण्याचें दुकान होतें. या वेळीं तो वाणी दुकान

बंद करून बाहेर गेला होता. तेव्हां त्या दोघांनीं त्या कुबड्याच्या काखेंत दोऱ्या अडकवून त्याला त्या वाण्याच्या घराच्या धुरांड्यांतून अलग खालीं सोडला व भिंतीशीं उभा करून ठेविला आणि दोऱ्या हळूच काढून घेतल्या. नंतर तीं गुपचूप घरांत येऊन बसलीं.

थोड्या वेळानें तो वाणी जेवून घरीं आला. त्याच्या हातांत कंदील होता तो घेऊन तो कोठी उघडून आंत गेला; तोंच भिंतीशीं उभा असलेला कुबडा त्याच्या दृष्टीस पडला. त्याला तो चोर आहे असें वाटून त्यानें आपल्या सोट्यानें त्याला यथास्थित चोपून काढलें. पुढें तो चोर जमिनीवर आडवा पडला तरी कांहीं हालचाल करीत नाहीं असें पाहून तो वाणी चपापला व जवळ जाऊन पाहूं लागला तों तें प्रेत झालें आहे असें त्याच्या नजरेस आलें. तेव्हां तो फार घाबरला. याचा खून आपल्या हातून झाला हें कोतवालास कळल्यास आपल्यावर फार वाईट प्रसंग येईल, असा विचार करून त्यानें तो मुडदा उचलला आणि रस्त्यावर दूर अंतरावर नेऊन काळोखांत एका दुकानाशीं उभा करून ठेविला आणि आपण मुकाट्यानें घरीं येऊन निजला.

पहांटेस एक दारू पिऊन झिंगलेला ख्रिस्ती सावकार त्या रस्त्यानें मोठ्या घाईघाईनें घरीं चालला होता. तो कांहीं कारणामुळें एका दुकानाजवळ थांबला. त्याच दुकानास टेंकून वाण्यानें त्या कुबड्याचें प्रेत ठेविलें होतें. त्या ख्रिस्त्याचा थोडा धक्का लागतांच तें प्रेत त्याच्या पाठीवर पडलें. तेव्हां घाब-

रून तो 'चोर रे चोर' म्हणून ओरडला व त्या कुबड्यास ठोसे लगावूं लागला. इतक्यांत शेजारच्या चौकीवरील पोलीस धांवत आला व ख्रिस्ती मनुष्य मुसलमानाला मारीत आहे असें पाहतांच त्याचा हात पकडून त्यानें त्याला एकीकडे केलें व तो त्या कुबड्यास उठवूं लागला. परंतु तो कसचा उठतो ! तेव्हां त्यानें त्या ख्रिस्ती सावकारास पकडून कोतवालाकडे नेलें.

कोतवालानें त्याला दुसऱ्या दिवशीं न्यायाधीशासमोर उभें केलें. ख्रिस्ती सावकाराला, नुसत्या ठोशांनीं त्याचा जीव कसा गेला ह्याचें गूढ वाटलें, परंतु त्याला गुन्हा कबूल करणें भागच होतें. शिवाय तो मेलेला कुबडा राजाचा आश्रित होता असें कळलें. तेव्हां न्यायाधीश शिक्षा करण्यापूर्वीं राजाचा अभिप्राय विचारण्याकरितां राजवाड्यांत गेला. राजानें सारी हकीकत ऐकून घेऊन अपराध्याला फांशीं देण्यास सांगितलें. त्याप्रमाणें न्यायाधीशानें त्या सावकारास फांशीची शिक्षा सांगितली आणि गांवांत दवंडी पिटविली. फांशीच्या जागीं पुष्कळ लोक जमा झाले. ख्रिस्ती सावकाराच्या गळयास फांस लावून तो आतां ओढणार, इतक्यांत तो मुसलमान वाणी गर्दींतून वाट काढीत पुढें आला व म्हणाला, 'अरे, थांब, त्याला फांशीं देऊं नको. खरा गुन्हेगार मी आहें.' असें म्हणून त्यानें आपली हकीकत न्यायाधीशास सांगितली. न्यायाधीशास तोच खरा अपराधी दिसल्यावरून त्यानें सावकाराला सोडून वाण्याला फांसावर चढविण्यास

सांगितलें. नंतर मांगानें त्याच्या गळ्यास फांस लावला व आतां ओढणार इतक्यांत तो यहुदी वैद्य 'थांबा थांबा' म्हणून गर्दींत घुसला आणि न्यायाधीशापुढें हात जोडून म्हणाला, 'महाराज, खरा गुन्हेगार मी आहें. मीच तें प्रेत ह्या वाण्याच्या घरांत सोडलें.' असें म्हणून त्यानें आपली हकीकत सांगितली व आपणास शिक्षा करण्याबद्दल विनंती केली. त्याची हकीकत ऐकून व सर्वांसमक्ष त्यानें गुन्हा कबूल केलेला पाहून न्यायाधीशानें वाण्याला सोडून वैद्याला फांशीं देण्यास सांगितलें. त्याप्रमाणें वैद्यबुवांच्या गळ्यांत फांसाची दोरी अडकवण्यांत आली व ती आतां ओढणार इतक्यांत गर्दी बाजूस सारीत तो शिंपी पुढें आला व हात जोडून म्हणाला, 'महाराज, ह्या वैद्याचा कांहीं अपराध नाहीं. मीच ह्यांच्या जिन्यावर मुडदा नेऊन ठेविला होता. जो माझ्या घरींच मेला होता त्याचा पुन्हा हे कसा जीव घेणार?' असें म्हणून शिंप्यानें आपली हकीकत सांगितली व आपणास शिक्षा व्हावी असा आग्रह धरला. त्याप्रमाणें न्यायाधीशानें शिंप्यास फांसावर चढविण्यास आज्ञा केली. असा प्रकार चालला असतां इकडे काशगरच्या राजास आपल्या त्या विनोदी ठेंगू कुबड्याची बरेच वेळां आठवण झाली. कारण तो त्याच्या फार मर्जींतला होता. राजानें कुबड्याची गोष्ट काढली ती ऐकून त्याचा एक हुजऱ्या म्हणाला, 'आपण आठवण करतां; परंतु तिकडे काय चमत्कार चालला आहे पहा. आपल्या कुबड्याचा खून केल्याबद्दल एका गुन्हेगाराला फांसावर चढविण्याचा हुकूम झाला तोंच

दुसरा मनुष्य पुढें येऊन तो गुन्हा आपण केला असें सांगूं लागला. त्याला फांशीं देणार तोंच तिसरा, त्याच्या मागून चौथा असे लोक पुढें येऊन आपण गुन्हा केला, आपणास शिक्षा करावी, असें म्हणत आहेत.' हें ऐकतांच राजानें हुकूम केला कीं, 'तूं आतांच्या आतां जा व ते सर्व गुन्हेगार, न्यायाधीश, कुबड्याचें प्रेत ह्या सर्वांना इकडे घेऊन ये.' हुजऱ्या तत्काळ घोडा पिटाळीत गेला, तों शिंप्याचा फांस ओढला जाण्याच्या बेतांत होता. इतक्यांत हुजऱ्यानें ओरडून मांगास थांबण्यास सांगितलें व राजाज्ञा निवेदन करून सर्वांना राजाकडे तो घेऊन गेला. तेथें गेल्यावर न्यायाधीशानें राजास साष्टांग नमस्कार घालून सर्व हकीकत सांगितली, तेव्हां राजासही आश्चर्य वाटलें. मात्र तो त्या गुन्हेगारांस म्हणाला, 'हा माझा कुबडा मोठा विनोदी असून त्याला फार उत्तम गोष्टी येत असत. त्याच्या गोष्टीसारखी सुंदर गोष्ट जर तुम्हां कोणाला सांगतां येत असेल तर सांगा.' असें म्हणतांच त्या चौघांनीं एकाहून एक सुरस गोष्टी काशगरच्या राजास सांगितल्या. त्यांतच शिंप्यानें न्हाव्याच्या भावांच्या गोष्टी सांगितल्या, त्या राजास फारच चमत्कारिक वाटल्या. नंतर शिंप्यानें कुबडा आपल्या घरीं आल्यापासून त्याला वैद्याच्या घरीं पोंचवीपर्यंतची हकीकत राजास सांगितली. तेव्हां राजा म्हणाला, 'ज्या न्हाव्याची गोष्ट तूं सांगितलीस त्याला पहावें अशी मला फार इच्छा झाली आहे.

तेव्हां तूं त्यास घेऊन ये ', असें म्हणून त्यानें आपले शिपाई बरोबर देऊन त्यास न्हाव्यास शोधून आणण्यास सांगितलें.

लवकरच शिंपी न्हाव्यास घेऊन आला. त्याचा तो पोशाखाचा थाट पाहून सर्वांसच हसूं आलें. नंतर न्हाव्यानें त्या कुबड्याचें प्रेत न्याहाळून पाहण्याची परवानगी मागितली. ती मिळतांच त्यानें त्याचें तोंड उघडून पाहिलें व तो मोठ्यानें हंसला. तें पाहून सर्वांना विस्मय वाटला. सुलतानानें हसण्याचें कारण विचारलें. तेव्हां तो म्हणाला, ' महाराज, हा कुबडा अजून मेला नाहीं; याचा प्रत्यय मी सरकारास आणून देतों.' असें म्हणून त्यानें आपल्याजवळच्या पेटींतून एक औषधाची कुपी काढली आणि तींतील अर्क त्या कुबड्याच्या मानेस चोळला. नंतर एका हत्यारानें त्याची दांतखिळी उघडून धरून चिमट्यानें त्याच्या घशांत अडकलेलें तें माशाचें हाडुक मोठ्या युक्तीनें ओढून काढलें. त्याबरोबर त्या कुबडयाला पटापट दोन तीन शिंका आल्या आणि आंखडलेले हात पाय त्यानें लांब केले व थोडयाच वेळांत डोळे उघडले. हा अद्‌भुत प्रकार पाहून सर्वांस मोठें आश्चर्य वाटलें व त्या न्हाव्याच्या अलौकिक बुद्धिमत्तेची व कल्पकतेची सर्वांनीं फार वाहवा केली. नंतर राजानें त्या चौघांना उंची पोषाख दिले व न्हाव्याला चांगलें वर्षासन करून देऊन आपल्या पदरीं ठेविलें.



नंतर एका हत्यारानें त्याची दांतखिळी उघडून धरून चिमट्यानें त्याच्या घशांत अडकलेलें तें माशाचें हाडुक मोठ्या युक्तीनें ओढून काढलें.

वा. क्र. २०३९ दिनांक
विषय ०११.५१ - क्र.

५

# अलनास्करचें मनोराज्य

एका न्हाव्यास सात मुलगे होते. त्यांपैकीं एकाचें नांव अलनास्कर असें होतें. तो फार आळशी होता. तो कांहींही उद्योग करीत नसे. दररोज बापाजवळून पैसे मागून नेई आणि त्यावर दुसऱ्या दिवसाचा निर्वाह करी. पुढें बाप पुष्कळ म्हातारा होऊन मेला. त्या वेळीं त्याच्याजवळ सातशें रुपये होते. ते सातही भावांनीं वांटून घेतले. अलनास्कर याच्यापाशीं इतका पैसा पूर्वीं कधींच आला नसल्यामुळें, त्याचें काय करावें असा त्यास विचार पडला. शेवटीं बोहऱ्याचा धंदा करण्याचें ठरवून, त्यानें त्या पैशांचें निरनिराळ्या प्रकारचें कांचसामान विकत घेऊन तें सर्व एका हाऱ्यांत भरलें. मग दुकानाकरितां एक लहानशी जागा भाड्यानें घेऊन तेथें तो हारा पुढें ठेवून तो गिऱ्हाइकाची वाट पहात बसला.

याप्रमाणें पुढील हाऱ्याकडे नजर लावून तो बसला असतां त्याच्या मनांत कल्पनातरंग उद्भवूं लागले व त्यांत तो अगदीं गर्क होऊन गेला. अलनास्कर स्वतःशींच परंतु

मोठ्यानें म्हणूं लागला, 'माझे शंभर रुपये मी काचेच्या सामानांत घातले. ह्यांचे मला दोनशें केले पाहिजेत. मग मी दोनशें रुपयांचें आणखी काचसामान घेईन व तें विकून त्यांचे चारशें करीन. ह्याप्रमाणें हळूहळू वाढतां वाढतां चारशांचे चार हजार होतील व चारांचे आठ हजार होण्यासही वेळे लागणार नाहीं. मजजवळ दहा हजार रुपये झाल्यावर मी कांचसामानाचा धंदा सोडून जवाहिऱ्या होईन व मोत्यें, हिरे, माणकें विकूं लागेन. त्यांत मला हवा तितका पैसा मिळेल. नंतर मी एक सुंदर वाडा बांधीन व त्यांत बाग-बगीचे, दासदासी, घोडे, गाड्या वगैरेची सोय करीन. मग मजकडे गवई, कलावंतिणी वगैरे येऊं लागतील व अशा रीतीनें माझ्या औदार्याची कीर्ति सर्वत्र पसरेल. तथापि मी आपला धंदा सोडणार नाहीं. मग ईश्वराच्या कृपेनें लक्षपति होण्यास मला कितीसा अवधि लागणार आहे! मी लक्षाधीश झालों कीं, मला शहाजाद्याची योग्यता खचित आली असें होईल. आणि मग मुख्य वजिराच्या कन्येला मागणी घालण्यास मला काय हरकत आहे? मागणीचे वेळीं आपण मुख्य प्रधानास सांगूं कीं, 'तुमची कन्या सुंदर व सद्गुणी असल्याचें आमच्या कानीं आल्यामुळें तिला वरण्याची आमची मर्जी आहे. तरी जर तुम्ही मान्य करीत असाल तर लग्नाचे दिवशीं स्त्रीधन म्हणून आम्ही तिला एक हजार मोहरा देऊं.' हें बोलणें प्रधानानें अमान्य केलेंच, तर मी त्याच्या वाड्यांतून जबरदस्तीनें तिचें हरण करून तिच्याशीं लग्न लावीन. माझ्यासारख्या श्रीमंतापुढें त्याचें काय चालणार

आहे! नंतर मी तिच्या सेवेला सुंदर, हुशार व तरुण अशा दासी देईन. मी शाहजाद्यासारखा पोशाख करून उमद्या अरबी घोड्यावर बसून शहरांतून फिरत जाईन. तेव्हां लोक मजकडे कौतुकानें टक लावून पाहतील व अदबीनें लवून मला मुजरा करतील. नंतर मी वजिराचे घरीं जाईन. तेथें वजीर मोठ्या आदरानें मला सामोरा येऊन हात धरून मला आंत घेऊन जाईल व उच्चासनावर बसवील. नंतर मी एक हजाराचे ऐवजीं दोन हजार मोहरा त्यास देऊन सांगेन कीं, लग्नाचे वेळीं आपल्या कन्येला स्त्रीधन म्हणून देण्याचें कबूल केल्याप्रमाणें हजार मोहरा द्यावयाच्या परंतु त्यांचेऐवजीं दोन हजार आम्ही देत आहोंत. ह्या माझ्या कृत्यानें माझी औदार्याबद्दल सर्व दुनियेंत ख्याति होईल.

प्रधानकन्या माझ्या घरीं आली म्हणजे मी तिला सहसा बाहेरच जाऊं देणार नाहीं. मी तिच्या महालांत गेलों असतां असा वागेन कीं, तिला हा फारच थोर मनुष्य आहे असें वाटेल. सारांश, माझ्या घरांतील शिस्तीचा शहरांतील लोकांनीं कित्ता घ्यावा अशी कडक शिस्त मी ठेवीन. मी बायकोच्या महालांत गेलों म्हणजे तिनें कितीही मनधरणी केली तरी तिच्याशीं बोलणार नाहीं. मग तिला फार वाईट वाटेल. दुसरे दिवशीं तें सर्व ती आपल्या आईला सांगेल. मग मुलीकरितां रदबदली करण्यासाठीं प्रधानाची बायको—आमच्या सासूबाई—मला भेटावयास येईल व गरिबीनें मला म्हणेल, 'जांवईबोवा, माझ्या मुलीची आपण हेळसांड करूं नये. मी शपथ वाहून सांगतें कीं, तिचे पंचप्राण आपल्या

पायाशीं आहेत.' मग ती आपल्या मुलीला माझ्या पायांवर डोकें ठेवून माझी क्षमा मागण्यास सांगेल. नंतर मला खूष करण्याकरितां माझी बायको हातांत एक मद्याचा पेला घेऊन तो घेण्याबद्दल माझी विनवणी करील व मी घेत नाहीं असें पाहून ती माझ्या तोंडाला लावण्याकरितां तो पुढें करील. तेव्हां रागानें मी तिच्याकडे पाहीन व तिच्या एक श्रीमुखांत देऊन जोरानें अशी लाथ मारीन कीं, ती गोलांच्या खात दूर अंतरावर जाऊन पडेल.'

अलनास्कर आपल्या मनोराज्यांत इतका गढून गेला होता कीं, त्यास आपण कोठें आहोंत ह्याचें भान न राहून प्रधान-कन्याच जणूं आपल्यासमोर उभी आहे असें वाटून त्या आवेशांत तिला मारण्याकरितां त्यानें खरोखरच लाथ झाडली. परंतु ती त्याच्या कांचसामानाच्या हाऱ्याला लागून तो पालथा झाला व तें सामान फुटून त्याचे तुकडे तुकडे झाले.

त्याच्या शेजारीं एक शिंपी राहात होता. तो आपल्या दुकानांतून आरंभापासून अलनास्करचें सर्व भाषण ऐकत होता. त्यानें हाऱ्याला लाथ मारिली, ती ऐकून शिंपी मोठ्यानें म्हणाला, 'अरे निर्दया, आपल्या निरपराधी बायकोला लाथ मारण्यास तुला शरम कशी नाहीं वाटत? मी जर तुझा सासरा वजीर असतों तर तुला पांचशें फटके मारून तुझी धिंड काढली असती!' तें शिंप्याचें भाषण व कांचेचा खळखळाट ऐकून अलनास्कर एकदम शुद्धीवर आला व आपल्या मूर्खपणामुळेंच आपलें सर्वस्वीं नुकसान झालेलें पाहून त्याला पराकाष्ठेचें दुःख झालें.



त्यानें खरोखरच लाथ झाडली. परंतु ती त्याच्या कांच-सामानाच्या हाऱ्याला लागून तो पालथा झाला व तें सामान फुटून त्याचे तुकडे तुकडे झाले.

६

# थट्टेखोर अमीर

बगदाद शहरांत एक न्हावी राहत होता. त्याचें नांव क्षाकबक. त्याच्या बापानें मरतेवेळीं त्याला शंभर रुपये दिले होते. त्यांवर त्यानें कांहीं धंदा करून निर्वाह चालविला होता. परंतु पुढें दैव फिरल्यामुळें तो धंद्यांत ठार बुडाला व त्याच्यावर भीक मागण्याची पाळी आली. तथापि भीक मागण्याचा धंदा कां होईना, तो त्यानें मोठ्या धूर्तपणानें चालविला. एकाद्या घरीं तो गेला म्हणजे दारावरील पहारेकऱ्यांचें आर्जव करून व त्यांस खूष करून तो थेट यजमानापर्यंत प्रवेश करून घेत असे व त्याला आपलें दैन्य सांगून त्याजपासून कांहींतरी चांगली भिक्षा मिळवी.

याप्रमाणें त्याचा क्रम चालला होता. एके दिवशीं तो रस्त्यानें चालला असतां एक मोठी टोलेजंग हवेली त्यानें पाहिली. दरवाजांतून आंत डोकावून पाहतो, तों चाकरनोकरांची घरांत मोठी गर्दी दिसली व ती पाहून हा धनी मोठा श्रीमंत मनुष्य असावा असें त्याला वाटलें. नंतर जवळ जाऊन तो त्या

वाड्यांच्या मालकाविषयीं चौकशी करूं लागला. तेव्हां देवडीवाला म्हणाला, 'अरे, हा अमीरसाहेबांचा वाडा अलम-दुनियेला माहीत असतां तूंच कोण आज नवीन आलास ? आमचे धनीसाहेब मोठे उदार असून दानधर्म करण्यामध्यें त्यांचा नांवलौकिक चोहोंकडे पसरला आहे, ही गोष्ट तुलाच कशी माहीत नाहीं ?' तेव्हां क्षाकबक त्यांच्याजवळ कांहीं भिक्षा मागूं लागला. परंतु ते म्हणाले, 'अरे, तूं असा भितोस कां ? तूं खुशाल आंत यजमानांकडे जा. येथें भिकाऱ्यांना वाड्यांत जावयाची मुळींच बंदी नाहीं. आमचे धनी तुला खात्रीनें संतुष्ट करतील.'

पहारेकऱ्यांच्या ह्या ममतेच्या भाषणाबद्दल त्यांचे आभार मानून क्षाकबक आंत गेला. तो एकामागून एक सुंदर दालनें ओलांडीत पुष्कळ फिरला तेव्हां कोठें त्याला अमीर-साहेबांचा शोध लागला. नंतर तो बगीचा ओलांडून पलीकडील अत्यंत सुशोभित अशा दिवाणखान्यांत शिरला. त्या ठिकाणीं एका पलंगावर उंच स्थानीं एक वृद्ध गृहस्थ बसला होता. त्याचा चेहरा उमदा व रुबाबदार होता. त्याची वृत्ति शांत व कृपाळू दिसत होती. क्षाकबकानें हाच मालक असें ताडलें व त्याला मोठ्या अदबीनें सलाम केला. त्या याचकास पाहतांच अमिरानें त्याला जवळ बोलाविलें व मोठ्या ममतेनें बसावयास सांगून 'कां आलास ?' वगैरे चौकशी केली. क्षाकबकनेंही गरिबीची मुद्रा करून, 'मी आपल्यासारख्यांच्या दानधर्मावर जगणारा एक भिकारी

आहें. आपली कीर्ति ऐकून कांहीं आशेनें आलों आहें,' असें त्यास उत्तर दिलें.

त्याचें तें दीनवचन ऐकून अमिरास फार कळवळा आला. त्यानें ममतेनें त्यास म्हटलें, 'अरे, मी ह्या बगदाद शहरांत राहत असतां येथेंही तुझ्यासारखा दुःखी प्राणी आहे ना? धिक्कार असो माझ्या संपत्तीला!' हें भाषण ऐकून क्षाकबकला वाटलें, हा खरोखरी कांहीं तरी मोठा धर्म करील. म्हणून तो त्यास आशीर्वाद देऊन म्हणाला, 'महाराज, मी अगदीं दीन आहें. आणि आज साऱ्या दिवसांत अजून मीं तोंडांत पाणीसुद्धां घातलें नाहीं.' तेव्हां अमीर आश्चर्य दाखवून म्हणाला, 'काय, तूं दिवसभर उपाशीं आहेस? अरेरे! बरें मी तुझी व्यवस्था लावतों.' मग तो मोठ्यानें चाकरास हाक मारून म्हणाला, 'अरे, कोण आहे रे तिकडे? हात धुण्यासाठीं लवकर पाणी आणि तस्त घेऊन या!'

वास्तविक कोणी चाकर आला नाहीं व कांहीं नाहीं, तरी जसें कांहीं चाकरानें पाणी आणून दिलें असें समजून तो अमीर अस्तन्या वर करून हात धुण्याची कृति करूं लागला व क्षाकबकला म्हणाला, 'ये रे, हात धू.' हा धनी मोठा रंगेल दिसतो हें क्षाकबकनें तेव्हांच ताडिलें व श्रीमंत लोकांबद्दल त्याचा तसा अनुभवही होता. म्हणून तोही हात धुण्याची कृति करूं लागला. नंतर अमीरानें चाकरास हुकूम केला, 'अरे, ह्या गृहस्थास फार भूक लागली आहे. तेव्हां लवकर खाना तयार करून घेऊन या. आम्हांला तिष्ठत बसवूं नका.'

नंतर थोडचा वेळानें अमीर आपण खाना खात आहों असें दाखवून ताटांतील पदार्थ उचलून तोंडांत घालूं लागला. खरोखरी त्याच्यापुढें ताट वगैरे कांहींही नव्हतें. त्यानें क्षाकबकलाही खान्यास बोलाविलें. तेव्हां त्यानेंही खायला लागल्यासारखें करून तोंड हलविण्यास व घांस घेण्यास सुरुवात केली. जेवतांना अमीर म्हणाला, ‘मित्रा, ही पोळी कशी काय आहे? अशी तुला कधीं तरी खावयास मिळाली होती काय?’ क्षाकबकनेंही त्या पोळीची व ती करणाऱ्या स्वयंपाकिणीची फार तारीफ केली. मग अमीरानें बकऱ्याची सागोती आणावयास चाकरास हुकूम केला. नंतर खाल्ल्या-सारखें दाखवून अमीर म्हणाला, ‘अहाहा! काय सागोती सुंदर झाली आहे! अरे, मी पिस्ते खावयास घालून कोंकरांना चांगलीं तयार करतों आणि नंतर त्यांची सागोती तयार करावयास सांगतों. बेट्या, तुला कधीं असला जिन्नस पाहण्याससुद्धां मिळणार नाहीं. आज तुझी चैन आहे. आज ही सर्व तूं खाऊन फस्त करून टाक. ताटांत कांहीं शिल्लक ठेवूं नको.’ नंतर बदाम व बेदाणा घालून तयार केलेलें व मधांत तळलेलें बदक आणण्यास त्यानें चाकरास आज्ञा केली आणि सागोती-प्रमाणेंच त्याची तारीफ करून क्षाकबकला त्यानें त्यावर ताव मारण्यास सांगितलें. त्याचप्रमाणें आणखीही उंची उंची पक्वान्नांचीं नांवें घेऊन त्यानें तीं चाकरांस घेऊन येण्याचे हुकूम सोडले. वास्तविक चाकर आले नाहींत व पक्वान्नें वाढलीं नाहींत; परंतु सर्व कांहीं खरें चालले आहे

अशा थाटांत त्यानें क्षाकबकला यथेच्छ आग्रह करून पक्वान्नें खाण्यास सांगितलें. नंतर जेवण पोटभर झालें असें समजून ढेंकर देत त्यानें चाकरास हुकूम सोडला, 'अरे, आतां हीं ताटें घेऊन जा आणि फळफळावळीचीं ताटें घेऊन या. द्राक्षें, संत्रीं, मोसंबीं भरपूर आणा. आज पाहुण्यांना खूष करून सोडूं.' लगेच ताटें आलीं असें दाखवून त्यानें एक ताट आपल्यापुढें व एक क्षाकबकपुढें सारून म्हटलें, 'मित्रा, हीं मस्कती डाळिंबें पहा, किती गोड आहेत! तशींच हीं मोसंबीं! काय तुला आवडेल तें आणि पाहिजे तितकें खा. संकोच करूं नको.' याप्रमाणें सांगून आपणही त्या काल्पनिक फळांवर ताव मारण्यास व मिटक्या देण्यास त्यानें सुरुवात केली. क्षाकबकनें त्याचीच नक्कल पण त्याच्या-पेक्षांही सरस करून दाखविली व आतां पोट तुडुंब भरल्या-सारखें दाखवून म्हणाला, 'महाराज, आतां मला खाण्याचा अगदीं कंटाळा आला आहे. एक घांससुद्धां पोटांत मावणार नाहीं.' वास्तविक त्या बापड्याच्या पोटांत कांहींही गेलें नव्हतें व नुसतें हलवूनच त्याचें तोंड दुखूं लागलें होतें. असो.

त्याचें भाषण ऐकून अमीरसाहेब म्हणाले, 'बरें तर आतां थोडेंसें मद्य घेऊं. अरे, मद्याची बाटली आणा रे! असल्या जेवणावर मद्य प्याल्याशिवाय गंमत नाहीं.' तेव्हां क्षाकबक म्हणाला, 'महाराज, मी मद्यास शिवत देखील नाहीं. आज पुष्कळ दिवस मीं तें पिण्याचें सोडून दिलें आहे. तेव्हां कृपा करून मला त्याचा आग्रह करूं नये.' अमीर म्हणाला,

'अरे, कसले नेमधर्म करीत बसतोस? तूं काय म्हातारा-बितारा आहेस? तें कांहीं नाहीं; मी कांहीं तुला तसा सोडणार नाहीं.' नंतर मद्याची कल्पित बाटली घेऊन ती कल्पित पेल्यांत ओतून त्यानें पिण्यास आरंभ केला, आणि एक पेला भरून क्षाकबकपुढें केला. त्यानेंही नाइलाज दाखवून तो मोठ्या अदबीनें घेतला आणि वास घेत घेत मिटक्या मारीत प्राशन केला. नंतर अमीरानें ह्याहीपेक्षां कडक मद्य मागितलें व दुसऱ्या बाटलींतून तें ओतल्यासारखें दाखवून तो पेला क्षाकबकचे हातांत दिला. ह्याप्रमाणें कित्येक पेले प्याल्यावर मद्य पक्कें अंगावर आल्यासारखें दाखवून क्षाकबक गुंगल्यासारखें करूं लागला, आणि एकाएकीं हात उगारून त्यानें अमीराच्या अशी एक थोबाडींत दिली कीं, तो धाडदिशीं खालीं पडला. क्षाकबक दुसरीही चढवणार होता, परंतु तितक्यांत अमीरानें उठून त्याचा हात धरला आणि म्हटलें, 'अरे, तुला काय वेड लागलें आहे कीं काय? अशी मस्ती काय करतोस?' तेव्हां क्षाकबकनें एकदम शुद्धीवर आल्यासारखें दाखवून त्याच्यापुढें साष्टांग नमस्कार घातला व माफी करण्याबद्दल त्याची फार फार विनंती केली. तो म्हणाला, 'महाराज, या गरिबास आपण पंक्तीचा लाभ देऊन पोटभर जेवण वाढलें, हेच मजवर मोठे उपकार झाले होते. परंतु मी नको म्हणत असतां आपण मला आग्रहानें दारू पाजली. मला संवय नसल्यामुळें ती माझ्या आंगावर बेसुमार चढली, म्हणून मजकडून हा अपराध घडला; तरी

धनीसाहेबांनीं कृपाळू होऊन बंद्याला गुन्हा माफ करावा. मी आपणांस शरण आहें.'

अमीरानेंही यत्किंचित् न रागावतां म्हटलें, 'अरे, तुझ्यासारख्या स्वभावाचा मनुष्य मी कित्येक दिवस शोधीत होतों तो आज तूं सांपडलास. मी तुझी थट्टा करीत असतां किंचित्‌ही न रागावतां ती सर्व तूं सोसलीस; इतकेंच नव्हे, तर आपल्या विनोदी स्वभावाची भर घालून मोठ्या चतुराईनें ह्या गोष्टीचा असा मजेदार शेवट केलास. तेव्हां तुझ्याहातून घडलेला गुन्हा मी तुला माफ करतों. आतां आजपासून तूं माझा जिवलग दोस्त झालास. आतां यापुढें तुझें भिक्षाचर्य संपलें. येथें तूं घरच्यासारखा रहा.' ह्याप्रमाणें बोलून त्यानें क्षाकबकला मोठ्या प्रेमानें आलिंगन दिलें व चाकरांस हाक मारून खाना आणण्यास सांगितलें. नंतर मोठ्या थाटांत त्यांचें जेवण झालें. मागून सुंदर कलावंतिणीचें गाणें व नाच झाला. अमीरानें क्षाकबक यास उंची पोशाक दिले व त्यास वाड्यांत ठेवून घेतलें. त्यांचा पुढें परस्परांवर इतका लोभ जडला कीं, त्या अमीरानें लवकरच त्यास आपला मुख्य कारभारी केलें. याप्रमाणें वीस वर्षें इमानें इतबारें धन्याची सेवा केल्यावर त्या अमीरानें मरतेसमयीं आपली सर्व धनदौलत त्याचे स्वाधीन केली.

७

# कामर्लजेमान व बदूरा

इराणी आखातापासून पुष्कळ मैलांच्या अंतरावर महासागरांत एक द्वीपसमूह होता. तेथें शाहजेमान नांवाचा एक सदाचारी व प्रजाहितदक्ष राजा राज्य करीत असे. त्याला चार सद्गुणी राण्या होत्या, तथापि एकीसही पुत्र नसल्यामुळें राजाच्या मनाला फार दुःख होत असे. ह्या गोष्टीला काय उपाय करावा म्हणून त्यानें एकदां आपल्या प्रधानास विचारिलें. प्रधानानेंही, ही गोष्ट ईश्वराधीन असल्यामुळें त्याला संतुष्ट करण्याकरितां दानधर्म वगैरे करण्यास सांगितलें. राजानें त्याप्रमाणें बहुत दानधर्म केला. सर्व राज्यांतील मशिदींत प्रार्थना सुरू केल्या. ह्या उपायांनीं ईश्वर प्रसन्न होऊन त्यानें त्याचा मनोरथ पूर्ण केला. त्याच्या एका राणीला एक वर्षाचे आंत अप्रतिम सुंदर असा एक पुत्र झाला. तेव्हां राजाला अपरंपार आनंद होऊन त्यानें राज्यांत जिकडे तिकडे आनंदोत्सव केले. त्या पुत्राचें नांव त्यानें

कामर्लजेमान असें ठेविलें. त्याच्या विद्याभ्यासाची राजानें उत्कृष्ट व्यवस्था केली. सर्व विद्या व मर्दानी कला ह्यांत तो निपुण झाला. अशा प्रकारें पुत्राची अलौकिक तयारी पाहून राजाचा आनंद त्रिभुवनांत मावेनासा झाला !

पुढें, आपलें उतार वय झालें व पुत्रही राज्यभार वाहण्यास योग्य झाला असें पाहून राजानें त्यास राज्यावर स्थापण्याचा विचार केला व प्रधानाची सल्ला विचारली. परंतु, ‘ तूर्त घाई करूं नये. प्रथम त्यास मंत्रिमंडळांत घ्यावें व त्याचें लग्न करून दिल्यानंतर हळूहळू सर्व अधिकार त्याजवर सोंपवावे, ’ अशी प्रधानानें मसलत दिली. राजालाही ती रुचली व त्यानें आपला बेत रहित केला.

नंतर आपल्या एकुलत्या एक पुत्राचा लग्नसोहळा पहावा अशा इच्छेनें राजानें पुत्रास बोलावून आणून त्या बाबतींत त्याचें मत विचारलें. तेव्हां तो म्हणाला, ‘ महाराज, माझ्या स्वाभाविक वृत्तीचा कल पाहिल्यास मी लग्न करण्यास कधीं अनुकूल होईन असें मला वाटत नाहीं. याकरितां आपण हा विचार सोडून दिला तर बरें होईल. ’ राजाला पुत्राचें असें भाषण ऐकून फार वाईट वाटलें. परंतु प्रधानाच्या सल्ल्यानें त्यानें आणखी कांहीं दिवस थांबण्याचें ठरविलें. तथापि पुत्रानें आपलें ऐकिलें नाहीं ही गोष्ट त्याच्या मनाला फार लागून राहिली. नंतर कांहीं दिवसांनीं त्यानें राजपुत्राची आई जी राणी फतिमा तिला राजपुत्राचें मन

वळविण्यास सांगितलें. राणीनें आपल्या मुलाला बोलावून आणिलें आणि लग्न करण्यास कबूल होण्याविषयीं नाना प्रकारीं त्याला बोध करून त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. परंतु निरनिराळे युक्तिवाद करून त्यानें आईचें म्हणणें खोडून काढलें आणि आपलाच हेका कायम ठेविला.

पुढें बरेच दिवस लोटल्यावर एके दिवशीं राजानें दरबार भरवून त्यांत मुख्य वजीर, सेनापति, इतर प्रधान, अमीर उमराव वगैरे मोठे वजनदार लोक बोलाविले आणि सर्वांच्या समक्ष तो राजपुत्रास म्हणाला, 'मुला, त्वां संतोषानें लग्न केलेलें मीं पहावें अशी मला फार दिवस उत्कंठा लागली आहे ती सयुक्तिक असूनही तूं ऐकत नाहींस. आज मी सर्वांसमक्ष तुला सांगतों कीं, ही माझी एकट्याचीच इच्छा नाहीं तर सर्व प्रधान, मानकरी व प्रजाजन ह्यांचेंही हेंच मागणें आहे. तेव्हां लग्न करण्यास तूं राजी आहेस किंवा नाहींस, ह्याचें विचारपूर्वक उत्तर दे.' तेव्हां राजपुत्रानें निर्भीडपणें आपलें पूर्वीचेंच मत कायम असल्याचें कळविलें. त्याबरोबर राजानें संतापून चाकरांना आज्ञा केली कीं, 'ह्या दांडग्या व अमर्याद कार्ट्याला आतांच्या आतां येथून उचला आणि त्या जुन्या किल्ल्यांत नेऊन कोंडून ठेवा.' तावडतोब चाकरांनीं त्या हुकुमाची अंमलबजावणी केली. तो किल्ला अलीकडे ओसाड पडला होता. तेथें एक पलंग, बिछाना, कांहीं पुस्तकें व एक हुजऱ्या इतक्या गोष्टी मात्र राजपुत्रास देण्यांत आल्या.

त्या दिवशीं राजपुत्र शांत चित्तानें कुराणांतील कांहीं अध्याय वाचून व पोशाख उतरून ठेवून बिछान्यावर जाऊन निजला. दिवा तसाच जळत राहिला होता. त्या किल्ल्यांत एक पडकी विहीर होती. तींत एक यक्षीण राहत असे. ती नित्याप्रमाणें मध्यरात्रीं संचारास निघाली असतां दिव्याचा प्रकाश दिसल्यामुळें आज नवा कैदी कोण आला आहे हें पाहण्यासाठीं ती राजपुत्राच्या कोठडींत आली. पलंगावर निजलेल्या राजपुत्राकडे नजर जातांच त्याच्या सौंदर्यानें ती थक्क होऊन मनांत म्हणाली, 'सगळ्या पृथ्वीवर मी हिंडतें, पण असा मदनाचा पुतळा कोठेंही पाहण्यांत आला नाहीं. काय हें सौंदर्य ! पाहून तृप्तीच होत नाहीं !' शेवटीं बराच वेळ झाल्यावर त्याच्या गालाचें चुंबन घेऊन ती निघाली. थोडी दूर जाते तोंच तिला एक यक्ष भेटला. त्याला थांबवून ती विचारते, 'काय रे, आज कांहीं विशेष चमत्कारिक गोष्ट तुझ्या पाहण्यांत आली आहे काय ?' तो म्हणाला, 'होय. चीन देशांत मी एक अद्भुत लावण्यसंपन्न राजकन्या पाहिली. तिच्यासारखी स्त्री त्रिभुवनांत नसेल. तिची हकीकत तुला सांगतों—चीन देशचा राजा गैऊर याची ती कन्या असून तिचें नांव बदूरा असें आहे. ती एकुलती एक असल्यामुळें आईबापांचा अगदीं जीव कीं प्राण आहे. तिच्या सौंदर्याचें व गुणांचें वर्णन करतां येणेंच शक्य नाहीं. त्याची कल्पना प्रत्यक्ष पाहिल्यानेंच येईल. अशी ती राजकन्या उपवर झाल्यावर तिला अनेक राजांकडून मागण्या आल्या; परंतु

त्यांतून एकही तिला पसंत पडला नाहीं. शेवटीं राजानें आपल्या पसंतीनें एक वर ठरवून त्याच्याशीं लग्न करण्याविषयीं त्यानें मुलीस सांगितलें. परंतु त्याही वरास तिनें नाकारिलें. राजानें पुनः पुनः आग्रह केला, तेव्हां ती रागानें म्हणाली, 'बाबा, तुम्ही जर मला फार आग्रह कराल तर मी छातींत कट्यार खुपसून जीव देईन.' ह्या तिच्या भाषणाचा राजाला मनस्वी राग आला व त्यानें तिला वेड लागलें आहे असें ठरवून तिच्याच महालांतल्या एका खोलींत कोंडून ठेविलें. मात्र तिच्या चाकरीकरितां तिची एक म्हातारी दाई आणि इतर नऊ दासी त्यानें पाठविल्या व तिला सर्व सुखसोई करून दिल्या.'

याप्रमाणें यक्षानें गोष्ट सांगून यक्षिणीस विचारिलें, 'तूं काय चमत्कार पाहिलास तो आतां सांग पाहूं.' तेव्हां तिनें राजपुत्र कामर्लजेमान याची हकीकत सांगून म्हटलें, 'त्या पुरुषासारखा सौंदर्यसंपन्न पुरुष पृथ्वीवरच काय पण स्वर्गांतही मिळणें कठीण आहे. तुझी राजकन्या कांहीं इतकी सुरेख नसेल.' शेवटीं कोण अधिक सुंदर ह्याचा निकाल लावण्याकरितां दोघांमध्यें असें ठरलें कीं, यक्षानें राजकन्येला राजपुत्राच्या खोलींत घेऊन यावें व मग तुलना करून ठरवावें. त्याप्रमाणें त्या यक्षानें चीनच्या राजकन्येच्या कोठडींत जाऊन व मंत्रविद्येनें तिला भारून अचानक उचलून राजपुत्राच्या पलंगावर आणून ठेविलें. तेव्हां तीं उभयतां इतकीं अनुरूप शोभूं लागलीं कीं, कोण अधिक सुंदर ह्याचा

उलगडा होईना. नंतर त्या दोघांपैकीं जें दुसऱ्यावर अधिक मोहित होईल तें कमी सुंदर असें ठरवून त्यांनीं त्यांना आळीपाळीनें जागें करण्याचें ठरविलें.

पहिल्यानें यक्षिणीनें पिसवेचें रूप घेऊन राजपुत्राच्या मानेला चावा घेतला, त्याबरोबर तो दचकून जागा झाला. मानेवर हात चोळीत असतां त्याचा धक्का राजकन्येला लागला. त्याबरोबर तो चपापून उठून बसला. पाहतो तों एक अप्रतिम लावण्यवती तरुणी आपल्या शेजारीं निजली आहे. तिचें रूप तो एकसारखें पाहातच राहिला. तो मनांत म्हणाला, 'बाबा ह्याच स्त्रीशीं लग्न करण्यास मला सांगत होते काय ? मग त्यांनीं मला ही अगोदरच कां नाहीं दाखविली ? मी खचित सांगतों कीं, ही जर स्त्री मिळेल तर मी आतां एका पायावर लग्न करण्यास तयार होईन.' नंतर त्यानें तिला जागी करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु मंत्रानें भारली असल्यामुळें ती जागी झाली नाहीं. शेवटीं तिची आंगठी आपल्या बोटांत व आपली आंगठी तिच्या बोटांत घालून तो पुनः तिच्या शेजारीं झोंपीं गेला.

मग यक्षिणीनें कामर्लजेमान यास मंत्रानें भारून टाकलें व त्या यक्षानें राजकन्येस पिसूच्या रूपानें चावा घेऊन जागें केलें. ती डोळे उघडून पाहते तों शेजारीं पुरुष निजलेला. त्याला पाहून ती एकदम चकित होऊन उठून बसली. त्याचें तें अप्रतिम लावण्य व मदनासारखें शरीर पाहून ती मोहित झाली व मनांत म्हणाली, 'हा पति जर मिळेल तर मी आतांच

लग्नास रुकार देईन. ह्याला बाबांनीं तर नाहीं ना माझ्याकडे पाठविलें ? त्यांनीं मला हें प्रथमच सांगितलें असतें, तर मी कबूल झालें असतें.' नंतर ती त्याला जागें करूं लागली परंतु तो कांहीं उठेना. तो जागा होत नाहीं असें पाहून निराशेनें तिनें त्याचा हात आपल्या गळ्यांत घालण्यासाठीं उचलला तों, त्याच्या हातांत आपल्या आंगठीसारखी आंगठी तिला दिसली. तिनें न्याहाळून पाहिलें तेव्हां ती आपलीच आंगठी असें तिला कळलें. नंतर स्वतःच्या बोटाकडे पाहते तों तेथें दुसरीच आंगठी दिसली. ह्या आंगठ्यांच्या अदलाबदलीवरून तिच्या मनाची खात्री झाली कीं, आपलें ह्याच पुरुषाशीं लग्न होणार असलें पाहिजे. शेवटीं 'आतां सकाळपर्यंत हा येथेंच राहणार तेव्हां आतां न कां होईना जागा!' असें म्हणून ती पुनः झोंपीं गेली.

शेवटीं राजपुत्रच अधिक सुंदर असें कबूल करून त्या यक्षानें राजकन्येला पूर्वीप्रमाणें अलगज उचलून तिच्या महालांत नेऊन ठेविलें व तीं दोघें आपआपल्या निवासस्थानीं निघून गेलीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं कामर्लजेमान उठून पाहतो तों रात्रीं त्याच्या शेजारीं निजलेली सुंदरी त्याला कोठें दिसेना. नंतर त्यानें चाकरास विचारिलें, 'रात्रीं जी स्त्री माझ्या पलंगावर निजली होती ती कोण ? ती तेथें कशी आली ? तिला कोणीं आणली ?' हे प्रश्न ऐकून चाकरास अचंबा वाटला. त्याला ह्यापैकीं कांहींच माहीत नसल्यामुळें तो म्हणाला, 'महाराज,

ती स्त्री मला मुळींच माहीत नाहीं. ती येथें आली असली तर मला कळल्याशिवाय कसें राहील ?' परंतु हें आपल्या वडिलांचें कारस्थान असावें व तें ह्याला ठाऊक असलेंच पाहिजे, असें राजपुत्राला वाटत असल्यामुळें त्यानें त्याला धाकदपटशा देऊन कबूल करण्यास सांगितलें व शेवटीं त्याला यथेच्छ चोपलें, तरीही तो कबूल होईना. तेव्हां त्यानें त्याच्या गळ्यास दोर बांधून त्याला विहिरींत सोडलें व कबूल न केल्यास बुडविण्याचा धाक घातला. शेवटीं त्या चाकरानें केवळ जीव वांचविण्याकरितां 'सर्व कांहीं सांगतों, मला जीवदान द्या' असें म्हटलें. तेव्हां राजपुत्रानें त्याला वर काढिलें. नंतर चाकर म्हणाला, 'सरकार, मला ती गुप्त गोष्ट राजेसाहेबांच्या हुकुमाशिवाय फोडतां येणार नाहीं. मी त्यांची परवानगी घेऊन येतों.' राजपुत्रानें त्याला लवकर परत येण्यास बजावून जाऊं दिलें. तो धावतच राजाकडे जाऊन म्हणाला, 'महाराज, युवराजांच्या बुद्धीला चळ झाला आहे असें मला वाटतें.' असें म्हणून त्यानें सर्व हकीकत त्यास सांगितली. प्रधान जवळ होताच. राजानें त्याला खरी हकीकत पाहून येण्यास हुकूम केला. चाकराबरोबर प्रधान राजपुत्राकडे आला. त्यालाही राजपुत्रानें तसेच प्रश्न करून त्या स्त्रीविषयीं माहिती विचारिली आणि 'त्या स्त्रीशीं जर बाबा माझें लग्न करून देतील तर मी लग्नाला कबूल आहें,' असें त्यानें त्याला काकुळतीनें सांगितलें. परंतु प्रधान तरी त्यास काय माहिती सांगणार ? त्याच्याकडून कांहीं

माहिती कळत नाहीं असें पाहून कामर्लजेमान खवळला आणि त्यानें त्याची दाढी धरून त्याला यथास्थित बुकललें. अखेरीस मोठ्या युक्तीनें थाप मारून त्यानें आपली सुटका करून घेतली. प्रधानानें राजाकडे जाऊन सर्व हकीकत सांगितली; तेव्हां राजा स्वतः पुत्राच्या भेटीस गेला. राजपुत्र राजास अदबीनें सलाम करून उभा राहिला. तेव्हां राजानें त्यास शेजारीं बसविलें व प्रेमानें सर्व हकीकत विचारिली. ती त्यानें साद्यंत सांगितली आणि म्हणाला, 'महाराज, त्या स्त्रीशीं आपण माझें लग्न करून द्यावें. तिच्याशिवाय मला चैन पडत नाहीं.' नंतर राजानें 'आपण अशा प्रकारची कोणी स्त्री तुजकडे पाठविली नाहीं. तुला स्वप्न पडलें असेल. तुझी ही भ्रांति काढून टाक,' वगैरे पुष्कळ सांगून पाहिलें. परंतु राजपुत्र म्हणाला, 'महाराज, स्वप्न म्हणावें तर ही माझ्या हातांतली आंगठी पहा. माझी आंगठी आपल्या ओळखीची आहे. तिच्या जागीं ही जनानी आंगठी माझ्या हातांत कशी आली ? तेव्हां जरी मी आपणापुढें बोलणें योग्य नाहीं तरी नाइलाज म्हणून बोलतों कीं, त्या अद्भुत लावण्यवती स्त्रीशीं आपण जर माझें लग्न लावून द्याल तरच मी वांचेन, नाहीं तर माझी धडगत नाहीं.' पुत्राची ही स्थिति पाहून राजास फारच वाईट वाटलें. त्या स्त्रीचें नांव, गांव, पत्ता कांहींच माहीत नसल्यामुळें त्याची मति गुंग होऊन गेली. शेवटीं तिच्या विरहानें राजपुत्र झुरणार व त्याच्या दुःखानें आपण झुरणार असें जाणून तो मोठ्या

दुःखी अंतःकरणानें राजपुत्रास राजवाड्यांत घेऊन आला. तो नेहमीं राजपुत्राचे बिछान्याशीं बसून राहूं लागला. राज्यकारभारावरून त्याचें मन अगदीं उडालें व राजपुत्रही विरहानें झुरणीस लागून बिछान्यास खिळून राहिला.

इकडे चीनच्या राजकन्येची हकीकत काय झाली ती ऐका. ती सकाळीं उठून पाहते तों तिला आपला प्रियकर दिसेना. तेव्हां तिनें दासींना हांका मारिल्या व ‘ तो सुंदर पुरुष कोण ? कसा आला ? कोणीं पाठविला ? ’ वगैरे प्रश्न विचारूं लागली. मुख्य दासी चकित होऊन म्हणते, ‘ काय, बाई आमची थट्टा करतेस ? येथें पुरुष येणार कोण आणि कसा ? आणि तो आम्हांला कसा दिसणार नाहीं ? तुला स्वप्नबिप्न-तर नाहीं ना पडलें ? का चळ लागला आहे ? ’ तें ऐकून ही कपटानें आपल्यापासून खरी गोष्ट चोरून ठेवते असें वाटून राजकन्या खवळली व त्या मुख्य म्हाताऱ्या दासीला धरून म्हणाली, ‘ थेरडे, मला फसविलेंस तर तुझें कपाळच फोडून टाकीन. ’ असें म्हणून तिनें तिचें डोकें भिंतीवर जोरानें आपटलें. बिचारीनें मोठी धडपड करून आपली सुटका करून घेतली आणि ती राणीला सांगण्याकरितां धावली. तिनें सांगितलेली सर्व हकीकत ऐकून राणीही चिंतातुर झाली व लगेच मुलीला भेटण्यास तिच्या महालांत गेली. राजकन्येनें योग्य सन्मानानें आईला प्रणाम केला व तिनें विचारलेल्या प्रश्नास उत्तर म्हणून म्हणाली, ‘ आई, तूं माझी चेष्टा करूं नको. मी तुला खरें सांगतें कीं, काल रात्रीं माझ्या

शेजारीं जो तरुण देखणा पुरुष निजला होता त्याच्याशीं माझें लग्न करून दिल्यावांचून मला चैन पडणार नाहीं. नाहींतर कांहीं माझी धडगत नाहीं.' राणी म्हणाली, 'अग इतक्या पहाऱ्यांतून येथें परपुरुष येईल कसा ? तुला कांहींतरी भ्रम झाला आहे तो तूं काढून टाक व स्वस्थ रहा.' शेवटीं ती आईवरही रागावली आणि तिनें मोठा अनर्थ मांडला. तेव्हां राणीनें सर्व हकीकत राजास सांगितली. राजा तावडतोब कन्येच्या समाचारास आला. त्यालाही राजकन्येनें तेंच सांगितलें व आपल्या हातांतील मर्दानी आंगठी दाखवून म्हणाली, 'ह्या आंगठीवरून तरी आपली खात्री होईल कीं नाहीं ?' आंगठी पाहून राजास अधिकच आश्चर्य वाटलें, त्याला कांहीं सुचेना. शेवटीं ती वेडी झाली असें ठरवून व तिनें दुसऱ्यास उपद्रव करूं नये म्हणून तिच्या पायांत बिड्या घालून त्यानें तिला अधिकच बंदोबस्तांत ठेविलें. आणि दरबारांत सर्व लोकांना राजकन्येची स्थिति जाहीर करून 'कोणी मांत्रिक तिला बरी करील तर त्याला मी राजकन्या व माझें राज्य बक्षीस देईन. मात्र गुण न येईल त्याचा शिरच्छेद होईल,' असा आपला निश्चय जाहीर केला.

राजकन्येला पिशाचबाधा झाली असेल अशा समजुतीनें कित्येक तरुण मांत्रिकांनीं प्रयत्न केला व अखेरीस बिचारे मृत्युमुखीं पडले. अशा रीतीनें शेंपन्नास मांत्रिकांचीं शिरें राजानें काठ्यांवर अडकवून शहराच्या निरनिराळ्या भागांत उभीं करविलीं. हेतु हा कीं, अविचारानें कोणी मृत्युमुखीं पडूं नये.

त्या राजकन्येची जी म्हातारी दाई होती तिचा मार्जवन नांवाचा मुलगा होता. लहानपणीं तो व राजकन्या दोघेंही दाईच्या अंगावर दूध पीत असत. पुढें मोठीं झाल्यावर त्या दोघांची ताटातूट झाली. तथापि त्या दोघांचें एकमेकांवर सख्ख्या भावंडांप्रमाणें प्रेम होतें. मार्जवन मोठा झाल्यावर अनेक तऱ्हेच्या विद्या व कला शिकला व आपलें ज्ञान अधिक वाढवावें म्हणून त्यानें देशपर्यटन करून कित्येक देश पाहिले व थोर थोर पुरुषांशीं ओळखी करून घेतल्या. अशा रीतीनें आज कित्येक वर्षें तो जो बाहेर देशीं होता तो याच सुमारास स्वदेशीं आला. त्यानें शहरांत जागोजाग काठ्यांवर उभारलेलीं शिरें पाहिलीं आणि आश्चर्यानें त्या प्रकाराबद्दल चौकशी केली. तेव्हां त्याला आपली दूधबहीण राजकन्या बदूरा हिचें वर्तमान सहजच समजलें. पुढें तो घरीं आल्यावर आपल्या आईला भेटला व त्यानें राजकन्येविषयीं चौकशी केली. तेव्हां आईनें डोळ्यांत पाणी आणून तिच्या दुःखकारक स्थितीचें वर्णन केलें. तेव्हां मार्जवननें 'माझी व तिची एकदां भेट करून देशील तर तिची हकीकत समजून घेऊन मी तिचें दुःख नाहींसें करण्याचा उपाय करीन,' असें आपल्या आईस सांगितलें. तिनें मुख्य जमादारास भेटून त्यास सांगितलें, 'जमादारसाहेब, राजकन्येची लहानपणची मैत्रीण, माझी मुलगी, आली आहे. तिची राजकन्येला भेटण्याची इच्छा आहे. राजकन्याही तिची कित्येक वेळां आठवण काढते. तरी तुम्ही तिला भेटण्यास परवानगी द्याल का?' जमादारानें

विशेष आढेवेढे न घेतां परवानगी दिली. नंतर तिनें मार्जवन ह्यास स्त्रीचा वेष देऊन त्याला राजकन्येच्या भेटीस नेलें व तिला खरी हकीकत कळवून 'मार्जवन तुझ्या भेटीस आला आहे' असें सांगितलें. तिनें मोठ्या आनंदानें व प्रेमानें त्याची भेट घेतली व इतके दिवसांत आपणास एखाद्या पत्रानेंही खुशाली न कळविल्याबद्दल त्यास दोष दिला. मार्जवननेंही आपल्यावरील तिच्या ममतेबद्दल तिचे फार उपकार मानिले व 'मी पुष्कळ मंत्रविद्या शिकलों आहें तेव्हां मी आपणास खात्रीनें बरें करतों,' असें सांगून त्यानें लिंबें, धूप, वगैरे पदार्थ, जे त्यानें मुद्दाम बरोबर आणले होते ते, बाहेर काढून त्यांची मांडामांड सुरू केली. राजकन्येच्या तें लक्षांत येतांच ती म्हणाली, 'अरे, इतरांप्रमाणें तूंही मूर्खपणा करूं नको. माझी हकीकत नीट ऐकून घे.' असें म्हणून तिनें, राजपुत्राची भेट, आंगठ्यांची अदलाबदल, वगैरे घडलेल्या गोष्टी साद्यंत त्याला निवेदन केल्या. त्या सर्व ऐकून राजकन्येला खरोखर कसलें दुःख होत आहे, ह्याविषयीं त्याला बरोबर कल्पना झाली. आणि तो विचार करून म्हणाला, 'ताईसाहेब, आपणास ज्या पुरुषाचा ध्यास लागला आहे त्याचा तपास करून मी त्याची व आपली भेट खात्रीनें करून देतों. आपण धीर सोडूं नये. मी ह्या कामगिरीवर उद्यांच निघतों.' असें तिला आश्वासन देऊन व तिचा प्रणामपूर्वक निरोप घेऊन तो परत आला व दुसऱ्या दिवशीं पहाटेस देशपर्यटन करण्यास चालता झाला.

तो कित्येक शहरें, प्रांत, बेटें पहात चालला असतां जेथें तेथें राजकन्या बदूरा हिच्या वेडासंबंधींची गोष्ट त्याच्या कानीं येई. सुमारें चार महिन्यांनीं तो तार्फ नांवाच्या एका समुद्रकांठच्या शहरांत पोहोंचला. तेथें मात्र त्यास राजकन्येची हकीकत कानीं न येतां राजपुत्र कामर्लेजेमान ह्याच्यासंबंधीं गोष्टी ऐकूं येऊं लागल्या. तेव्हां मार्जवनास मोठा हर्ष होऊन त्यानें राजपुत्राच्या ठावठिकाणासंबंधीं योग्य तपास केला आणि एका सावकारी गलबतांत बसून तो शहाजेमान राजाच्या राजधानीस जाण्यास निघाला. योग्य वेळीं तें गलबत किनाऱ्याजवळ आलें व आतां बंदरांत शिरणार इतक्यांत अकस्मात् एका खडकांत अडकून तें फुटलें. तथापि मार्जवन पटाईत पोहणारा होता व किनारा जवळच होता. यामुळें तो पोहत किल्ल्याच्या तटाजवळ गेला. किल्ल्यांतील पाहरेकऱ्यांनीं ताबडतोब होडी लोटून मार्जवनास कांठावर आणिलें. ह्याच किल्ल्यांत राजा शाहजेमान आपल्या पुत्रास आराम पडावा म्हणून त्याच्यासह येऊन राहिला होता. त्याचा वजीरही तेथें आला होता. त्याच्या हुकुमानें प्रवाशास कोरडीं वस्त्रें देण्यांत येऊन वजिरापुढें आणण्यांत आलें. वजिरानें त्याला अनेक प्रश्न विचारिले. त्यांचीं त्यानें समर्पक उत्तरें दिलीं. त्यांवरून हा पुरुष मोठा सभ्य व चतुर असून पुष्कळ मुलूख फिरलेला आहे, अशी त्याची खात्री झाली. नंतर तो त्यास म्हणाला, ‘ काय हो, तुम्ही मंत्रविद्या वगैरे जाणणारे दिसतां. तेव्हां आमच्या राजपुत्रास कांहीं उपाय

करून बरें करूं शकाल काय? त्याला अलीकडे बरेच दिवसांपासून भ्रम झाला आहे.' मार्जवन म्हणाला, 'त्याचा विकार काय हें समजलें, तर उपाय करतां येईल.' त्यावर प्रधानानें कामर्लजेमान ह्याची मूळापासून सर्व हकीकत त्यास सांगितली. ती ऐकून मार्जवनास मोठा हर्ष झाला. त्याची पक्की खात्री झाली कीं, राजकन्या बदूरा हिचें ज्याच्यावर इतकें मन बसलें आहे, तो हा कामर्लजेमानच होय. नंतर राजपुत्राची गांठ घालून देण्यास त्यानें प्रधानास सांगितलें. प्रधानानें राजाच्या संमतीनें त्यास राजपुत्राच्या खोलींत नेलें.

राजपुत्र कामर्लजेमान बिछान्याला अगदीं खिळून गेला होता. तो अत्यंत कृश झाला होता. तथापि त्याचा चेहरा इतका सुंदर दिसत होता कीं, मार्जवनला त्याचें राजकन्येच्या चेहऱ्याशीं विलक्षण साम्य पाहून फार आश्चर्य वाटलें. इतक्यांत राजपुत्रानें डोळे उघडले. ती संधि साधून मार्जवननें एक श्लेषार्थाची कविता रचून ती मोठ्या सुरावर गाइली. तिचा वरवर अर्थ राजपुत्राच्या स्तुतिपर होता. परंतु राजकन्या बदूरा हिच्या विरहाचा त्यांत गूढ अर्थ होता. ती कविता ऐकून राजपुत्रास वाटलें कीं, ह्या मनुष्यास आपली प्रिय स्त्री खात्रीनें ठाऊक असली पाहिजे. त्या विचारानें त्याच्या तोंडावर विशेष टवटवी आली. नंतर त्यानें मार्जवनास जवळ बोलाविलें व राजास खुणेनें बाहेर जाण्यास सुचविलें. एकांत मिळाल्यावर मार्जवन राजपुत्राच्या कानांत म्हणाला, 'महाराज. आपण ज्या सुंदरीबद्दल शोक करीत आहां ती मला माहीत

आहे. तिचें नांव बदूरा. ती चीनची राजकन्या आहे. तिनें सांगितलेली स्वतःची हकीकत व प्रधानजींनीं सांगितलेली तुमची हकीकत ऐकून मला वाटतें कीं, तुमचीच दोघांची त्या रात्रीं गांठ झाली असावी. तुम्ही जसें तिजकरितां दुःख भोगीत आहां, तसेंच तीही तुमच्याकरितां भोगीत आहे. तिला सुखी करणें सर्वस्वीं तुमच्याच हातीं आहे. तेव्हां होईल तितकी त्वरा करून आपण तिकडे चलावें. मात्र त्यापूर्वीं आपली प्रकृति सुधारून प्रवासास योग्य झाली पाहिजे.' ह्या भाषणानें राजपुत्रास अतिशय हुशारी वाटली. तो उठून बसला व बापास हांक मारून त्याच्याशीं मोठ्या उमेदीनें बोलला. राजाला त्यामुळें पराकाष्ठेचा आनंद झाला व त्यानें राज्यांत जिकडे तिकडे मोठा उत्सव करण्यास हुकूम सोडले. आपली इच्छित स्त्री मिळण्याची आशा उत्पन्न झाल्यामुळें राजपुत्राची प्रकृति भराभर सुधारूं लागली. सुमारें एक महिन्यांत तो कसलेही श्रम सहन करण्यास समर्थ झाला. नंतर त्यानेंच मार्जवनास एकीकडे नेऊन म्हटलें, 'मित्रा, माझ्या प्रियेची भेट घेण्याकरितां मी आतांच निघण्यास तयार आहें. परंतु मला इतक्या लांबच्या प्रवासाची बाबा परवानगी देतील कीं नाहीं, ही शंका आहे. तेव्हां तूं जर कांहीं युक्ति शोधून काढशील तरच माझी प्रिया मला भेटणें शक्य होईल.' इतकें बोलतांना त्याचा गळा अगदीं भरून येऊन डोळ्यांतून अश्रू गळूं लागले. मार्जवननें त्याचें सांत्वन केलें व सांगितलें, 'तूं वडिलांजवळ एक दोन दिवस शिकारीस जाण्याची

परवानगी माग. मग मी सर्व युक्ति जुळवितों.' त्याप्रमाणें कामर्लजेमान ह्यानें बापाजवळ शिकारीस जाण्याची परवानगी मागितली. शेवटीं मोठ्या मुष्किलीनें एक दिवसाची परवानगी मिळाली. नंतर ते दोघे तयारी करून व बरोबर पुष्कळ द्रव्य घेऊन निघाले. त्यांनीं एका मोठ्या अरण्याचा रस्ता धरला व संध्याकाळ होतांच एका ठिकाणीं मुक्काम ठोकला. तेथें चाकरांनीं जेवण तयार केल्यावर सर्वांचें जेवण होऊन ते दोघे बरीच रात्रपर्यंत गोष्टी बोलत बसले. चाकर बिचारे केव्हांच झोपीं गेले होते. मध्यरात्र उलटल्यावर मार्जवननें राजपुत्रास दुसरा पोशाक करण्यास सांगून त्याचा पहिला पोशाक एका बोचक्यांत बांधला. नंतर चाकरांपैकीं एकाचा रिकामा घोडा बरोबर घेऊन ते दोघे आपआपल्या घोड्यांवर स्वार झाले व भलत्याच वाटेनें निघाले. बरेच दूर गेल्यावर एका ठिकाणीं दोन तीन रस्ते फुटले होते, तेथें ते थांबले. तेथें मार्जवननें तो तिसरा घोडा ठार मारून त्याच्या रक्तांत राजपुत्राचा बोचक्यांतील पोशाक भिजविला व तो तेथेंच फेकून देऊन ते पुनः वेगानें चीन देशास जाण्याकरितां निघाले. वाटेंत असें करण्याचें कारण राजपुत्रानें विचारल्यावरून मार्जवन म्हणाला, 'आपण परत गेलों नाहीं हें पाहून राजा आपल्या तपासास चोहोंकडे माणसें पाठवील. त्यांना हा पोशाक व घोडा पाहून सहजच असें वाटेल कीं, राजपुत्रास कोणी वन्य पशूनें मारून खाल्लें असावें. अर्थात्‌च मग ते तपास करण्याचें सोडून देतील. अशा रीतीनें आपला मार्ग [illegible]

होईल.' पुढें कित्येक दिवस प्रवास केल्यावर कोणत्याही प्रकारचें संकट न येतां ते चीन देशास पोहोंचले.

राजधानीस पोंचल्यावर मार्जवननें कामर्लजेमानास एका मुशाफरखान्यांत उतरविलें. दोन तीन दिवस विसांवा घेतल्यावर त्यानें राजपुत्राला मांत्रिकाचा वेष दिला व त्यास तो राजवाड्याकडे घेऊन गेला. त्यापूर्वीं त्यानें आपल्या आईला भेटून आपण कृतकार्य होऊन आल्याबद्दल व पर्यायानें राजकन्येला कळविण्याबद्दल सूचना पाठविली होती. राजवाड्याशीं गेल्यावर मार्जवननें शिकविल्याप्रमाणें कामर्लजेमान मोठ्यानें ओरडून म्हणाला, 'अहो, मी मांत्रिक आहें. मी राजकन्येला बरी करतों. न केल्यास मी शिक्षा भोगण्यास तयार आहें.' बऱ्याच दिवसांनीं हा मांत्रिक मरावयाला आलेला पाहून लोकांना आश्चर्य वाटलें व त्यांनीं त्याचें मन वळविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; परंतु तो ऐकेना. शेवटीं मुख्य वजीर त्यास दरबारांत राजाकडे घेऊन गेला. रीतीप्रमाणें कामर्लजेमान त्यास साष्टांग नमस्कार घालून उभा राहिला. त्याला पाहून राजाला फार दया आली व त्यानेंही त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. तेव्हां राजपुत्र म्हणाला, 'मी जो हेतु धरून इतक्या लांब आलों, तो सोडून दिला तर लोक मला मूर्ख म्हणतील. माझी खात्री आहे, म्हणूनच मी हें काम करण्यास धजत आहें.' तेव्हां राजानें राजकन्येच्या पहाऱ्यावरील मुख्य खोजास बोलावून त्याच्याबरोबर राजपुत्रास त्यानें राजकन्येच्या महालाकडे पाठविलें. तेथें गेल्यावर

'मी राजकन्येला न पाहतां येथूनच खरी करतों' अशी त्या खोजास बतावणी करून त्यानें आपल्याजवळच्या पेटींतून लिहिण्याचें सामान काढिलें व एक चिठी लिहून तयार केली. तुझा वियोग झाल्यापासून आपण कसे झुरत आहों व तुझ्या भेटीकरितां किती उत्सुक झालों आहों वगैरे मजकूर लिहून ती चिठ्ठी एका लखोट्यांत घालून व हळूच त्यांत आपल्या बोटांतील आंगठी घालून तो लखोटा त्यानें बंद केला आणि राजकन्येकडे पाठविला.

राजकन्येनें तो लखोटा अडखळतच फोडला. परंतु आंगठी दृष्टीस पडतांच ती झटकन उठली. त्या आवेशांत तिनें पायांतील बेड्यांच्या सांखळ्या तोडून टाकिल्या आणि दार उघडलें. तिची व राजपुत्राची दृष्टादृष्ट होतांच दोघांनीं धावून एकमेकांच्या गळ्यास घट्ट मिठ्या मारिल्या व किती वेळ तरी तीं एकमेकांना पाहत राहिलीं. नंतर त्यास नेऊन राजकन्येनें पलंगावर बसविलें आणि ती आंगठी त्यास परत देऊन म्हणाली, 'ज्याअर्थीं तुमची आंगठी मजजवळ आहे व ती मी जिवांत जीव आहे तोंपर्यंत परत देऊं इच्छित नाहीं, त्याअर्थीं ही माझी आंगठी तुमच्याजवळ असणेंच योग्य आहे.'

नंतर त्या खोजानें जाऊन राजास ती घडलेली हकीकत सांगितली. त्याबरोबर तो धावतच तेथें आला. त्यानें आपल्या मुलीला प्रेमानें पोटाशीं घट्ट धरून तिचें मस्तक हुंगलें. नंतर राजपुत्राच्या हातांत तिचा हात देऊन म्हटलें,

'मुला, मी प्रतिज्ञेप्रमाणें हिच्याशीं तुझें लग्न करून देतों. परंतु तुझी हकीकत एकदां मला सांग.' राजपुत्र कामर्लजेमान ह्यानें अत्यंत नम्रपणानें राजाचे आभार मानले आणि लहानपणापासूनची आपली सर्व हकीकत सांगून म्हटलें, 'महाराज, आपल्या प्रख्यात कुळाशीं शरीरसंबंध व्हावा म्हणून मी पंचाक्षऱ्याचें सोंग घेतलें होतें.' राजाला ती अद्भुत हकीकत ऐकून फार विस्मय वाटला. नंतर त्याच दिवशीं कामर्लजेमान व बदूरा ह्यांचें मोठ्या थाटानें लग्न झालें. त्या आनंदाप्रीत्यर्थ सर्व राज्यांत जिकडे तिकडे उत्सव झाले. राजानें बहुत दानधर्म केला, मेजवान्या दिल्या. तीं वधूवरें सुमारें एक महिना चाललेल्या त्या उत्सवरूप सुखामृताच्या समुद्रांत निमग्न होऊन गेलीं.



८

# हरवलेला ताईत

मागें सांगितल्याप्रमाणें आपल्या प्रिय व लावण्यवती स्त्रीबरोबर राहत असतां, कामर्लजेमान ह्यास एके रात्रीं फार वाईट स्वप्न पडलें. ‘ आपला बाप शाहजेमान अगदीं मरावयास टेंकला आहे व त्याला सारखा आपला ध्यास लागला आहे,’ असें त्यानें पाहिलें. त्याबरोबर तो दचकून जागा झाला व त्यानें दुःखानें उसासा टाकिला. तो ऐकून राजकन्याही जागी झाली. लगेच पतीच्या दुःखाचें कारण तिनें विचारलें. कामर्लजेमान ह्यानें आपलें भयंकर स्वप्न तिला सांगितलें व पित्यास भेटावयास जाण्याची इच्छा दर्शविली. तिचे पतीवर पंचप्राण असल्यामुळें तीही त्याजबरोबर जाण्यास सिद्ध झाली. नंतर मोठ्या कष्टानें चीनच्या राजानें त्यांस जाण्याची परवानगी दिली व एक वर्षानें परत येण्याविषयीं बजावून सांगितलें. तयारी झाल्यावर त्या दोघांस पोंचविण्याकरितां राजा बराच दूर गेला होता. शेवटीं त्यांना निरोप देऊन मोठ्या दुःखानें तो परत फिरला व राजपुत्र आपल्या पत्नीसह पुढें निघाला.

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. २०४७ दिनांक ७/४/७६
विषय बा. पा. क्र. ........




तळहातावर तो ताईत ठेवून न्याहाळून पाहूं लागला. इतक्यांत आकाशांतून एका पक्ष्यानें झडप घालून तो ताईत उचलून नेला.

तो झपाट्यानें प्रवास करूं लागला. सुमारें एक महिना लोटला. एक दिवस एका विस्तीर्ण मैदानांत झाडांच्या गर्द छायेंत त्यांचा मुक्काम पडला. राजकन्या आपल्या तंबूमध्यें गेली व दासीकडून आपल्या कमरेचा पट्टा सोडवून विश्रांति घेत पलंगावर पडली, तों तिला लागलीच झोंप लागली. आपल्या लोकांची नीट व्यवस्था लाविल्यावर राजपुत्र तंबूंत आला. तोही तिच्या शेजारीं निजणार इतक्यांत तो कंबरपट्टा त्यास दिसला. त्यानें तो सहज उचलून घेतला तों त्याला एक पिशवी बांधलेली दिसली. ती सोडून आंत पाहतो तों तींत एक माणकाचा ताईत असून त्यावर कांहीं चमत्कारिक अक्षरें व आकृति आहेत असें त्यास आढळलें. तंबूंत उजेड कमी होता. म्हणून तो तंबूबाहेर उघड्यावर आला व तळहातावर तो ताईत ठेवून न्याहाळून पाहूं लागला. इतक्यांत आकाशांतून अकस्मात् एका पक्ष्यानें झडप घालून तो ताईत उचलून नेला. राजपुत्राला तें पाहून फार वाईट वाटलें. राजकन्येला तिच्या आईनें तो मंतरलेला ताईत निघतांना दिला होता. तो जवळ असेपर्यंत तिला कसलीही बाधा होणार नाहीं, असा त्याचा प्रभाव असल्यामुळें ती त्याला फार जपत असे. असें असल्यामुळें, ती आपणास काय म्हणेल ? व किती रागावेल ? ह्या भीतीनें त्या पक्ष्याकडून तो ताईत परत मिळवावा म्हणून तो त्याच्या मागोमाग चालला. थोड्या अंतरावर जाऊन बसावें व राजपुत्र जवळ गेला कीं, पुनः उडून दूर जाऊन बसावें, असें चाळवीत त्या पक्ष्यानें राजपुत्राला बरेंच दूर नेलें. शेवटीं

त्यानें तो ताईत गिळून टाकला. तथापि हुलकावण्या देत तसाच पुढें पुढें चालला. त्यास नेम धरून मारावें, म्हणून राजपुत्रानें धोंडा हातांत घेतला व त्याच्या मागून कित्येक दऱ्या व मैदानें ओलांडलीं. शेवटीं संध्याकाळ झाली तेव्हां तो पक्षी एका झाडाच्या शेंड्यावर बसला. राजपुत्राला आपण बरेच लांब आलों हें कळलें; परंतु काळोखांत परत गेलों तर वाट चुकून भलतीकडेच जाऊं म्हणून रात्रीं तो त्याच झाडाखालीं झोंपला. सकाळीं पुनः तो त्या पक्ष्याच्या पाठीस लागला. संध्याकाळपर्यंत पाठलाग करून, शेवटीं ज्या झाडावर पक्षी बसला त्याच्याखालीं तो झोंपला. ह्याप्रमाणें सारखे दहा दिवस तो त्या पक्ष्याच्या मागें धावत होता. अकराव्या दिवशीं एक शहर लागलें व पक्षी त्या शहराच्या तटाच्या आंत उडून गेला. त्यामुळें राजपुत्राची ताइताविषयीं निराशा झाली.

नंतर बिचारा राजपुत्र खिन्न अंतःकरणानें त्या शहरांत शिरला. तेथें उतरण्यास ठिकाण शोधतां शोधतां एका नदीच्या कांठीं एक म्हातारा माळी राहत होता त्याच्याकडे तो गेला. तो म्हातारा फार सज्जन होता. त्यानें तो भुकेला पाहून अगोदर त्याला आपल्या झोंपडींत नेलें व जेवावयास वाढलें. पोटभर जेवण होऊन थोडी विश्रांति घेतल्यावर माळ्यानें त्याची सर्व हकीकत विचारून घेतली. नंतर राजपुत्र त्यास म्हणाला, 'म्हातारे बाबा, माझ्या बापाच्या नगरास जाण्यास जवळचा रस्ता कोणता बरें? आतां राजकन्या वगैरे मंडळी तिकडेच

गेलीं असतील. तेव्हां मींही आतां तिकडेच जावें हें बरें.' म्हातारा म्हणाला, 'मुला, जवळचा मार्ग समुद्रांतून आहे. एथून एबनी बेटांत गेलें म्हणजे तेथून तुला आपल्या नगरास सहज जातां येईल. या बंदरांतून एक गलबत दरवर्षी त्या बेटास जात असतें. परंतु तें नुकतेंच गेलें आहे. तेव्हां आतां एक वर्षभर तुला वाट पाहिली पाहिजे. तूं मजकडे खुशाल रहा. मी यथाशक्ति तुझा सांभाळ करीन.' त्याचें म्हणणें मान्य करण्याशिवाय दुसरा मार्गच नसल्यामुळें राजपुत्र तेथें राहिला. दिवसा बागेंत काम करावें व रात्रीं आपल्या आवडत्या स्त्रीची आठवण करीत व शोक करीत कसा तरी वेळ घालवावा असा त्याचा क्रम चालू झाला.

इकडे राजकन्या बदूरा बऱ्याच वेळानें जागी झाली. पहाते तों जवळ राजपुत्र नाहीं. तिनें दासीला विचारिलें, परंतु तो बाहेर जातांना कोणीच पाहिलें नव्हतें. इतक्यांत कंबरपट्ट्याकडे तिची नजर गेली तों त्याची पिशवी रिकामी असलेली तिला दिसली. त्यावरून तींतील ताईत राजपुत्रानेंच पाहण्यास नेला असावा, तो लवकरच परत येईल असें समजून ती स्वस्थ राहिली. परंतु संध्याकाळ झाली तरी पति आला नाहीं म्हणून तिला फार चिंता उत्पन्न झाली. जो ताईत आपल्या रक्षणाकरितां दिला होता तोच आपल्या नाशास कसा कारण व्हावा ह्याचें तिला आश्चर्य वाटलें व तो मंतरून देणाऱ्या पंचाक्षऱ्याचाही तिला फार राग आला. तथापि तिनें विवेक केला. दूरवर विचार करून, राजपुत्र

नाहींसा झाला ही गोष्ट जर चाकर लोकांत पसरली, तर त्यांस दुष्ट वासना होऊन कदाचित् ते आपला घात करतील, हें जाणून तिनें आपल्या दासीला ही गोष्ट गुप्त राखण्याविषयीं सक्त ताकीद दिली. नंतर तिनें स्वतः राजपुत्राचा पोशाख केला व सकाळीं पुढें कूच करण्याविषयीं चाकरांस हुकूम दिला; त्या उभयतां नवराबायकोच्या रूपांत इतकें विलक्षण साम्य होतें कीं, चाकरांस हा राजपुत्रच आहे असें वाटलें. सर्व तयारी झाल्यावर बदूरेनें एका पालखींत एका दासीस बसविलें व आपण घोड्यावर स्वार होऊन तिच्याबरोबर चालूं लागली. याप्रमाणें कित्येक दिवस प्रवास केल्यावर ती सर्व मंडळी जलमार्गानें एबनी बेटावर येऊन पोहोंचली. तेथें त्यांनीं असें जाहीर केलें कीं, खालदन द्वीपांचा राजपुत्र कामर्लजेमान हा तुफान झाल्यामुळें चार दिवस मुक्काम करण्यास आला आहे. एबनी बेटाचा राजा आर्मनास ह्याला ती बातमी समजतांच त्यानें सामोरें जाऊन राजपुत्रास आपल्या दरबारीं आणिलें व त्याचा मोठा सत्कार केला. कांहीं दिवस उत्कृष्ट पाहुणचाराचा उपभोग घेतल्यावर पुरुषवेषधारी-राजकन्येनें स्वदेशीं जाण्याची परवानगी मागितली. तथापि आर्मनास राजा त्याच्या सद्गुणांवर फारच मोहून गेल्यामुळें तो त्यास जाऊं देईना. शिवाय आपली रूपगुणसंपन्न कन्या जीवनकला हिला असा सुंदर नवरा दुसरा मिळणार नाहीं असें जाणून तिचा स्वीकार करण्याविषयीं राजानें त्यास विनंति केली. ह्या प्रश्नामुळें बदूरा फारच पेंचांत पडली; तथापि ती फार धीराची

होती. तिनें प्रसंग जाणून त्या गोष्टीस संमति दिली आणि लगेच दुसऱ्या दिवशीं जीवनकलेशीं मोठ्या समारंभानें त्या वेषधारी राजपुत्राचा विवाह झाला. एवनीच्या राजाला मुलगा नसल्यामुळें त्यानें जांवयालाच राज्य द्यावयाचें ठरविलें व एके दिवशीं दरबार भरवून ती गोष्ट जाहीर केली. नंतर त्यानें राजपुत्रास सिंहासनावर बसवून सर्वांनीं यापुढें यांनाच आपले धनी समजावें असें सांगितलें. त्याबरोबर सर्व अमीरउमराव, प्रधान, नोकर, वगैरे सर्वांनीं राजकन्येला मुजरे केले. राज्यांत सर्वत्र समारंभ व उत्सव झाले व मेजवान्यांचा थाट उडाला. येथपर्यंत सर्व ठीक झालें. परंतु खरी परीक्षेची वेळ पुढेंच होती. त्या दिवशीं राजकन्येला फार त्रास झालेला असल्यामुळें रात्रौ ती झोंपीं गेली, ती सकाळपर्यंत उठलीच नाहीं. त्यामुळें जीवनकलेला फार वाईट वाटलें. आणखी दोन तीन दिवस असेच गेले. राजकन्या बदूरा दरबारांत गेल्यावर मात्र मोठ्या चातुर्यानें राज्यकारभाराचें काम पाहत असे. त्यामुळें सर्व अंमलदार व रयत लोक नव्या राजाची फार वाखाणणी करूं लागले. परंतु आपण जीवनकलेची फसगत करीत आहों ही गोष्ट बदूरेच्या मनाला एकसारखी टोंचीत असे. त्यामुळें ती नेहमी अस्वस्थ असे. शेवटीं जीवनकलेनें एके दिवशीं त्या वेषधारी राजपुत्राला स्पष्टच विचारलें कीं, ‘ माझें आपल्यावर एवढें प्रेम असतांना आपलें मात्र माझ्यावर प्रेम नाहीं असें दिसतें. आपण अशी माझी फसवणूक कां करतां ? माझ्या ठिकाणीं आपणास कांहीं दोष दिसतो काय ? आपलें माझ्या-

वर प्रेम नाहीं ही गोष्ट बाबांस समजेल तर आपली फार अप्रतिष्ठा होईल व ती माझ्यानें पाहवणार नाहीं.' ह्या भाषणानें बदूरा निरुत्तर झाली. ती मोठ्या पेंचांत पडली. शेवटीं जीवनकलेच्या मनाच्या थोरपणावर विश्वास टाकण्याचें ठरवून बदूरा दीन स्वरानें म्हणाली, 'राजकन्ये, तूं फार थोर आहेस. मी खरोखर तुझा अपराध केला आहे. त्याची तूं मला क्षमा कर. मी आपली गुप्त गोष्ट तुला सांगतें. ती कृपा करून मनांत राख. एवढें माझें तुझ्यापाशीं पदर पसरून मागणें आहे.' इतकें बोलून तिनें आपली हकीकत तिला सांगितली आणि ती गुप्त राखण्याविषयीं पुनः पुनः विनविलें. तसेंच राजपुत्र कामर्लजेमानचा शोध लागेपर्यंत बाह्य लौकिकांत तूं बायको व मी नवरा असें सर्वांस भासेल असें उभयतांनीं वागावें, अशी तिची प्रार्थना केली.

बदूरेची अद्भुत गोष्ट ऐकून जीवनकलेलाही नवल वाटलें व त्या उभयतांच्या प्रेमाबद्दल कौतुक वाटलें. तिनें वचन देऊन सांगितलें कीं, 'मी ही गोष्ट सदैव गुप्त राखीन. तूं मला आपली जिवाची मैत्रीण समज व तुझा राज्यकारभार पाहण्याचा क्रम सतत चालू ठेव.' इतकें तिनें म्हणतांच बदूरेनें तिच्या गळ्यास मिठी घातली व त्या दोघी सख्या बहिणीप्रमाणें एकमेकींचा विश्वास संपादून झोंपीं गेल्या. पुढें जीवनकलेस आनंदांत पाहून तिच्या आईबापांस आनंद वाटला व बदूरेच्या राज्यकारभारांतील कौशल्याबद्दल तिची चोहोंकडे कीर्ति झाली.

इकडे राजपुत्र कामलेजेमान त्या माळ्याच्या घरीं दिवस काढीत होता. तो एके दिवशीं राजकन्येची आठवण करीत बसला असतां, दोन पक्षी झाडावर भांडत असलेले त्याला दिसले. ते एकमेकांस चोंचींनीं मारीत असतां त्यांपैकीं एक मरून खालीं पडला आणि दुसरा उडून गेला. त्यांचें भांडण दुसऱ्या झाडावर बसलेले दोन पक्षी पाहत होते. ते उडून त्या मेलेल्या पक्ष्याजवळ आले आणि मित्राबद्दल दुःख दर्शविण्या-करितां त्यांनीं आपलीं डोकीं हालविलीं. नंतर त्यांनीं जवळच पायांनीं एक खळगा खणून त्यांत त्या मेलेल्या पक्ष्यास पुरलें व ते उडून गेले. परंतु थोड्याच वेळांत ते आपल्या मित्रास मारणाऱ्या त्या पक्ष्यास पकडून घेऊन परत आले, आणि त्यांनीं त्याला चोंचींनीं ठार मारून त्याच्या पोटांतील आंतडीं बाहेर काढलीं व अशा रीतीनें आपल्या मित्राबद्दल सूड उगविला. राजपुत्रानें तो सर्व प्रकार पाहिला व तो उठून झाडाजवळ गेला; इतक्यांत त्या मरून पडलेल्या पक्ष्याच्या आंतड्यांतून एक लहानशी लाल वस्तु बाहेर आलेली त्याच्या नजरेस आली. ती पाहण्याकरितां त्यानें उचलली तों तो आपल्या बदूरेचा हरवलेला ताईत आहे असें त्यास दिसून आलें. तो मिळाल्याबरोबर त्याला जो हर्ष झाला त्याला पारावार नव्हता. त्यानें देवाचे तर आभार मानलेच पण त्या दोन पक्ष्यांचेही आभार मानिले. ताईत मिळाल्यामुळें आतां आपली प्रिया लवकरच भेटणार अशी त्यास आशा वाटूं

लागली. नंतर तो ताईत पुनः हरवूं नये म्हणून त्यानें तो एका काळ्या दोऱ्यांत ओंवून आपल्या दंडास बांधला.

पुढें एके दिवशीं तो बागेंतील एक वठलेलें झाड तोडीत असतां त्याची कुऱ्हाड एका धातूच्या पत्र्यावर वाजली. तेव्हां तेथील माती उकरून पाहतो तों एक पितळी पत्रा लागला. तो काढतांच त्याखालीं एक भुयाराचा जिना दिसला. तो उतरून खालीं जातो तों, एका चौकोनी कोठडींत पन्नास घागरी रांगेनें मांडलेल्या त्याला दिसल्या. त्यानें त्या सर्व उघडून पाहिल्या तों त्या सोन्याच्या नाण्यांनीं भरलेल्या आढळल्या. नंतर वर येऊन त्यानें तें सर्व पूर्ववत् बंद केलें व वर माती लोटून ठेवली. त्याला तो ठेवा सांपडल्याबद्दल फार हर्ष झाला. इतक्यांत, तो माळी राजपुत्राकरितां एबनी बेटास जाणाऱ्या जहाजाचा तपास करण्याकरितां गेला होता, तो परत आला व त्यानें राजपुत्रास निघण्याची तयारी ठेवण्यास सांगितलें. तो म्हणाला, 'आजपासून तिसऱ्या दिवशीं एबनी बेटास एक जहाज जाणार आहे, त्यावर तुजकरितां एक जागा मीं कायम केली आहे. आतां तुझे हाल व दुःख संपलें असें समज.' राजपुत्र म्हणाला, 'म्हातारे बाबा, आपण म्हणतां त्याचा अनुभवही मला येऊं लागला आहे.' असें म्हणून त्यानें ताईताची व ठेवा सांपडल्याची अशा दोन्ही शुभ गोष्टी त्याला सविस्तर सांगितल्या. नंतर तो म्हणाला, 'तुम्हीं जे मजवर आतांपर्यंत उपकार केले

त्यांबद्दल ईश्वरानेंच संतुष्ट होऊन तुम्हांला हा द्रव्याचा ठेवा बक्षीस दिला आहे असें समजा.' नंतर त्यानें तो खजिना म्हाताऱ्यास दाखविला. परंतु म्हातारा त्यांतल्या एक पैलाही स्पर्श करण्यास कबूल होईना. तो म्हणाला, 'तुझ्या नशिबानें तो तुला सांपडला त्यांत माझा काय संबंध? तुझ्यासारख्या तरुण राजपुत्रासच त्याचा सत्कारणीं उपयोग करतां येईल.' परंतु राजपुत्रासही तें द्रव्य आपण घ्यावें हें प्रशस्त वाटेना. अखेरीस दोघांच्या विचारानें तें निम्मेनिम वांटून घेण्याचें ठरलें व राजपुत्रानें त्यांतील पंचवीस घागरी आपल्या-बरोबर नेण्याचें ठरविलें. चोरांचा उपद्रव होऊं नये म्हणून त्यानें म्हाताऱ्याच्या सूचनेप्रमाणें प्रत्येक घागरींत खालीं निम्मे सोनें घालून वर बेदाणा भरला व ती बंद करून टाकली. राजकन्येचा ताईत पुनः हरवूं नये म्हणून तो त्यांपैकीं एका घागरींत घालण्याची त्यास बुद्धि झाली. मात्र तिच्या-वर त्यानें ओळखण्याकरितां एक खूण करून ठेविली. दुसऱ्या दिवशीं त्या म्हाताऱ्याची प्रकृति एकाएकीं फार बिघडून तिसऱ्या दिवशीं तो अगदीं मरावयास टेंकला. तांडेलानें एबनी बेटास जाणाऱ्या उतारूच्या तपासाकरितां माळ्याकडे मनुष्य पाठविला, त्याच्याबरोबर राजपुत्रानें आपल्या पन्नास बेदाण्याच्या घागरी जहाजावर पाठवून दिल्या व 'मी लवकरच येतों,' असें त्यास सांगितलें. गलबतावरच्या मनुष्यानें 'तुझ्यामुळेंच खोटी झाली आहे. लवकर ये,' म्हणून जातांना राजपुत्रास बजावलें. कामलंजेमान म्हाताऱ्याचा निरोप घेण्याकरितां

झोंपडींत जातो तों, त्याचा प्राण अगदीं जाण्याच्या बेतांत होता. त्यानें तितक्यांत म्हाताऱ्याकडून अंतकाळीं करावयाच्या कांहीं धार्मिक गोष्टी घाईघाईनें करविल्या, तोंच त्याचा प्राण गेला. आतां त्याला मूठमाती दिल्याशिवाय राजपुत्रास जातां येणें शक्य नव्हतें. तेव्हां घाईघाईनें त्यानें बागेंतच एक खड्डा खणला व त्यांत म्हाताऱ्यास पुरलें. परंतु इतकें सगळें होईपर्यंत त्याला दोन प्रहर लागले. नंतर तो त्वरेनें बंदरावर गेला; परंतु गलबत केव्हांच निघून गेलें होतें. सुमारें एक प्रहर त्याची वाट पाहून तांडेलानें गलबत हाकारलें. आतां पुनः एक वर्ष ह्या मुलखांत रखडण्याचा प्रसंग आला म्हणून राजपुत्रास फार वाईट वाटलें. शिवाय अकल्पित ईश्वरी लीलेनें तो ताईत मिळाला असतां मूर्खपणामुळें आपण तो पुनः गमावला ह्याबद्दल तर त्यास पराकाष्ठेचें दुःख वाटलें. नंतर बिचारा परत येऊन ती बाग धन्यापासून खंडानें घेऊन तेथें राहूं लागला.

इकडे तें जहाज नियमित वेळीं एबनी बेटांतील राजधानीस पोंचलें. राजवाडा समुद्रकांठींच असल्यामुळें तेथून सर्व देखावा दिसत असे. पतीच्या शोधाच्या हेतूनें राजकन्या बदूरा प्रत्येक जहाजाचा बारकाईनें तपास करीत असे. ह्या जहाजावर नेहमीं उंची माल असतो, तेव्हां त्यावरील उतारूही थोर लोक असतील, व त्यांत कदाचित् आपले पति असतील, असें मनांत येऊन ती स्वतः आपले अंमलदार बरोबर घेऊन बंदरावर गेली व तिनें जहाजाच्या नाखुद्याला अनेक माहितीचे

प्रश्न विचारले. त्यांतच जहाजावरील बेदाण्यासंबंधीं एक प्रश्न होता. ती म्हणाली, 'बेदाण्याच्या मालकाला सांग कीं, आम्हांस बेदाणा घ्यावयाचा आहे. करितां सर्व बेदाणा प्रथम वाड्यांत आणा.' परंतु नाखुदा म्हणाला, 'सरकार, माझ्या गलबतावर बेदाण्याच्या पन्नास घागरी आहेत. परंतु त्याचे मालक गलबतांत नाहींत, ते मागें राहिले. ते वेळेवर न आल्यामुळें मला गलबत हाकारावें लागलें.' राजकन्या म्हणाली, 'मालक नसला तरी चिंता नाहीं. सर्व बेदाण्याची किंमत त्यास दिली म्हणजे त्याची तक्रार राहणार नाहीं. पन्नास घागरींची काय किंमत होईल बाजारांत?' नाखुदा म्हणाला, 'मालक गरीब आहे, तेव्हां हजार मोहरा दिल्या म्हणजे पुरे.' राजकन्या म्हणाली, 'ठीक आहे, तर मग आम्ही हजार मोहरा देतों. त्या त्याच्या त्याला पावत्या कर.' असें म्हणून तिनें नाखुद्याला हजार मोहरा देण्याचा खजिनदारास हुकूम केला. नाखुद्यानेंही बेदाण्याच्या घागरी किनाऱ्यावर आणवून त्या सरकारी मनुष्याच्या हवालीं केल्या.

त्याच दिवशीं संध्याकाळीं बदूरा व जीवनकला महालांत बसल्या असतां बदूरेस बेदाण्याची आठवण झाली. म्हणून तिनें सकाळच्या घागरींपैकीं एक दासीकडून आणविली व ओतविली; तों बेदाण्याच्या मागून मोहरा पडल्या. तेव्हां तिला आश्चर्य वाटून दुसऱ्याही घागरी तिनें आपल्या समक्ष ओतविल्या, तेव्हां सर्वांतच मोहरा आढळल्या. परंतु एका घागरींत मोहरांबरोबर एक पुरचुंडी बाहेर आली. ती बदूरेनें

सोडून पाहतांच तिला एकदम मूर्च्छा आली. मग पाणी शिंपडून जीवनकलेनें तिला सावध केल्यावर दासीस जावयास सांगून बदूरा म्हणाली, 'सखे, हाच तो माझा हरवलेला ताईत. ज्या अर्थी हा आतां मला मिळाला आहे त्या अर्थी माझे पति मला लवकरच भेटतील असें माझी मनोदेवता मला सांगते.'

दुसऱ्या दिवशीं बदूरेनें दरबारांत नाखुद्याला बोलावून आणिलें आणि सांगितलें कीं, 'त्या बेदाण्याच्या मालकाकडे आमचें कर्ज असल्यामुळें त्यास तूं ताबडतोब परत जाऊन घेऊन ये. तोंपर्यंत तुझ्या गलबतावरील सर्व माल जप्त करून सरकारी वखारींत ठेवण्यांत येईल.' या सरकारी हुकुमाप्रमाणें नाखुद्याला जाणें भाग पडलें. त्याचें तें जहाज नीट वारा लागल्यामुळें लवकरच परत गेलें. त्या वेळीं मध्यरात्र होती तरीही नाखुद्यानें राजपुत्राकडे जाऊन व त्याच्या कर्जाची हकीकत सांगून एकाद्या कैद्यासारखें त्याला पकडून आणून गलबतावर चढविलें आणि लगेच गलबत एबनी बेटाकडे चालविलें. लवकरच तें बंदरांत येऊन दाखल झालें. ती वेळ रात्रीची होती, तरीही नाखुद्यानें राजपुत्रास राजवाड्यांत नेऊन वर्दी दिली. पहारेकऱ्यानें हुकुमाप्रमाणें राजाला वर्दी पोंचविली. ताबडतोब राजवेषधारी बदूरा बाहेर आली. गरीब माळ्याच्या वेषांतही तिनें राजपुत्रास ओळखलें; तथापि विवेक करून मन आवरलें आणि आपल्या एका अधिकाऱ्यास त्याची रात्रीपुरती बरदास्त ठेवण्यास सांगून हुकूम झाला म्हणजे आपणाकडे घेऊन येण्यास सांगितलें. नंतर नाखुद्याच्या

उत्तम कामगिरीबद्दल तिनें आपल्या गळ्यांतील एक मोत्यांचा कंठा त्यास बक्षीस दिला. शिवाय बेदाण्याबद्दलच्या हजार मोहराही त्यालाच देण्यास सांगितलें व त्याचा अडवून ठेवलेला माल त्याला परत देण्याचा हुकूम सोडला. नंतर ती महालांत परत गेली.

राजपुत्र सांपडल्याची बातमी तिनें जीवनकलेला सांगितली व हा सोन्याचा दिवस दाखविल्याबद्दल ईश्वराचे मनोभावानें आभार मानिले. तथापि तिनें अद्यापही ही गोष्ट गुप्तच ठेवण्याविषयीं जीवनकलेस सूचना दिली. दुसऱ्या दिवशीं कामर्लजेमान ह्यास स्वच्छ स्नान वगैरे घालून व अमीराचा पोशाक देऊन बदूरेनें त्याला दरबारांत बोलाविलें. त्याचा तो देखणा व तेजस्वी चेहरा पाहून हा कोणी तरी थोर पुरुप असावा अशी प्रत्येकाची खात्री झाली. राजकन्येनें त्यास प्रथम सरदारी दिली व त्याची राहण्याची व्यवस्था एका स्वतंत्र वाड्यांत केली. नंतर दोन दिवसांनीं जामदारखान्याच्या मुख्य अधिकाऱ्याच्या रिकाम्या झालेल्या जागेवर तिनें राजपुत्रास नेमिलें. तेथें त्याचे सद्गुण सर्वांच्या विशेप अनुभवास येऊं लागले व लवकरच तो लोकांचा अगदीं प्यारा झाला. ह्या सर्व सुखांत आपली बदूरा मिळती तर आपण मोठे धन्य होतों असें नेहमीं त्याच्या मनांत येई. परंतु तिचा कांहीं पत्ता लागण्याचें चिन्ह त्यास दिसेना.

बदूरेलाही आतां धीर धरवत नव्हता. म्हणून तिनें जीवनकलेच्या सम्मतीनें एका मोठ्या सरकारी कामांत

सल्ला विचारण्याच्या निमित्तानें राजपुत्रास एका रात्रीं आपल्या महालांत निजावयास बोलाविलें. संकेताप्रमाणें तो आल्यावर तिनें आपला ताईत त्याच्या हातांत देऊन त्याची परीक्षा करण्यास त्यास सांगितलें. तो नीट न्याहाळून पाहून राजपुत्र म्हणाला, 'महाराज, ह्याचे बाकीचे गुण काय असतील ते असोत, पण हा ताईत जिचा आहे ती माझी प्रिय पत्नी, राजकन्या बदूरा ही जर मला लवकर न भेटेल तर माझा जीव घेण्याचा गुण ह्या ताईतांत खास आहे. याच्यामुळेंच तिची व माझी ताटातूट झाली व मला अनेक भयंकर संकटें सोसावीं लागलीं आहेत.' राजकन्येनें त्यास जरा बसावयास सांगून ती दुसऱ्या खोलींत गेली व राजवेष उतरून राजकन्येच्या मूळच्या वेषांत तेथें परत आली. राजपुत्रानें तत्काळ तिला ओळखिलें व धावून तिच्या गळ्यास मिठी मारली. तो म्हणाला, 'राजेसाहेबांचे मजवर मोठे उपकार आहेत. किती चमत्कारानें त्यांनीं तुझी भेट करून दिली!'

नंतर राजकन्येनें राजाचा वेष घेतल्यापासून आतांपर्यंतची सर्व हकीकत राजपुत्रास सांगितली व जीवनकलेच्या थोरपणा-बद्दल तिची फारच वाखाणणी केली. पुढें रात्र बरीच झाली तेव्हां तीं दोघें झोपीं गेलीं.

दुसऱ्या दिवशीं पहाटेस उठून तिनें आर्मनास राजास मोठ्या नम्रपणानें निरोप पाठवून बोलावून आणिलें. तेथें

जामदारखान्याचे अधिकारी व अनोळखी स्त्री पाहून त्याला आश्चर्य वाटलें. त्यानें 'राजा कोठें आहे?' म्हणून विचारिलें. तेव्हां बदूरेनें त्याला आरंभापासूनची आपली कथा सांगितली व त्याच्याशीं थोडीशी प्रतारणा केल्याबद्दल क्षमा मागितली. तसेंच तिनें 'जीवनकलेचेंही कामर्लजेमान याच्याशीं लग्न केल्यास आमची दोघींची ताटातूट होणार नाहीं व मी होऊन तिला पट्टराणीचा मान देण्यास तयार आहें,' असेंही त्यास सांगितलें.

आर्मनास राजास त्यांच्या अद्भुत कथेचें मोठें आश्चर्य वाटलें. तसेंच त्याचें कुल, शील, मनाचा थोरपणा, इत्यादि सद्गुण पाहून त्याचें मन फार संतुष्ट झालें. त्यानें कामर्लजेमानाची संमति घेऊन आपली कन्या जीवनकला त्याला अर्पण केली व त्याला आपल्या राज्याचा अधिकारी केलें. राजपुत्र अगोदरपासूनच लोकप्रिय झाला असल्यामुळें तो राजा झालेला पाहून प्रजाजनांना फारच आनंद झाला. ह्याप्रमाणें आपल्या दोन्ही राण्यांसह कामर्लजेमान एबनी बेटाचें राज्य करीत सुखानें राहूं लागला. एक वर्षानंतर त्याच्या दोन्ही राण्यांना एक एक सुंदर मुलगा झाला. तेव्हां तर त्यांना जो आनंद झाला तो अवर्णनीयच होता. त्या दोन राजपुत्रांची मनोहर हकीकत पुढील गोष्टींत आपोआपच मिळेल.

गं. मं. कर्वे ... शाळा.
क्र. 2 9

## १

# आंग्राद व आसाद

मागील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें बदूरा व जीवनकला ह्या दोघींना सुलक्षण पुत्र झाले. त्यांचीं नांवें अनुक्रमें आंग्राद ( अत्यंत पराक्रमी ) व आसाद ( अत्यंत सुखी ) अशीं ठेवण्यांत आलीं. राजानें त्यांच्या विद्याभ्यासाची उत्तम व्यवस्था केली व त्यांस शाहाणे करण्यासाठीं फार परिश्रम घेतले. उभयतां राजपुत्र अत्यंत सद्गुणी व बुद्धिमान् असून पित्याच्या अर्ध्या वचनांत वागत असत. त्या दोघांचें परस्परांवर अकृत्रिम प्रेम होतें; तें इतकें कीं, राजानें प्रत्येकास स्वतंत्र इतमाम व स्वतंत्र वाडा दिला असतांही ते एकत्रच राहत असत. पुढें त्यांचें शाहाणपण पाहून राजानें त्यांस आपल्या मंत्रिमंडळांत घेतलें व त्यांजवर मोठमोठीं कामें तो सोंपवूं लागला. तीं पार पाडण्यांतील त्यांची हुशारी पाहून पुढें राजानें, प्रत्येकास पाळीपाळीनें आपल्या जागीं बसवून राज्यकारभार पाहण्याचा अधिकार देऊन आपण आपला वेळ विलासांत व शिकारींत घालवूं लागला.

दोघेही राजपुत्र अप्रतिम देखणे होते. दोघी राण्यांचें आपआपल्या मुलांवर प्रेम होतेंच; पण प्रत्येकीचें स्वतःच्या मुलापेक्षां सावत्र मुलावर जास्तच प्रेम होतें. ते दोघेही भेटा-वयास आले म्हणजे त्यांस जवळ घेऊन मुके घेणें, गोंजारणें इत्यादि गोष्टींचा मोह त्यांस मोठेपणींही आवरत नसे. पुढें कांहीं दिवसांनीं असें झालें कीं, राणी बदूरा हिला आसाद व जीवनकला हिला आंग्राद आपला नवरा व्हावा असें वाटूं लागलें. अखेरीस एके दिवशीं राजा शिकारीस गेला आहे अशी संधि साधून, आंग्राद दरबारचें काम आटपून परत येत असतां एका खोजानें त्यास जीवनकलेची चिठी आणून दिली. ती वाचतांक्षणीं त्यास इतका क्रोध आला कीं, त्या हरामखोर मनुष्याचें त्यानें डोकें उडविलें. लगेच तो बदूरा राणीच्या महालांत गेला व त्यानें तिला चिठींतील मजकूर तोंडीं सांगितला. त्याबरोबर ती एकदम संतापली व म्हणाली, ' जीवनकला फार थोर आहे. ती असें कधींही करणार नाहीं. तूंच मेल्या लबाड आहेस. ' तें ऐकून आंग्रादला फारच संताप येऊन तो तेथून चालता झाला. इतक्यावरून शाहाणी न होतां बदूरा राणीनें दुसऱ्या दिवशीं आसाद दरबारचें काम आटपून परत येत असतां एका म्हाताऱ्या दासीबरोबर त्यास एक चिठी पाठविली. ती वाचतांक्षणींच त्यासही इतका संताप आला कीं, त्या भरांत त्यानें त्या म्हातारडीचा शिरच्छेद केला. नंतर तो तडक आपल्या आईच्या महालांत गेला व त्यानें तिला बदूरेच्या चिठींतील मजकूर

सांगितला, त्याबरोबर ती पराकाष्ठेची संतापून म्हणाली, ‘अधम कार्ट्या, तूंही त्या मेल्या आंग्रादसारखेंच कुभांड रचून बदूरा राणीच्या अब्रूवर घाला घालूं पाहातोस काय ? चालता हो येथून. तुझें काळें तोंड मला दाखवूं नको.’ बिचाऱ्या आसादच्या मनाची स्थिति फार चमत्कारिक झाली. त्याला त्यांतील गूढ कांहीं समजेना. शेवटीं आपला बंधु आंग्राद यास घडलेला प्रकार सांगावा म्हणून तो त्याकडे निघाला, तोंच आंग्रादही त्यास भेटण्यास आला. त्यांनीं परस्परांच्या गोष्टी एकमेकांस सांगितल्या, तेव्हां आपल्या आयांच्या दुष्ट कृत्यांबद्दल त्यांच्या आंगावर शहारे आले. तथापि विवेकानें मन आवरून ते स्वस्थ राहिले.

इकडे, आपल्यावर दोष येऊं नये म्हणून त्या दुष्ट राण्यांनीं, राजपुत्रांनीं आपणावर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केल्याचें ढोंग करून अन्नपाणी वर्ज्य करून आजारीपणाचें मिष केलें. राजा कामर्लजेमान शिकारीहून परत आल्यावर त्या चांडाळणींनीं पुत्रांबद्दल भलभलत्या गोष्टी त्याला सांगून त्याचें मन कलुषित केलें. त्यानेंही कांहीं विचार न करतां रागाच्या भरांत स्वतः राजपुत्रांचा शिरच्छेद करण्याचें ठरविलें. इतक्यांत त्याचा सासरा राजा आर्मनास हा त्याचे भेटीस आला. त्याला हा प्रकार समजतांच राजाचें शांतवन करून तो म्हणाला, ‘अरे, तूं असा अविचार कसा करतोस ? जरी राजपुत्र अपराधी असले तरी त्यांना शासन करण्याचे दुसरे प्रकार काय थोडे आहेत ?’ कामर्लजेमान ह्यास सासऱ्याचा

युक्तिवाद पटून त्यानें राजपुत्रांना आपल्या गैदार नामक विश्वासू सरदाराच्या स्वाधीन केलें व त्यास असा हुकूम केला कीं, 'ह्या कारट्यांना शहराबाहेर अरण्यांत नेऊन ठार मार व त्यांच्या रक्तानें भरलेले त्यांचे पोशाक मला दाखविण्यास आण!'

त्या हुकु।प्रमाणें गैदार राजपुत्रांस एका अरण्यांत घेऊन गेला. तेथें ते दोघेही 'आधीं मला मार' म्हणून म्हणूं लागले. अखेरीस दोघांना एकत्र बांधून त्यांचा एकदम शिरच्छेद करावा असें ठरलें व त्याप्रमाणें गैदारानें त्यांस एकत्र बांधून घाव घालण्याकरितां तरवार उचलली. परंतु तिचें पातें उन्हांत एकदम झळकल्यामुळें गैदाराचा जवळच उभा असलेला घोडा बुजला आणि भरधांव पळत सुटला. तो गैदाराचा फार आवडता असल्यामुळें तो राजपुत्रांस मारण्याचें तसेंच ठेवून व तरवार तेथेंच टाकून घोड्यास आणण्यास गेला. घोडा ज्या झाडींत शिरला होता तेथें तो पोहोंचतो, तों एक सिंह घोड्यावर उडी टाकण्याच्या बेतांत असलेला त्यास दिसला. गैदारास पाहतांच सिंहानें आपला मोर्चा त्याकडे वळविला. गैदारानें तरवार इकडे टाकली होती, त्यामुळें त्याला पळून जाण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. तो पळूं लागतांच सिंह त्याच्या पाठीस लागला.

इकडे राजपुत्र तहानेनें व्याकुळ झाल्यामुळें त्यांनीं आपले बंद सोडले व ते शेजारच्या झऱ्यावर पाणी पिण्यास गेले. इतक्यांत गैदाराच्या मागें सिंह लागलेला त्यांना दिसला. लगेच आंग्रादनें गैदारची तरवार घेतली व तो त्याच्या

मदतीस धावला. आसादही मागोमाग गेलाच. सशस्त्र आंग्रादास पाहतांच सिंह गैदारास सोडून त्याच्यावर चालून आला. परंतु आंग्रादानें अशा सफाईनें वार केला कीं, सिंहाचे दोन तुकडे होऊन तो मरून पडला.

राजपुत्रांनीं आपला प्राण वांचविला, हें पाहून तो सरदार कृतज्ञताबुद्धीनें त्यांच्याजवळ आला, व त्यांस साष्टांग नमस्कार घालून म्हणाला, ‘महाराज, आपले मजवर अगणित उपकार आहेत. ज्या आपण माझे प्राण वांचविले त्या आपले प्राण घेण्यास माझे हात कसे धजतील? हें घोर पाप मी करणार नाहीं.’ ‘तुला राजाज्ञा पाळलीच पाहिजे’ असें म्हणून राजपुत्रांनीं त्याला आपणांस मारण्याविषयीं आग्रह करून पाहिला व त्याचा घोडाही त्यास धरून आणून दिला. परंतु तो त्या गोष्टीस कबूल होईना. शेवटीं तो म्हणाला, ‘महाराज, माझें असें मागणें आहे कीं, आपण आपले पोशाक मजजवळ द्यावे. आणि आपल्या वडिलांच्या कानींही आपण जिवंत असल्याची गोष्ट येणार नाहीं इतक्या दूरच्या प्रदेशांत निघून जावें.’ असें म्हणून त्यानें आपल्या कपड्यांपैकीं शक्य तितके कपडे त्यांस दिले. त्याच्या अत्याग्रहावरून राजपुत्रांनीं आपले कपडे काढून त्याच्या स्वाधीन केले व त्याचे कपडे आपण घातले. नंतर ते म्हणाले, ‘गैदारा, राजेसाहेबांना आमचा एवढाच निरोप कळव कीं, आम्ही सर्वथैव निरपराधी आहों. तथापि अन्यायानें आमचा जीव घेतल्याचा दोष आम्ही त्यांना लावीत नाहीं. कारण आमच्यावरच्या आरोपाच्या बाबतींत

खरोखर कोणाचें कारस्थान होतें ह्याची माहिती त्यांना कोणीं दिली नाहीं.' इतकें बोलून व त्याचा निरोप घेऊन ते चालते झाले.

इकडे गैदारानें त्या मृत सिंहाच्या रक्तांत राजपुत्रांचे पोशाक भिजवून तो राजधानींत परत आला आणि 'आपण सांगितल्याप्रमाणें व्यवस्था केली,' असें त्यानें राजास कळविलें. 'मीं शिक्षा दिली तिजविषयीं राजपुत्र काय म्हणाले?' असा राजानें प्रश्न विचारतांच त्यानें राजपुत्रांचा निरोप त्यास सांगितला. तो ऐकून राजास फार गहिंवर आला. नंतर मुलांचे पोशाक तपासून पाहत असतां प्रत्येकाच्या खिशांत त्याच्या सावत्र आईनें पाठविलेली चिठी व खुणेकरितां केसांच्या बटा गुंडाळलेल्या सांपडल्या. त्यानें त्या चिठ्या वाचून पाहिल्या आणि त्यांचें हस्ताक्षर त्यानें तावडतोब ओळखलें. त्या सर्वांवरून आपल्या दुष्ट राण्यांच्या भयंकर कारस्थानाची यथार्थ कल्पना त्यास आली, आणि 'आपल्या निरपराधी, सद्गुणी व पापभीरु मुलांचा आपण निष्कारण जीव घेतला,' असें म्हणून तो धाडकन् मूर्च्छित पडला. थोड्या वेळानें शुद्धीवर आल्यावर तो पराकाष्ठेचा शोक करून स्वतःस दोष लावून घेऊं लागला. त्या दुष्ट राण्यांचा त्याला इतका तिटकारा आला कीं, 'यापुढें मरेपर्यंत त्यांचीं तोंडें पाहाणार नाहीं,' अशी प्रतिज्ञा करून त्यानें त्या दोन्ही राण्यांस कैद करून निरनिराळ्या ठिकाणीं नेऊन बंदोबस्तांत ठेविलें व स्वतः पुत्रांचे गुण आठवून शोक करीत आयुष्य कंठीत राहिला.

इकडे राजपुत्र आंग्राद व आसाद आडवाटेनें रानावनांतून चालले. ते कंदमुळांवर उपजीविका करीत व रात्र झाली म्हणजे कोठें तरी मुक्काम करून आळीपाळीनें झोंपत व पाहारा करीत. सुमारें एक महिन्यानें ते एक बिकट डोंगर ओलांडून पलीकडील एका शहरापाशीं आले. एकानें येथेंच राहावें व दुसऱ्यानें शहरांत जाऊन खाण्याचे जिन्नस घेऊन यावें, असें त्यांनीं ठरविलें व त्याप्रमाणें आसाद शहरांत गेला. तेथें त्याला एक प्रतिष्ठित म्हातारा भेटला, त्यास सलाम करून त्यानें बाजाराचा रस्ता विचारला. तेव्हां म्हाताऱ्यानें मोठ्या प्रेमाचा आव आणून म्हटलें, ‘ मुला, तूं नवखाच दिसतोस. तूं कशाला बाजारांत जाऊन जिन्नस विकत घेतोस? माझ्या घरीं आज मोठी मेजवानी आहे त्याकरितां मी पुष्कळ जिन्नस विकत घेतले आहेत. तूं तेथेंच जेव.’ आसादनें, आपला भाऊ शहराबाहेर आपली वाट पहात राहील, असें सांगितल्यावरून म्हातारा म्हणाला, ‘ कांहीं चिंता नाहीं. तुझें जेवण झाल्यावर तुम्हां दोघांना कांहीं दिवस पुरतील इतके जिन्नस मी तुला देईन.’ म्हाताऱ्याचें तें लाघवी भापण ऐकून राजपुत्र कबूल झाला. त्यानें त्याचे फार उपकार मानले व तो म्हाताऱ्याबरोबर त्याच्या घरीं जाण्यास निघाला. लवकरच तो म्हाताऱ्यासह त्याच्या घरीं पोंचला. तेथें एका विस्तृत व भव्य दिवाणखान्यांत एक अग्निकुंड पेटलें असून चाळीस वृद्ध मनुष्य अग्नीची पूजा करीत होते. तें पाहून आसाद चपापला. आपण फसलों असें त्याच्या लक्षांत आलें. इतक्यांत

म्हाताऱ्याच्या सांगण्यावरून एक शिदी तेथें आला व त्यानें आसादच्या मुसक्या बांधून त्याला एका तळघरांत नेलें. त्या म्हाताऱ्याच्या बोस्तमा व कावमा अशा दोन सुंदर मुली होत्या. परंतु लहानपणापासून त्यांना मुसलमानांचा द्वेष करण्यास शिकविलें होतें. म्हाताऱ्यानें त्यांना ताकीद दिली कीं, 'हा मनुष्य अग्निपर्वतावर बळी देण्याकरितां आणला आहे. तुम्ही ह्याला रोज चाबकांनीं रक्तबंबाळ होईपर्यंत मारून थोडीशी भाकरी व पिण्यास पाणी देत जा व अशा रीतीनें बळी देण्याच्या दिवसापर्यंत त्याला कसातरी जिवंत ठेवा.' बापाच्या सांगण्याप्रमाणें त्यांनीं वागण्यास सुरुवात केली व राजपुत्राचे फार हाल चालविले. बिचारा आसाद आपल्या नशिबाला दोष लावीत व आपला प्रियबंधु आंग्राद ह्याची काळजी करीत दिवस कंठीत राहिला.

इकडे आंग्रादनें संध्याकाळपर्यंत वाट पाहिली तरी आसाद आला नाहीं, तेव्हां त्याला मोठी काळजी लागली. त्या रात्रीं त्याला झोंप आली नाहीं. दुसऱ्या दिवशीं उजाडतांच तो बंधूच्या शोधाकरितां शहरांत गेला. जातां जातां त्याला एका मुसलमान शिंप्याचें दुकान लागलें. तेथें जाऊन तो शिंप्यास म्हणाला, 'महाराज, मी फार संकटांत आहें.' असें म्हणून त्यानें आपल्या भावाची हकीकत त्यास सांगितली. शिंपी म्हणाला, 'मुला, हें जादुगारांचें नगर आहे. तुझा भाऊ जर त्यांच्या तावडींत सांपडला असला, तर तो मिळण्याची आशाच नको. आतां तूं माझें ऐक. माझ्याच घरीं राहा. मी

तुला त्या जादुगारांच्या सर्व हिकमती शिकवीन म्हणजे तूं फसणार नाहींस.' तें ऐकून आंग्रादनें त्याचें म्हणणें कबूल केलें व त्याचे फार उपकार मानले. तो नेहमीं शिप्याबरोबर बाहेर जात असे. सुमारें एक महिन्यानंतर, आपण चुकणार नाहीं अशी खात्री वाटून तो एके दिवशीं एकटाच एका हमामखान्यांत स्नान करण्यास गेला. तेथून परत येत असतांना एका गल्लींत त्याला एक सुंदर स्त्री भेटली. तिनें त्याला विचारिलें, 'तुम्हीं कोठें जात आहां?' राजपुत्र म्हणाला, 'मी घरीं जात आहें.' ती म्हणाली, 'चला, मी तुमच्या घरीं येतें.' तें ऐकून राजपुत्र गोंधळला. शिप्याकडे तिला नेण्याचा त्याला धीर होईना. शेवटीं कांहींच न बोलतां तो पुढें चालूं लागतांच ती त्याच्यामागून जाऊं लागली. बरेच रस्ते व गल्ल्या ओलांडल्यावर एका बंगल्यापुढील ओट्यावर राजपुत्र बसला. 'हेंच का तुमचें घर?' असें विचारीत तीही तेथें बसली व त्याला आंत चलण्याचा आग्रह करूं लागली. तो म्हणाला, 'चाकराची वाट पाहत आहें. त्याच्याजवळ किल्ली आहे.' ती फार उतावीळ झाली व तिनें एक धोंडा घेऊन त्या बंगल्याच्या दाराचें कुलूप मोडलें व दरवाजा उघडला. आंत पहातात तों सर्व सामानसुमान नीट मांडलें असून टेबलावर खाण्याचे जिन्नसही विपुल ठेवले आहेत. तिनें बळेंबळेंच आंग्रादला आंत नेऊन ती त्याच्याजवळ कोचावर बसली. नंतर हळूहळू गोड गोड भाषणें करीत तिनें ते पदार्थ खाण्यास व राजपुत्रास देण्यास सुरुवात केली.

राजपुत्रास फार संकोच वाटत होता. त्याला अशी धास्ती वाटत होती कीं, ह्या वाड्याचा मालक जर येथें आला तर आपल्या फजितीला सीमा नाहीं. शेवटीं मद्याचे पेले भरून ती स्वतः पिऊं लागली व राजपुत्रासही देऊं लागली. इतक्यांत वाड्याचा मालक तेथें आला. राजपुत्राचें तोंड दरवाजाकडे होतें त्यामुळें त्याला तो दिसतांच त्याचें तोंड चटकन उतरलें. तथापि मालक फार सभ्य मनुष्य होता. त्यानें बाहेरूनच राजपुत्रास खूण केली. तेव्हां ‘मी थोडचा वेळांत येतों’ असें त्या स्त्रीला सांगून तो बाहेर गेला. मालकानें ‘तूं कोण? आमच्या वाड्याचें कुलूप कां तोडलेंस?’ इत्यादि प्रश्न त्याला विचारले. तेव्हां राजपुत्रानें झालेल्या अपराधाबद्दल प्रथम त्याची माफी मागून नंतर त्या स्त्रीची हकीकत सांगितली व आपला नाइलाज झाला म्हणून अशी गोष्ट घडली, असें त्याच्या नजरेस आणिलें. नंतर आपण खरे कोण वगैरे सांगून आपल्या हातून चोरी, लबाडी वगैरे गोष्टी घडणार नाहींत ह्याविषयीं त्याची खात्री पटविली.

वाड्याचा मालक बहादरखान हा तेथील राजाचा सेनापति असून फार दयाळू व उमद्या स्वभावाचा होता. त्याच्याकडे पाहुणे यावयाचे होते म्हणून त्यानें ही सर्व तयारी करून ठेविली होती. तथापि राजपुत्रावर उपकार करण्याची संधि साधावी म्हणून त्यानें त्यास खुशाल तेथें राहण्याची परवानगी दिली. तसेंच त्या स्त्रीला राजपुत्राचें म्हणणें खोटें वाटूं नये म्हणून तो म्हणाला, ‘मीच घटकाभर तुझा चाकर होतों. मी

तेथें आल्यावर खोट्या शिव्या वगैरे देऊन जरा बतावणी कर म्हणजे झालें.' राजपुत्र प्रथम तें कबूल करीना, परंतु त्याच्या आग्रहास्तव कबूल झाला. नंतर तो आंत येऊन त्या स्त्रीशीं मोकळेपणानें गप्पा मारूं लागला. बहाद्दरखान चाकराचा वेष घेऊन आला, तेव्हां त्यास त्यानें खोट्या शिव्या देऊन हातांतील काठीनें हळूहळू दोन तीन फटके मारले. परंतु तेवढ्यानें त्या स्त्रीचें समाधान न होऊन तिनें काठीनें बिचाऱ्या बहाद्दरखानास इतकें झोडपलें कीं, अखेरीस राजपुत्रानें तिच्या हातांतील काठी हिसकावून घेतली. पुढें बरीच रात्र झाल्यावर ती स्त्री घरीं जाण्यास निघाली. जातांना एका खोलींत बिचारा बहाद्दरखान घोरत पडला होता. त्याला पाहातांच तिला पुनः राग आला व तिनें त्याला ठार मारण्याचा आग्रह धरला. राजपुत्र ऐकेना तेव्हां ती स्वतःच तरवार घेऊन मारावयास धावली. परंतु राजपुत्रानें तिच्या हातून तरवार काढून घेतली व मीच त्यास मारतों असें म्हणत एका फटक्यानें त्या स्त्रीचेंच डोकें उडविलें. त्याच्या आवाजानें बहाद्दरखान जागा झाला. त्याला राजपुत्रानें खरा प्रकार सांगितला. पुढें तो मुडदा समुद्रांत टाकण्याकरितां एका पोत्यांत घालून बहाद्दरखान नेत असतां त्यास कोतवालानें पकडलें व दुसऱ्या दिवशीं राजापुढें उभें केलें. राजानें संतापून त्यास फांशीची शिक्षा फर्माविली. त्याप्रमाणें बहाद्दरखानास फांशी देण्यास नेलें व गांवांत दवंडी पिटविली. राजपुत्र आंग्राद बहाद्दरखानाची वाट पाहत असतां त्याच्या कानीं ती दवंडी पडली. तेव्हां


तो त्वरेनें फांशीच्या जागीं गेला व ओरडून म्हणाला, 'अहो कोतवालसाहेब, मी शपथ वाहून सांगतों कीं, ज्या गुन्ह्या-बद्दल ह्या बहादरखानास फांशी देण्यांत येत आहे तो त्यांच्या हातून मुळींच घडला नाहीं. ती स्त्री ह्यांचा वध करीत असतां तो थांबवून मीच तिचा वध केला. अशा वाईट स्त्रीच्या वधाबद्दल जर फांशीं द्यावयाचें असेल तर मला द्या, परंतु ह्यांना सोडा.' ह्या प्रकारामुळें कोतवालानें फांशीचा बेत तहकूब करून त्या दोघांना राजाकडे नेलें. राजानें राज-पुत्राची हकीकत साद्यंत ऐकून घेतल्यावर त्याची खात्री पटली व त्यानें बहादरास जीवदान दिलें. नंतर राजपुत्राची भेट झाल्याबद्दल समाधान व्यक्त करून त्यानें त्यास आपला वजीर नेमिलें व भावाच्या शोधार्थ योग्य त्या तजविजी कर-ण्याचा अधिकार त्यास दिला. वजिरीचा कारभार पाहूं लागल्यावर त्यानें भावाच्या शोधाकरितां पुष्कळ प्रयत्न केले, पण व्यर्थ !

इकडे आसाद हाल भोगीत असतां अग्निपूजकांचा सण जवळ आला तेव्हां दरसालप्रमाणें एक गलबत अग्निपर्वतास जाण्यास तयार झालें. नाना प्रकारचे पदार्थ त्यावर चढविले. आसादला मालानें अर्धी भरलेल्या एका पेटींत घातलें. वारा येण्याकरितां तिला भोंकें पाडलीं होतीं. जहाजाचा मालक बेहराम म्हणून अत्यंत दुष्ट मनुष्य होता. अग्निपूजक मुसल-मानाचा बळी देतात, हें माहीत असल्यामुळें वजीर आंग्राद ह्यानें त्या गलबताचा जातीनें झाडा घेतला. परंतु आसाद

पेटींत असल्यामुळें सांपडला नाहीं. नंतर तें गलबत चालू झालें. कांहीं दिवस प्रवास केल्यावर दर्यांत तुफान झालें. तेव्हां तें जहाज सुरक्षितपणाकरितां मार्ग्याना नांवाच्या राणीच्या बंदरांत नेणें भाग पडलें. ती राणी मुसलमानधर्मी होती. तिच्याशीं कसें वागावयाचें हें बेहरामनें ठरवून ठेविलें होतें. अंदाजाप्रमाणें गलबत बंदरांत लागतांच मालकास राणीकडून बोलावणें आलें. तो आसाद् यास मोकळा करून आपल्या-बरोबर घेऊन गेला. आसादचें तारुण्य व सौंदर्य पाहून मार्ग्याना राणी मोहित झाली व त्या मनुष्याची तिनें बेहरामशीं मागणी केली. त्यानें 'तो माझा कारकून आहे' असें सांगितलें. तथापि तें न ऐकतां राणीनें त्यास ठेवून घेतलें व आजच्या आज गलबत बंदरांतून न हाकारल्यास सर्व माल लुटला जाईल अशी ताकीद दिली.

नंतर राणी आसाद्ला आपल्या महालांत घेऊन गेली व त्यास स्नान घालून, स्वच्छ कपडे देऊन, तिनें आपल्या शेजारीं बसविलें आणि त्याची हकीकत विचारून घेतली. ती ऐकून ती अग्निपूजकांवर फारच संतापली. नंतर तिनें राज-पुत्रास आपल्या ताटांत जेवावयास घेतलें. नंतर राजपुत्रास उकडूं लागलें म्हणून तो जरा बाहेरील बागेंत गेला व तेथें गवतावर पडला असतां त्यास गाढ झोंप लागली.

इकडे राणीच्या हुकुमाप्रमाणें बेहरामनें आपलें जहाज हाकारलें, परंतु गोडें पाणी घेण्याचें राहिल्यामुळें त्यानें तें



बेहरामनें तें पाहतांच आसादला समुद्रांत लोटून दिलें.

जहाज बगीच्याच्या कडेला लाविलें व तेथून भिंतीवर आपल्या लोकांना चढवून त्यानें बागेंतील हौदांतलें पाणी जहाजांत भरून घेतलें. पाणी भरीत असतां त्यांची दृष्टी जवळच निजलेल्या आसादकडे गेली. त्यांनीं त्याला ताबडतोब ओळखलें व धन्याच्या परवानगीनें त्याला उचलून जहाजावर नेलें. नंतर बेहरामनें जहाज झपाट्यानें हाकारलें.

राणीनें राजपुत्राची थोडा वेळ वाट पाहिली व नंतर दासींना तपासास पाठविलें परंतु त्याचा पत्ता लागेना. तेव्हां ती स्वतः बागेंत आली. हौदांतील पाणी भिंतीपर्यंत सांडत गेलेलें पाहून तिला शंका आली म्हणून तिनें रखवालदाराजवळ चौकशी केली, तों असें समजलें कीं, बेहरामनें हौदांतलें पाणी जहाजावर घेण्याकरितां जहाज बागेच्या कांठाला लाविलें होतें. मग त्यानेंच राजपुत्रास पकडून-नेलें असें पक्कें जाणून तिनें आपल्या जहाजांवरील मुख्यास बोलावून 'उद्यां सकाळीं दहा जहाजें तयार ठेव. अग्निपूजकांचें गलबत पकडावयाचें आहे. पकडून दिल्यास सर्व जहाज लुटण्याची मोकळीक मिळेल. नाहींतर शिक्षा होईल. मी स्वतः स्वारीवर येणार आहें,' असा त्यास हुकूम दिला. सकाळ होतांच गलबतें निघालीं. तिसऱ्या दिवशीं त्यांनीं बेहरामच्या गलबतास गांठलें. बेहरामनें तें पाहतांच आसादला समुद्रांत लोटून दिलें. परंतु तो पटाईत पोहणारा असल्यामुळें लवकरच किनाऱ्यावर पोंचला आणि आपलीं ओलीं चिरगुटें वाळवून एका दिशेनें निघाला.

सुमारें अकराव्या दिवशीं तो पुनः त्या जादुगारनगरींत आला. रात्र झाल्यामुळें तो गांवाबाहेरच एका थडग्यांत झोंपला. इकडे मार्ग्यांना राणीनें बेहरामच्या जहाजाचा झाडा घेतला परंतु तेथें आसाद् राजपुत्र मिळाला नाहीं. तिनें संतापानें तें गलबत आपल्या लोकांकडून लुटविलें आणि त्यावरील सर्व मंडळीस किनाऱ्यावर उतरविलें. नंतर ते पायींच आपल्या नगरास निघाले. ज्या दिवशीं आसाद् तेथें पोहोंचला त्याच दिवशीं तेही थोडे मागून तेथें पोंचले. तेही रात्र झाल्यामुळें गांवांत न जातां बाहेरील थडग्यांतच झोंपण्याकरितां शिरले. दुर्दैवानें ज्या थडग्यांत आसाद् निजला होता त्यांतच बेहराम शिरला. आसाद्नें 'कोण आहे?' म्हणून विचारतांच बेहरामनें त्यास ओळखलें आणि आपल्या खलाशांकडून त्यास पकडवून पहाटेस पूर्वींच्या म्हाताऱ्याच्या घरीं पोहोंचविलें. म्हाताऱ्यानें त्यास आपल्या मुलींच्या स्वाधीन केलें.

परंतु ह्या खेपेस बोस्तमेनें त्याचे मुळींच हाल केले नाहींत. मागील खेपेस त्याचे गुण पाहून तिला त्याच्याविषयीं प्रेम वाटूं लागलें होतें. आणि आपला बाप ह्यास निष्कारण छळीत आहे ह्याबद्दल तिची खात्री झाली होती. तिनें आपले विचार आसाद्जवळ बोलून दाखविले तेव्हां त्याला दुःखांत थोडेंसें सुख वाटलें. तिच्या मनोवृत्तीचा फायदा घेऊन आसाद्नें हळूहळू तिच्या मनावर मुसलमानी धर्माचीं तत्त्वें बिंबविलीं. त्यामुळें तिचें मन त्याच्याकडे ओढ घेऊं लागलें. एके दिवशीं

ती दारांत उभी असतां राजपुत्र आसाद ह्याचा शोध करण्या-करितां वजीरसाहेबांची स्वारी निघालेली तिनें पाहिली. दवंडीवाल्यानें दवंडी पिटली कीं, 'महापराक्रमी वजीरसाहेबांचा भाऊ राजपुत्र आसाद नाहींसा झाल्याला आज एक वर्ष झालें. त्याचा ठावठिकाण ज्यांस माहीत असेल त्यांनीं तो वजीरसाहेबांस कळवावा, म्हणजे त्यांस योग्य बक्षीस मिळेल.' दवंडी ऐकतांच बोस्तमेनें राजपुत्र आसाद ह्यास जाऊन सांगितलें व त्यास घेऊन ती रस्त्यांत आली व मोठ्यानें ओरडून म्हणाली, 'हा पहा राजपुत्र आसाद.' वजीराच्या कानीं ते शब्द पडतांच त्यानें मागें वळून पाहिलें व राज-पुत्रास ओळखून धावत जाऊन त्याच्या गळ्यास मिठी मारिली. नंतर त्यानें त्यास आपल्याबरोबर घोड्यावर बसवून राजवाड्यांत नेलें. राजालाही तें वर्तमान ऐकून फार आनंद झाला व त्यानें आसादलाही प्रेमानें भेटून वजिरीचीं वस्त्रें दिलीं. बोस्तमा परत जाईना म्हणून तिला तूर्त राणीची दासी केली व तिच्या बापाचें घर जमीनदोस्त करण्यांत आलें.

नंतर कांहीं दिवसांनीं दोघां राजपुत्रांनीं वडिलांस भेटा-वयास जाण्याची राजाजवळ परवानगी मागितली. त्यानेंही ती आनंदानें दिली. परंतु ते ज्या दिवशीं निघणार होते त्याच दिवशीं एकाएकीं राज्यावर परकीय सैन्य चालून आलें. तेव्हां आंग्रादनें आपला जाण्याचा बेत रहित करून राजाच्या परवानगीनें शत्रूच्या मुख्य सरदाराची भेट घेतली. तेव्हां हें शत्रुसैन्य नसून राणी मार्ग्यानी राजपुत्र आसादचा

शोध करीत आली असल्याचें त्यास समजलें. आंग्रादनें 'ते आपला भाऊ आहे व आपण त्याची भेट करून देऊं,' असे सांगून मोठ्या सन्मानानें तिला राजवाड्यांत नेलें. तेथे आसादला पाहून तिला पराकाष्ठेचा आनंद झाला. त्या आनंदांत सर्वजण निमग्न आहेत, इतक्यांत दुसरी एक फार मोठी फौज नगरावर चालून आल्याची बातमी आली. तेव्हां पुन: राजाच्या आज्ञेवरून दोघेही राजपुत्र घोडेस्वार होऊन तिकडे गेले. त्यांनीं चालून येणाऱ्या राजाच्या प्रधानाची भेट घेतली तेव्हां असें समजलें कीं, हा चीन देशचा राजा गैऊर आपली कन्या बदूरा व जांवई कामर्लजेमान ह्यांच्या समाचारास जात आहे. तेव्हां आंग्रादनें राजास भेटून आपली सर्व हकीकत निवेदन केली. आपला नातू अशा आकस्मिक तऱ्हेनें भेटला म्हणून गैऊर राजास फार आनंद झाला. तोही राजवाड्यांत गेला तेव्हां राजानें त्याचा फार सन्मान केला. इतक्यांत तिसरी एक फौज येत असल्याची वर्दी सेवकांकडून मिळाली. पुन: दोघे राजपुत्र तिच्या तपासाकरितां गेले. तेव्हां त्यांस असें समजलें कीं, आपले वडील कामर्लजेमान महाराज आपल्या शोधाकरितां आले आहेत. राजपुत्रांना वडिलांना भेटण्याची उत्कंठा होतीच. त्यांनीं नम्रपणें त्यांची भेट घेऊन त्यांच्या पायांवर डोकीं ठेवलीं. पुत्रांच्या अकल्पित भेटीमुळें कामर्लजेमानचा आनंद गगनांत मावेना. त्यानें पुन: पुन: त्यांस आलिंगन देऊन व जवळ बसवून त्यांची हकीकत विचारून घेतली. त्यांचे आपल्या मूर्खपणामुळें असे

हाल झाले, ह्या विचारानें त्यास अत्यंत दुःख झालें. नंतर तेथील राजानें मोठ्या समारंभानें त्यास नगरांत नेऊन त्याचा मोठा सत्कार केला. इतक्यांत खालदनद्वीपांचा राजा शाहजेमान पुत्राचा शोध करीत फौजेसह तेथें आला आहे असें समजलें. त्यालाही मोठ्या सन्मानानें राजानें नगरांत नेलें.

अशा तऱ्हेनें सर्वांच्या भेटीचा अपूर्व योग एकदम जमून आला. सर्वांनीं तीन दिवस तेथें आनंदांत घालविले. दुसऱ्या दिवशीं राजपुत्र आसादचें मार्ग्याना राणीशीं व आंग्रादचें बोस्तमेशीं लग्न झालें. सर्व समारंभ उरकल्यावर राजा गैऊर, शाहजेमान, कामर्लजेमान व राणी मार्ग्याना हीं आपआपल्या मुलखास गेलीं. राणीनें आसादला आपल्याबरोबर नेलें. तेथील राजानें आंग्राद यास आपलें राज्य देऊन तेथेंच ठेवून घेतलें. त्यानेंही फार शहाणपणानें राज्य करून प्रजेस सुख दिलें.



शोध करीत आली असल्याचें त्यास समजलें. आंग्रादनें 'तो आपला भाऊ आहे व आपण त्याची भेट करून देऊं,' असें सांगून मोठ्या सन्मानानें तिला राजवाड्यांत नेलें. तेथें आसादला पाहून तिला पराकाष्ठेचा आनंद झाला. त्या आनंदांत सर्वजण निमग्न आहेत, इतक्यांत दुसरी एक फार मोठी फौज नगरावर चालून आल्याची बातमी आली. तेव्हां पुनः राजाच्या आज्ञेवरून दोघेही राजपुत्र घोडेस्वार होऊन तिकडे गेले. त्यांनीं चालून येणाऱ्या राजाच्या प्रधानाची भेट घेतली. तेव्हां असें समजलें कीं, हा चीन देशचा राजा गैऊर आपली कन्या बदूरा व जांवई कामर्लजेमान ह्यांच्या समाचारास जात आहे. तेव्हां आंग्रादनें राजास भेटून आपली सर्व हकीकत निवेदन केली. आपला नातू अशा आकस्मिक तऱ्हेनें भेटला म्हणून गैऊर राजास फार आनंद झाला. तोही राजवाड्यांत गेला तेव्हां सजानें त्याचा फार सन्मान केला. इतक्यांत तिसरी एक फौज येत असल्याची वर्दी सेवकांकडून मिळाली. पुनः दोघे राजपुत्र तिच्या तपासाकरितां गेले. तेव्हां त्यांस असें समजलें कीं, आपले वडील कामर्लजेमान महाराज आपल्या शोधाकरितां आले आहेत. राजपुत्रांना वडिलांना भेटण्याची उत्कंठा होतीच. त्यांनीं नम्रपणें त्यांची भेट घेऊन त्यांच्या पायांवर डोकीं ठेवलीं. पुत्रांच्या अकल्पित भेटीमुळें कामर्लजेमानचा आनंद गगनांत मावेना. त्यानें पुनः पुनः त्यांस आलिंगन देऊन व जवळ बसवून त्यांची हकीकत विचारून घेतली. त्यांचे आपल्या मूर्खपणामुळें असे

हाल झाले, ह्या विचारानें त्यास अत्यंत दुःख झालें. नंतर तेथील राजानें मोठ्या समारंभानें त्यास नगरांत नेऊन त्याचा मोठा सत्कार केला. इतक्यांत खालदनद्वीपांचा राजा शाहजेमान पुत्राचा शोध करीत फौजेसह तेथें आला आहे असें समजलें. त्यालाही मोठ्या सन्मानानें राजानें नगरांत नेलें.

अशा तऱ्हेनें सर्वांच्या भेटीचा अपूर्व योग एकदम जमून आला. सर्वांनीं तीन दिवस तेथें आनंदांत घालविले. दुसऱ्या दिवशीं राजपुत्र आसादचें मार्ग्यांना राणीशीं व आंग्रादचें बोस्तमेशीं लग्न झालें. सर्व समारंभ उरकल्यावर राजा गैऊर, शाहजेमान, कामर्लजेमान व राणी मार्ग्याना हीं आपआपल्या मुलखास गेलीं. राणीनें आसादला आपल्याबरोबर नेलें. तेथील राजानें आंग्राद यास आपलें राज्य देऊन तेथेंच ठेवून घेतलें. त्यानेंही फार शहाणपणानें राज्य करून प्रजेस सुख दिलें.



## १०

# कृतघ्नपणाचें प्रायश्चित्त

पूर्वी इराण देशांत जुमान नांवाच्या प्रांतावर एक यवन राजा राज्य करीत होता. त्याच्या सर्वांगावर रक्तपितीचा रोग उठला होता. त्याच्या पदरच्या सर्व मोठमोठ्या वैद्यांनीं तो रोग घालविण्याकरितां अनेक उपाय केले; परंतु गुण येईना, त्यामुळें सर्व राजवैद्यांनीं अगदीं हात टेंकले. पुढें काय करावें हें कोणास सुचेना. इतक्यांत राजाच्या सुदैवानें दुवान नांवाचा एक अत्यंत नामांकित वैद्य त्याच्या नगरांत आला.

हा वैद्य म्हणजे जणूं धन्वंतरीचा अवतारच होता. त्याची विद्वत्ता व योजनाशक्ति अप्रतिम होती. त्याला अनेक भाषा येत होत्या त्यामुळें स्वभाषेंतीलच नव्हे तर त्या दुसऱ्या भाषांतीलही वैद्यकाचे सर्व ग्रंथ त्याला अवगत होते. तो प्रत्येक वनस्पतीचे व धातूचे गुणदोष उत्तम तऱ्हेनें जाणत असे. जुमान राजाच्या रोगाची हकीकत त्याला समजली तेव्हां एका ओळखीच्या गृहस्थामार्फत त्यानें राजाची भेट घेतली. व राजाला विनंती केली कीं, 'सरकार, आपणास रक्तपितीचा

रोग झाला आहे व त्यापुढें आपल्या वैद्यांनीं हात टेंकले आहेत असें मी ऐकिलें आहे; तर सरकारांनीं ह्या गरिबाकडून थोडी सेवा घेण्याची कृपा करावी. मी खात्रीनें ह्या रोगापासून आपणास बरें करीन. इतकेंच नव्हे तर मी असें प्रतिज्ञेनें सांगतों कीं, पोटांत कांहीं औषध न देतां अथवा अंगाला न लावतां मी आपला रोग बरा करीन.'

वैद्याचें भाषण ऐकून राजाला आश्चर्य तर वाटलेंच परंतु फार आनंदही झाला. तो म्हणाला, 'वैद्यबुवा, तुमच्या प्रतिज्ञेप्रमाणें मला जर गुण आला तर मी तुमचें व तुमच्या मुलांबाळांचें जन्माचें दारिद्र्य नाहींसें करीन आणि तुम्हांला अत्यंत प्रिय मित्र मानीन. परंतु मला तुमची ही प्रतिज्ञा अपूर्व दिसते.' वैद्यानें राजाला आश्वासन दिलें व दुसऱ्या दिवशीं औषध देण्याचें ठरवून तो घरीं गेला.

बिऱ्हाडीं आल्यावर त्यानें एक पोकळ दांडू तयार करून त्याच्या मुठींत औषध घातलें आणि एक प्रकारचा चेंडू तयार केला. नंतर दुसऱ्या दिवशीं ते दोन्ही जिन्नस घेऊन तो राजाच्या दरबारांत गेला व राजाला मुजरा करून त्यानें विनंती केली कीं, 'सरकार, आपण आपल्या घोड्यावर स्वार होऊन एका मोठ्या मैदानांत चलावें.' त्याप्रमाणें राजा मैदानांत आल्यावर वैद्यानें त्याला चेंडू व दांडू दिला आणि सांगितलें, 'महाराज, ह्या चेंडू-दांडूनें आपण सर्वांगास घाम सुटेपर्यंत खेळावें. मीं ह्या दांडूंत कांहीं औषध घातलें आहे. मेहनतीनें आपले हात तप्त झाले कीं, त्या उष्णतेनें दांडूंतील औषध

वितळून आपल्या सर्व शरीरांत भिनेल. आपणांस पुष्कळ घाम आला म्हणजे खेळणें बंद करून घरीं जावें. गेल्याबरोबर अंग खूब चोळून स्नान करावें व नंतर बिछान्यावर जाऊन स्वस्थ निजावें. पहांटेस उठून पहाल तों आपला रोग नाहींसा होऊन अंग निर्मळ झालें आहे असें आपल्या दृष्टीस पडेल.'

वैद्यानें सांगितल्याप्रमाणें राजानें सर्व गोष्टी बिनचूक केल्या. दुसऱ्या दिवशीं पाहतो तों रोग साफ नाहींसा होऊन आपलें अंग पूर्णपणें निर्मळ झालें आहे. तेव्हां त्याचा आनंद गगनांत मावेना. तो पोशाक करून दरबारांत गेल्यावर सर्व मंत्र्यांना त्यानें आपलें अंग दाखविलें. राजा अगदीं बरा झाला हें पाहून सर्वांस अतिशय आनंद झाला. कांहीं वेळानें दुवान वैद्यही दरबारास आला व राजास लवून मुजरा करून उभा राहिला. राजानें त्याला पाहतांच जवळ बोलावून त्याचा हात धरून त्यास आपल्या शेजारीं सिंहासनावर बसविलें आणि सर्वांस त्याची ओळख करून देऊन त्याची फार फार वाखाणणी केली. दुसऱ्या दिवशीं राजानें त्यास एक मोठी मेजवानी दिली व एक बहुमोल भरजरी पोशाख व एक लक्ष पुतळ्या त्यास बक्षीस दिल्या. वैद्यानें आपणावर केलेले उपकार कधींही फिटावयाचे नाहींत ह्या जाणिवेनें राजा त्याला रोज निरनिराळ्या नवीन नवीन देणग्या देऊं लागला व दरबारांत त्यानें त्याचा मानही खूप वाढविला.

परंतु हा त्याचा उत्कर्ष मुख्य प्रधानास पाहवला नाहीं. तो मोठा लोभी, दुष्ट व दुसऱ्याचें बरें न पाहणारा होता. तो

दुवान वैद्याचा द्वेष करूं लागला. आणि त्याच्यावर राजाची इतराजी होईल अशी युक्ति काढण्याच्या उद्योगास लागला.

एके दिवशीं तो राजवाड्यांत गेला व राजाला एकांतांत गांठून म्हणाला, 'महाराज, आपणांस एक महत्त्वाची गोष्ट सांगावयाची आहे. परवानगी असल्यास सांगतों.' राजानें अनुमति दिल्यावर वजीर म्हणाला, 'सरकार, ज्याची स्वामि-भक्ति कसोटीस लावून पाहिली नाहीं अशा मनुष्यावर राजानें कधीं विश्वास ठेवूं नये. त्यामुळें अनर्थ होण्याचा संभव असतो. दुवान वैद्यावर आपण हल्लीं देणग्यांचा वर्षाव करीत आहां व त्याला दरबारांत बरोबरीनें वागवीत आहांत. तो आपला हितचिंतक आहे असें आपणांस वाटतें. परंतु ह्याविषयीं आपण कधीं खात्री करून घेतली आहे काय? तो आपल्या शत्रूकडून आपला नाश करण्याच्या हेतूनें कशावरून आला नसेल?' हें वजिराचें भाषण ऐकून राजाला थोडा राग आला. तो म्हणाला, 'वजीर, तूं कोणासमोर बोलतो आहेस ह्याची तुला आठवण आहे काय? दुवान वैद्य माझा प्राणदाता आहे. त्याच्याविषयीं असलें भाषण मी कधींही ऐकून घेणार नाहीं. तूं इतक्या धिटाईनें बोलतोस तो कोणत्या आधारावर?' वजीर नम्रपणानें म्हणाला, 'महाराज, मी सबळ आधार असल्याशिवाय आपणांस सांगण्याचें धाडस कसें करीन? ह्या गरीब सेवकाची आग्रहाची विनंती आहे कीं, आपण त्या मनुष्यावर विश्वास ठेवूं नये. तो आपला देश सोडून ह्या परकी मुलखांत कांहीं राहण्याकरितां आला

नाहीं. मीं सांगितल्याप्रमाणें त्याचा खात्रीनें दुष्ट हेतु आहे.' राजानें वजिराचें भाषण यत्किंचित्ही मनावर घेतलें नाहीं. तो म्हणाला, 'वजीर, तूं केवळ मत्सरानें त्या सज्जन मनुष्या-विषयीं असें विपरीत भाषण करीत आहेस. अरे, त्यानें दिलेलें औषध म्हणजे एक दैवी चमत्कारच होय. त्यानें मला पुनर्जन्म दिला आहे. तो येथें न येता तर मी आज खात्रीनें जिवंत दिसलों नसतों. माझा त्याच्यावर पूर्ण विश्वास आहे. तूं माझ्या मनांत त्याच्याविषयीं विपरीत कल्पना भरवूं नको. तुझ्या बोलण्यावर माझा कधींही विश्वास बसणार नाहीं.'

राजा इतकें निक्षून बोलला तरी प्रधानानें आपली चिकाटी सोडली नाहीं. त्या वैद्याचा नाश करण्याचा जणूं त्यानें पणच केला होता. तो अदबीनें म्हणाला, 'महाराज, आपण शांतपणें विचार करा. दुवान वैद्य आपला घात करण्यास आला आहे असा लोकही आरोप करतात. तो संशयित असला तरी जेथें राजे लोकांच्या प्राणांच्या सुरक्षितपणाविषयीं प्रश्न असतो तेथें अधिक खबरदारी घेतली असतां कोणीही दोष देणार नाहीं. दुवान वैद्यास आपण मारिलें तर आपण निरपराधी माणसास मारिलें असें होईल असा विचार बिलकुल मनांत आणूं नये. मीही आपला जुना विश्वासू चाकर आहें. आपल्या जिवास धक्का लागूं नये ही काळजी मलाही आहे. म्हणूनच माझ्यानें बोलल्याशिवाय राहवत नाहीं. माझी आपणांस कळकळीची विनंती आहे कीं, आपण त्या वैद्यावर विश्वास ठेवूं नये. ठेवल्यास आपला निश्चित नाश होईल. महाराज, दुसरें

असें कीं, आपण एका दिवसांत साफ बरे झालां; हा गुण कायमचा आहे कशावरून ? कित्येक औषधांचे गुण मोठे चमत्कारिक असतात. तेव्हां या औषधापासून पुढें एकाएकीं आपणांस मोठा अपाय कशावरून होणार नाहीं ?'

तो यवन राजा मूर्ख होता. वजिराच्या ह्या बोलण्याचा त्याच्या मनावर परिणाम झाला व त्याचा पूर्वीचा ग्रह बदलला. तो म्हणाला, 'वजीर, तूं म्हणतोस तें खरें असावें. तो दुष्ट वैद्य माझा घात करण्यासाठींच आला असावा. त्याच्या त्या अद्भुत औषधाची फार भीति वाटते. त्यामुळें तो माझा जीव एका क्षणांत घेऊन आपला हेतु सिद्धीस नेणार नाहीं कशावरून ? तेव्हां आपणाला नीट विचार करून विलंब न लावितां ह्या संकटाचें निवारण केलें पाहिजे.'

राजाची वृत्ति आपल्याला पाहिजे तशी अनुकूल आहे हें ओळखून वजीर म्हणाला, 'या प्रसंगीं अत्यंत तांतडीचा व खात्रीचा उपाय मला एकच सुचतो, तो हा कीं, त्या वैद्यास आतांच्या आतां येथें बोलवावें व तो आल्याबरोबर त्याचा शिरच्छेद करावा, म्हणजे कायमचें संकट टळलें.' राजाला प्रधानाची ती युक्ति फार पसंत पडली व त्यानें ताबडतोब वैद्यास बोलावण्यास शिपाई पाठविला. वैद्यास इकडील कसल्याच गोष्टीची कल्पना नसल्यामुळें तो ताबडतोब राजवाड्यांत आला.

त्याला पाहातांच राजा म्हणाला, 'वैद्यबुवा, तुम्हांला मीं कां बोलाविलें हें कळलें का ?' वैद्य म्हणाला, 'नाहीं महाराज.' राजा म्हणाला, 'ऐका तर, तुमचें डोकें उडवून तुमच्या भयांतून मी कायमचा मुक्त होणार आहे.

वैद्याला तें भाषण ऐकून पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें. तो मोठ्या नम्रतेनें म्हणाला, ' महाराज, माझा प्राण घेण्याइतका माझ्या हातून कोणता भयंकर अपराध घडला ? ' राजा म्हणाला, ' मला असें निश्चित समजलें आहे कीं, तूं माझ्या शत्रूकडून माझा जीव घेण्यासाठीं आला आहेस. तेव्हां तूं माझा प्राण घेण्यापूर्वी मीच तुझा प्राण घेऊन निर्भय होणार. ' असें म्हणून राजानें अपराध्यांचा वध करणाऱ्या मांगास वैद्याचें मस्तक तोडण्यास सांगितलें.

इतक्या वेळांत वैद्याला, काय झालें असावें, राजा आपणावर कां रागावला आहे, याची कल्पना आली. तो मनांत म्हणाला, ' ज्याला माझा उत्कर्ष पाहवत नाहीं अशा कोणी दुष्टानें राजाचे कान फुंकले असावे. असल्या मूर्ख व कृतघ्न मनुष्याला मी औषध देऊन व्यर्थ वांचविलें ! परंतु आतां काय उपयोग ? ' वैद्यानें पुनः पुनः नम्रपणानें व कळवळ्यानें आपणास न मारण्याविषयीं विनंती केली परंतु राजानें ती ऐकिली नाहीं. राजाच्या पदरीं जे मोठमोठे अमीर उमराव होते त्यांना ही बातमी कळतांच ते त्या ठिकाणीं आले व त्यांनींही वैद्याचा जीव न घेण्याविषयीं राजाची मनधरणी केली. परंतु राजानें त्यांच्याकडे रागानें पाहतांच ते गप्प बसले.

शेवटीं राजाज्ञेप्रमाणें मांगानें दुवान वैद्याचे हातपाय व डोळे बांधले व त्यास गुडघे टेंकून खालीं मान घालून उभें केलें आणि आतां तो तरवारीचा घाव घालणार, इतक्यांत वैद्य पुनः एकदां प्रार्थना करून म्हणाला, ' महाराज, आपण मला


मारणारच तेव्हां माझा कांहीं इलाज नाहीं ! ईश्वरी इच्छा. पण कृपा करून माझी एक अखेरची इच्छा आपण पुरी करावी. माझा वध आज न करतां उद्यां करावा. इतक्या वेळांत मी घरीं जाऊन माझ्या मालमत्तेची व्यवस्था लावीन, दानधर्म करीन, माझ्या उत्तरक्रियेची व्यवस्था मुलांना सांगेन व त्यांचा शेवटचा निरोप घेईन. मजजवळच्या वस्तूंपैकीं ज्या ज्यांच्या उपयोगीं पडण्यासारखा आहेत त्या त्यांना देईन आणि माझ्या पुस्तकांमध्यें एक अत्यंत महत्त्वाचें पुस्तक आहे, त्यांत अनेक रोगांवर रामबाण औषधें लिहिलीं आहेत तें सरकारच्या पायांपाशीं सादर करीन. तें कृपा करून आपल्या संग्रहांत ठेवावें.' राजानें विचारलें, 'एवढी वाखाणणी करण्यासारखें त्या पुस्तकांत विशेष काय आहे?' वैद्यानें उत्तर दिलें, 'महाराज, त्यांत पुष्कळ अद्भुत गोष्टी लिहिल्या आहेत, त्यांपैकीं एक अशी कीं, माझें मस्तक तोडल्यावर आपण तें आपल्यापुढें ठेवावें व त्या पुस्तकाचें सातवें पान उघडून त्यांतली तिसरी ओळ वाचावी आणि मग प्रश्न विचारावे. आपण विचाराल तितक्या प्रश्नांचीं उत्तरें माझें शिर देईल.' हें ऐकून राजास आश्चर्य वाटलें. तो चमत्कार पाहण्यासाठीं त्यानें वैद्यास मारण्याचें तहकूब करून शिपायांच्या पहाऱ्यांत त्यास घरीं पाठविलें.

घरीं गेल्यावर वैद्यानें जी जी व्यवस्था करावयाची होती ती केली. दुसऱ्या दिवशीं राजसभेंत मोठा चमत्कार होणार आहे अशी बातमी सगळ्या शहरांत पसरल्यावरून सर्व

अमीर उमराव, शेटसावकार व तमाम लोक मौज पाहण्याकरितां राजाच्या सभेंत जमले. थोड्याच वेळांत शिपायांच्या पहाऱ्यांत दुबान वैद्य दरबारांत आला. त्याच्या हातांत एक मोठें पुस्तक होतें. तो तसाच राजाच्या सिंहासनाजवळ जाऊन म्हणाला, ' महाराज, एक मोठें ताट आणवावें.' ताट आणविल्यावर त्यानें त्यावर पुस्तकाचें वेष्टन पसरिलें व पुस्तक राजाच्या हातीं दिलें. नंतर तो म्हणाला, ' महाराज, माझें मस्तक कापल्याबरोबर ह्या ताटांतल्या वेष्टणावर ठेवावें म्हणजे त्यांतून रक्त वाहण्याचें एकदम बंद होईल. नंतर आपण पुस्तक उघडून त्यास प्रश्न करावे म्हणजे तें त्यांचीं उत्तरें ताबडतोब देईल. परंतु महाराज, मी पुनः एकदां शेवटची प्रार्थना करितों कीं, आपण मला मारूं नये. त्यांत आपलें कल्याण आहे.'

तो चमत्कार पाहण्यास राजा फार उत्सुक झाला होता म्हणून त्यानें वैद्याच्या बडबडीकडे लक्ष न देतां मांगास त्याचें मस्तक तोडण्याचा हुकूम केला. मांगानें अशा कौशल्यानें हात मारिला कीं, तें मस्तक नेमकें त्या ताटांत जाऊन पडलें व त्याबरोबर त्यांतील रक्त वाहणें बंद झालें. नंतर तें मस्तक डोळे उघडून राजास म्हणालें, ' महाराज, कृपा करून पुस्तक उघडून प्रश्न विचारावे.' तें मस्तक बोललेलें पाहून सर्वांस मोठा विस्मय वाटला. राजा पुस्तकाचीं पानें उलटूं लागला. तीं डकल्यासारखीं वाटल्यामुळें तो जिभेस बोट लावून ओलें करी. सहा पानें उलटल्यावर सातवें पान कोरें दिसलें. तेव्हां राजा

म्हणाला, 'अरे, हें पान तर कोरेंच आहे.' शिर म्हणालें, 'आणखी पानें उलटा.' त्याप्रमाणें तो आणखी पानें उलटूं लागला. प्रत्येक वेळीं तो बोट जिभेस लावून तें ओलें करी. त्या पानांना विष लावलेलें होतें. राजा वरचेवर जिभेस बोट लावी; त्यामुळें प्रत्येक वेळीं थोडथोडें विष पोटांत जाऊन तें रक्तांत भिनतांच राजास चक्कर येऊन तो सिंहासनावरून खालीं पडला आणि मोठ्या दुःखानें तळमळत हात पाय झाडूं लागला. तेव्हां तें शिर त्याला म्हणालें, 'तुजसारखे जे नीच राजे आपल्या जुलमी अमलाच्या योगानें गरीब अनाथांस पीडा देतात त्यांना ईश्वर असेंच शासन करतो. फरक इतकाच कीं, कोणास तें ताबडतोब व कोणास उशिरां मिळतें. पण मिळाल्याशिवाय राहत नाहीं.' इतकें बोलून तें मस्तक निर्जीव होऊन पडलें.



११

## नववा पुतळा

पूर्वी बसोरा शहरांत एक राजा राज्य करीत होता. तो प्रजेच्या कल्याणाकरितां नेहमीं झटत असल्यामुळें त्याची प्रजा फार संतुष्ट व सुखी होती. तथापि त्याला संतति नसल्यामुळें फार वाईट वाटे. त्याकरितां त्यानें पुष्कळ दानधर्म व इतर पुण्यकृत्यें केलीं. शेवटीं ईश्वराच्या कृपेनें त्याला एक मुलगा झाला. त्याचें नांव त्यानें झेन अलसनाम ( मदनाचा पुतळा ) असें ठेविलें.

आपला मुलगा पुढें कसा निपजेल ह्याविषयीं राजानें मोठमोठ्या ज्योतिष्यांचें मत विचारिलें. तेव्हां सर्वांनीं सांगितलें कीं, ‘ हा मोठा शूर, धैर्यवान् व दीर्घायुषी होईल. तथापि याजवर इतकीं मोठमोठीं संकटें येणार आहेत कीं, त्यांपुढें ह्याचा टिकाव लागणार नाहीं. ’ तेव्हां राजा म्हणाला, ‘ तो शूर निपजेल ना ? बस झालें. संकटांची परवा नाहीं. संकटांमुळेंच मनुष्याचें धैर्य कसास लागतें व त्याची योग्यता वाढते. ’

आपल्या एकुलत्या एक मुलास राजा प्राणांपलीकडे जपत असे. त्यानें उत्तम विद्वान् शिक्षकांच्या देखरेखीखालीं त्याचा विद्याभ्यास करविण्याची योजना केली. हळूहळू तो हुशार होऊं लागला. परंतु लवकरच राजा आजारी पडला व कांहीं दिवसांनीं मरण पावला. मरतेसमयीं त्यानें झेनला जवळ बोलावून त्याला पुष्कळ उपदेश केला. तो म्हणाला, ‘ बाळा, तूं आपल्या प्रजेवर दयाळूपणानें राज्य करून तिची प्रीति संपादन कर. धूर्त व कावेबाज लोकांपासून दूर रहा. राज्य-कारभार योग्य व शाहाण्या प्रधानांच्या हातीं दे. ’

राजाच्या मृत्यूनंतर योग्य दिवशीं झेन सिंहासनावर बसला. लहानपणींच एवढी सत्ता व संपत्ति हातीं आल्यामुळें त्याला सुखोपभोगांची चटक लागली व प्रजेविषयींचें कर्तव्य तो पार विसरून गेला. मोठमोठ्या जबाबदारीच्या कामांवर त्यानें आपल्या सवंगड्यांस नेमलें त्यामुळें सर्वत्र अंदाधुंदी माजली. चैनीपायीं लवकरच खजिना रिकामा झाला.

झेनची आई फार शाहाणी व समजूतदार होती. तिनें मुलास त्याच्या उधळेपणाबद्दल व व्यसनीपणाबद्दल फार दोष दिला आणि सांगितलें कीं, ‘तूं जर असाच वागशील तर लवकरच प्रजा असंतुष्ट होऊन बंड करील आणि त्यांत कदाचित् तूं आपल्या जिवालाही मुकशील.’ तथापि झेननें आईच्या ह्या उपदेशाकडे लक्ष न देतां आपला क्रम तसाच चालविला व शेवटीं तिच्या भाकिताप्रमाणें राज्यांत बंडाळी सुरू झाली. तेव्हां झेनचे डोळे उघडले. त्याला आपल्या मूर्खपणाबद्दल

फार पश्चात्ताप झाला व आतां यापुढें आईच्या उपदेशाप्रमाणें वागावयाचें असा निश्चय करून तो तिला म्हणाला, 'आई, माझ्या अपराधाबद्दल मला क्षमा कर. मला तुझ्या उपदेशाची प्रतीति आली. ह्यापुढें तुझ्या आज्ञेबाहेर मी यत्किंचित्‌ही जाणार नाहीं. आतां या प्रसंगांतून कसें पार पडावयाचें हें तूंच सांग.' पुत्राच्या वर्तनांत झालेला हा इष्ट फरक पाहून राणीला फार आनंद झाला व तिनें मोठमोठ्या वजनदार लोकांना बोलावून आणून त्यांची समजूत घातली व त्यांस प्रजाजनांस शांत करण्यास सांगितलें. तसेंच राज्यकारभार पूर्वींच्या अनुभवी व पोक्त प्रधानांच्या हातीं दिला.

एके दिवशीं झेनला स्वप्नांत एक म्हातारा मनुष्य दिसला. तो त्याला म्हणाला, 'झेन, तूं हें लक्षांत ठेव कीं, संकटाच्या मागून आनंद व दुःखाच्या मागून सुख आहेच. करितां तुला जर सुख पाहिजे असेल तर तूं येथून मिसर देशांत केरो शहरीं जा म्हणजे तेथें तुझें नशीब उदयास येईल.'

सकाळीं उठल्यावर झेननें रात्रींचें स्वप्न आपल्या आईस सांगितलें व नशिबाची परीक्षा पाहण्यासाठीं मिसर देशास जाण्यासाठीं तिची आज्ञा मागितली. आईनें त्याला, स्वप्नांतल्या गोष्टी खऱ्या नसतात तेव्हां त्यांवर शाहाण्या माणसानें विश्वास ठेवूं नये इत्यादि पुष्कळ प्रकारांनीं सांगून त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यानें आपला हट्ट सोडिला नाहीं व राज्याचा भार तिच्यावर सोंपवून एके दिवशीं रात्रीं तो एकटाच गुप्तपणें केरो शहरास निघून गेला.

वाटेंत त्याला पुष्कळ श्रम व त्रास झाला. तो केरो शहरास पोहोंचला तेव्हां त्या शहराचा भव्यपणा, सौंदर्य व विस्तार पाहून त्याला फार आश्चर्य वाटलें. तो फार थकला असल्यामुळें एका मशिदींत उतरला व विश्रांति घेत पडला असतां त्याला झोंप लागली. तितक्यांत त्याला स्वप्न पडून तो पूर्वींचाच म्हातारा दिसला. तो म्हणाला, 'तूं माझ्या शब्दावर भरंवसा ठेवून इतके श्रम व त्रास सोसून येथें आलास यामुळें मला फार संतोष झाला. मी तुझी कसोटी पाहिली. माझी आतां खात्री झाली कीं, तूं धैर्यवान् व दृढनिश्चयी आहेस. आतां मी खचित तुला संपत्तिमान् व सुखी करीन. आतां तूं परत बसोऱ्यास जा. तेथें तुझ्या वाड्यांतच तुला इतकें द्रव्य सांपडेल कीं, तूं पृथ्वीवरील सर्व राजांहून श्रीमंत होशील.'

या स्वप्नापासून झेन याला मुळींच आनंद झाला नाहीं. आपण विनाकारण ह्या स्वप्नाच्या नादीं लागलों असा त्यास पश्चात्ताप झाला. तो मोठ्या खिन्न अंतःकरणानें परत बसोऱ्यास आला. त्याच्या प्रवासाची हकीकत आईशिवाय दुसऱ्या कोणालाच माहीत नव्हती त्यामुळें विशेष गवगवा झाला नाहीं. त्यानें आईला घडलेली हकीकत सांगितली व 'तुझें न ऐकिल्याबद्दल मला फार पश्चात्ताप होतो,' असेंही तो म्हणाला. आईनें गोड शब्दांनीं त्याची समजूत केली. ती म्हणाली, 'बाळा, तूं वाईट वाटून घेऊं नको. परमेश्वरानें तुझ्या कपाळीं संपत्ति लिहिली असली तर ती घरबसल्या तुझ्याकडे चालून येईल. तूं स्वस्थ ऐस. मात्र आतां तूं प्रजेच्या

हिताकडे लक्ष देत जा, म्हणजे तुला कशाचीही उणीव पडणार नाहीं.' झेननें त्याप्रमाणें वागण्याचें ठरविलें. परंतु त्याच रात्रीं पुनः तो पूर्वींचाच वृद्ध गृहस्थ त्याच्या स्वप्नांत येऊन म्हणाला, 'झेन, तुझा उदयकाळ जवळ आला आहे. उद्यां सकाळीं उठल्याबरोबर तूं एक कुदळ घेऊन आपल्या बापाच्या खोलीची जमीन खण. तेथें तुला अगणित द्रव्य सांपडेल.'

सकाळीं झेन धावतच आईकडे गेला व त्यानें तिला मोठ्या उत्सुकतेनें रात्रींचें स्वप्न सांगितलें. तेव्हां ती हसून म्हणाली, 'खरेंच बाळा, त्या मनुष्यानें तुझा अगदीं पिच्छाच पुरविला आहे! त्यानें दोनदां तुला फसविलें तरी अजून तूं त्याच्यावर विश्वास ठेवण्यास तयार आहेस काय?' झेन म्हणाला, 'विश्वास मुळींच नाहीं, पण मनाचा संशय फेडण्या-करितां जमीन खणून पाहतों.' आई म्हणाली, 'बरें तर, घे तुझा संशय फेडून.'

नंतर झेन एकटाच कुदळ घेऊन आपल्या बापाच्या खोलींत गेला व त्यानें तेथील जमीन बरीच खोल खणली. तथापि द्रव्याचें कांहीं चिन्ह दिसेना. आपली फजिती होणार असें त्यास वाटूं लागलें. तथापि धैर्य न सोडतां त्यानें आणखी थोडी जमीन खणली. तेव्हां एकाएकीं एक पांढरा दगड त्याच्या दृष्टीस पडला. त्यानें तो काढला तों एक कुलूप असलेलें दार त्याचे दृष्टीस पडलें. त्यानें कुदळीनें कुलूप फोडून तें दार उघडलें तों खालीं एक संगमरवरी पायऱ्यांचा जिना दिसला. मेणबत्ती पेटवून तो त्या जिन्यावरून खालीं गेला. तेथें एक

खोली होती. तिची जमीन संगमरवरी दगडाची व भिंती व कडीपाट स्फटिकाचीं होतीं. तेथें चार मोठ्या घडवंच्या असून त्यांवर दहा दहा बरण्या ठेवल्या होत्या. झेनला वाटलें त्यांत बहुधा दारू असावी. त्यानें एका बरणीचें झांकण उघडलें तों तींत कांठोकांठ मोहोरा भरलेल्या दिसल्या. त्याला मोठें आश्चर्य वाटलें व त्यानें त्या सर्व बरण्या उघडून पाहिल्या. त्याही मोहोरांनींच भरलेल्या होत्या. त्यानें एका बरणींतल्या ओंजळभर मोहोरा काढल्या आणि तो आईकडे गेला.

त्यानें सर्व हकीकत आईस सांगितली तेव्हां तिलाही मोठा आनंद झाला व ती त्याच्याबरोबर खालीं तळघरांत गेली. तिनें बारकाईनें सर्व पाहिलें तों आणखी एक लहानशी बरणी तिला दिसली. तींत एक सोन्याची किल्ली सांपडली. ही अशाच दुसऱ्या एकाद्या खजिन्याची किल्ली असावी असा तर्क करून त्यांनीं त्या हेतूनें चोहोंकडे शोधून पाहिलें तों एके ठिकाणीं त्यांना किल्लीचें भोंक आढळलें. तेथें त्यांनीं ती लावून फिरविली तोंच एक दार उघडलें. त्यांतून तीं आंत गेलीं तों एक दुसरी खोली लागली. तिच्या मध्यभागीं मोठमोठ्या नऊ तिवया असून त्यांपैकीं आठांवर हिऱ्यांचे एकसंधी पुतळे होते. त्यांच्या तेजामुळें खोलींत स्वच्छ प्रकाश पडला होता.

झेन तें सर्व पाहून आश्चर्यचकित होऊन म्हणाला, 'बाबांनीं इतकें द्रव्य कोठून मिळविलें असावें, भगवान् जाणे!' त्या नवव्या रिकाम्या तिवईच्यासंबंधानें त्याला फारच आश्चर्य

वाटलें. कारण तिच्यावर एक पांढरी साटीण पसरिली असून तिजवर असें लिहिलेलें होतें कीं, 'प्रियकर पुत्रा, हे आठ पुतळे मिळविण्याला मला पराकाष्ठेचे श्रम पडले आहेत. या पृथ्वींत आणखी एक नववा पुतळा आहे. तो इतका सुंदर व बहुमोल आहे कीं, हे आठही पुतळे त्याच्या पासंगालासुद्धां पुरणार नाहींत. तो मिळविण्याची तुझी इच्छा असेल तर तूं केरो शहरास जा. तेथें मुबारिक नांवाचा माझा गुलाम राहतो. तो सर्वांना ठाऊक असल्यामुळें त्याचें घर कोणीही तुला दाखवील. त्याला भेटून तूं आपली हकीकत सांग. तूं माझा मुलगा आहेस हें कळतांच तो नववा पुतळा मिळवून देण्याच्या बाबतींत सर्व प्रकारचें साह्य तो तुला करील.'

हें वाचतांच तो आईला म्हणाला, 'आई, तो नववा पुतळा कांहीं झालें तरी आपल्याला मिळविलाच पाहिजे. ती एक अजब चीज असली पाहिजे. मी आजच केरो शहरास जाण्याची तयारी करितों. तूंही मला आशीर्वाद दे.' आई म्हणाली, 'बेटा, तुझ्यावर पैगंबराची पूर्ण पाखर आहे. तेव्हां माझी तुला पूर्ण संमति व आशीर्वाद आहे. तूं खुशाल जा व यश मिळवून ये. इकडील कांहीं काळजी करूं नको.' त्याच दिवशीं झेन आपल्याबरोबर फक्त थोडेसे गुलाम घेऊन केरो शहरास जाण्यासाठीं निघाला.

वाटेंत कांहींएक अडथळा न येतां झेन केरो येथें पोहोंचला. तेथें त्यानें मुबारिकच्या घराचा शोध केला. तेव्हां लोकांनीं तें दाखविलें. त्यांच्या तोंडून त्यास असेंही समजलें कीं,

मुबारिक एकाद्या उमरावाप्रमाणें श्रीमंती थाटानें राहतो. त्याच्या घरीं जाण्यास कोणासच अटकाव नाहीं. विशेषतः परदेशच्या मनुष्यास तर मुळींच नाहीं. झेननें दरवाजाला धक्का दिला तेव्हां एका गुलामानें तो उघडला व 'आपण कोण, काय उद्देशानें आलां' वगैरे प्रश्न त्याला विचारिले. झेन म्हणाला, 'मी मुशाफर आहें. मुबारिकसाहेबांच्या उदारपणाची कीर्ति ऐकून त्यांच्याकडे उतरण्याच्या उद्देशानें आलों आहें.' त्या गुलामानें त्यास थांबण्यास सांगितलें व आपल्या धन्याकडे जाऊन त्याला सर्व हकीकत कळविली. मुबारिकनें झेन यास आंत घेऊन येण्यास गुलामास सांगितलें. गुलामानें झेन यास भेटीच्या दिवाणखान्यांत नेलें. तो दिवाणखाना हंड्या, झुंबरें, तसबिरा, इत्यादि वस्तूंनीं फार सुशोभित केलेला होता. मुबारिक यानें झेनचें मोठें आदरातिथ्य केलें व विनयपूर्वक म्हटलें, 'आपण कृपा करून माझ्या येथें आलां याबद्दल मी आपला फार आभारी आहें.' झेननेंही त्याच्या थोरपणाची खूप प्रशंसा केली व उलट आभार मानून म्हटलें, 'मी बसोऱ्याच्या माजी राजाचा मुलगा झेन अलसनाम.' मुबारिक म्हणाला, 'अहो, मी सुमारें बावीस वर्षांपूर्वी बसोऱ्याच्या राजेसाहेबांच्या पदरीं पुष्कळ वर्षे होतों. त्या वेळीं त्यांना मूलबाळ नव्हतें! आपण त्यांचेच चिरंजीव आहां ह्याबद्दल माझी खात्री कशी करणार?' झेन म्हणाला, 'माझ्या वडिलांच्या खोलींत एक तळघर आहे, त्यांत मोहोरांच्या चाळीस बरण्या सांपडल्या.' मुबारिकनें विचारलें, 'आणखी

कांहीं सांपडलें का ?' झेन म्हणाला, 'आणखी एका खोलींत सोन्याच्या नऊ तिवया सांपडल्या. त्यांपैकीं आठांवर हिऱ्याचे पुतळे आहेत व नववीवर एक साटीण पसरली असून तो नववा पुतळा तुम्ही मला मिळवून द्याल असें तीवर लिहिलें आहे.'

हे झेनचे शब्द ऐकतांच मुबारिकनें त्याच्या पायांवर डोकें ठेविलें व त्याच्या हाताचें वारंवार चुंबन घेतलें. नंतर तो म्हणाला, 'आतां तुमच्याविषयीं माझी खात्री पटली. तुमची इच्छा असल्यास तो पुतळा पाहावयास मी तुम्हांला नेईन. पण आपण दमून आलां आहां. तेव्हां कांहीं दिवस विश्रांति द्या.' त्याचें म्हणणें झेननें कबूल केलें. नंतर मुबारिकच्या घरीं सरकारी कामगारांना मेजवानी होती तेथें तो झेन यास घेऊन गेला व त्यानें त्यास आग्रहपूर्वक भोजनास वाढविलें. तसेंच त्याची इतरांशीं ओळख करून देऊन, 'हे माझे धनी आहेत,' असें त्यांस सांगितलें. परंतु झेननें सर्वांसमक्ष मुबारिक याची गुलामगिरींतून मुक्तता केली. तेव्हां मुबारिक यानें त्यास साष्टांग नमस्कार घालून त्याचे फार फार आभार मानिले.

दुसरे दिवशीं झेन मुबारिक यास म्हणाला, 'आतां मला विश्रांति पुष्कळ मिळाली. मी कांहीं चैनीकरितां आलों नाहीं. तो नववा पुतळा प्राप्त करून घेण्याचा मला ध्यास लागला आहे. तेव्हां आपण त्या उद्योगाला लागल्यास चांगलें होईल.' मुबारिक यानें त्याजबरोबर जाण्याची आपली तयारी दर्शविली; पण वाटेंत किती भयंकर संकटें येतील याची त्याला

जाणीव दिली. झेन यानें मनाचा पक्का निर्धार केलेला असल्यामुळें त्याला संकटांची परवा नव्हती व त्याप्रमाणें त्यानें मुबारिक यास सांगितलें.

मुबारिकनें त्याचा दृढनिश्चय पाहून निघण्याची तयारी करण्यास नोकरांस सांगितलें. तयारी होतांच देवाचें नांव घेऊन ते निघाले. मजल दरमजल करीत जात असतां ते एका आंबराईपाशीं आले. तेथें आपलें सामानसुमान नोकरांच्या स्वाधीन करून त्यांनीं त्यांस तेथेंच थांबण्यास सांगितलें व 'आम्ही जरा कामासाठीं जाऊन येतों' असें त्यांस सांगून ते दोघेच पुढें निघाले. जातांना मुबारिक म्हणाला, 'तो नवबा पुतळा ज्या ठिकाणीं आहे त्या ठिकाणापाशीं आपण आलों आहों. आतां आपणांस भितां कामा नये. हीच वेळ मोठी आणीबाणीची आहे.'

बोलतां बोलतां ते एका तलावापाशीं आले. मुबारिक झेनला म्हणाला, 'आतां येथें यक्षांच्या राजाची एक होडी येईल. होडीवाल्याचें विलक्षण रूप तुम्हांस दिसेल. तथापि एक गोष्ट पक्की ध्यानांत ठेवा कीं, आपण होडींतून पलीकडील तीरावर जाऊन उतरेपर्यंत अगदीं मौनव्रत धारण करावयाचें. एक चकार शब्द बोललांत तर लागलीच होडी बुडून जाईल.' झेननें मुबारिकच्या सांगण्याप्रमाणें अक्षरशः वागण्याचें कबूल केलें. इतक्यांत एकदम तळ्यांत एक होडी दिसूं लागली. ती चंदनाच्या लांकडाची असून तिची डोलकाठी अंबरवृक्षाची होती व शीड निळ्या साटिणीचें होतें.

होडीवरील कोळ्याचें डोकें हत्तीचें व अंग वाघाचें होतें. ती होडी किनाऱ्याला लागतांच त्या राक्षसी नावाड्यानें आपल्या सोंडेनें त्या दोघांना उचलून होडींत बसविलें व होडी एका क्षणांत पलीकडच्या कांठास नेली. तेथें पूर्वीप्रमाणेंच त्यानें त्यांस आपल्या सोंडेनें उचलून जमिनीवर ठेविलें आणि लागलीच तो व ती होडी अदृश्य झालीं.

नंतर मुबारिक म्हणाला, 'आतां आपणांस बोलण्यास हरकत नाहीं. हा अत्यंत शांत व रमणीय प्रदेश यक्षांच्या राजाचा आहे. येथें स्वर्गाप्रमाणें सर्व सुखें भरलेलीं आहेत.' झेनलाही तो आल्हाददायक देखावा पाहून फार आनंद झाला. जातां जातां ते यक्षांच्या राजाच्या वाड्यासमोर आले. तो वाडा पाच व हिरे यांनीं बांधलेला होता. त्याच्याभोंवतीं एक भला मोठा खंदक असून त्याच्या कांठावर गगनचुंबित उंच उंच वृक्ष लावलेले होते. त्यांची छाया घनदाट असल्या-मुळें राजवाड्यावर ऊन मुळींच पडत नसे. वाड्याची देवडी सोन्याची होती. तिच्या समोरील बाजूस खंदकावर एक पूल होता. तो फक्त एकाच माशाच्या हाडाचा केला होता. त्याची लांबी सुमारें सहा वांवा व रुंदी तीन वांवा होती. पुलाच्या तोंडाशीं राक्षसासारखे धिप्पाड यक्ष हातांत मोठ-मोठे लोखंडी भाले घेऊन राजद्वाराचें रक्षण करीत होते.

मुबारिक म्हणाला, 'आतां आपणांस पुढें जातां कामा नये. हे यक्ष आपणांस ठार मारून टाकतील. त्यांना आपल्याकडे येतांच येणार नाहीं अशा प्रकारची व्यवस्था

कांहीं मंत्रसाधन करून आपणांस केली पाहिजे.' असें म्हणून त्यानें आपल्याबरोबरच्या पिशवींतून पिंवळ्या तापत्याच्या कांहीं लांबलांब लंगोट्या काढिल्या व त्यांपैकीं एक त्यानें आपल्या कमरेला व दुसरी गळ्याला बांधिली. बाकीच्या त्यानें झेनजवळ देऊन त्यालाही तसेंच करण्यास सांगितलें. नंतर त्यानें सकलादीचे दोन लहान तुकडे जमिनीवर आंथरले व त्यांच्या कांठांवर नाना प्रकारचे हिरे, स्फटिक व कस्तुरी पसरली. त्यांपैकीं एकावर तो बसला व दुसऱ्यावर झेन बसला. नंतर तो झेनला म्हणाला, ' मी आतां मंत्रानें यक्षांच्या राजाला बोलावतों. ईश्वर करो व तो सौम्यरूप धारण करो! कारण त्याची तबियत फार लहरी आहे. आपण येथें आलों हें पाहून जर त्याला राग आला तर तो राक्षसाचें रूप घेऊन आपल्यासमोर येईल; व ती गोष्ट जर त्यास आवडली तर तो एकाद्या परम सुंदर पुरुषाचें रूप घेऊन येईल. तो आला कीं, तुम्ही उठून त्याला लवून मुजरा करा. मात्र ह्या सकलादीपलीकडे एक केसभर गेलां तर तुमचा नाश झालाच म्हणून समजा! तुम्ही त्याला म्हणा कीं, ' यक्षराज, आपला सेवक, जो माझा बाप, तो परमेश्वराकडे गेला. तेव्हां माझी अशी प्रार्थना आहे कीं, ज्याप्रमाणें आपण त्याचा सांभाळ केला त्याप्रमाणें माझाही करावा! त्यानें ' तुझें काय म्हणणें आहे?' असें विचारिलें तर तुम्ही म्हणा कीं, ' महाराज, तो तेवढा नववा पुतळा मला मिळावा एवढेंच माझें म्हणणें आहे.'

याप्रमाणें सांगून मुबारिक मंत्र म्हणूं लागला. त्याबरोबर विजेचा लखलखाट व मेघांचा गडगडाट होऊन सर्व प्रदेश अंधारमय होऊन गेला. सोसाट्याचा वारा सुटला व जमीन थरथरां कांपूं लागली. प्रलयकाळ होतो कीं काय, असें होऊन गेलें, त्यामुळें झेन घाबरून गेला. परंतु मुबारिकनें त्यास धीर दिला. इतक्यांत यक्षांचा राजा सुंदर मनुष्यरूप धारण करून तेथें आला. त्याला पाहतांच झेननें उठून मोठ्या नम्रतेनें मुजरा केला. तेव्हां यक्षराजा म्हणाला, 'मुला, तुझ्या बापावर माझी मोठी मर्जी होती. तो जेव्हां जेव्हां मला भेटावयास येई तेव्हां तेव्हां त्याला मी एक पुतळा बक्षीस देत असें. तुझ्यावरही माझी तितकीच प्रीति आहे. तुझा बाप मरण्यापूर्वी मला भेटावयास आला होता, त्या वेळीं मींच त्याला मुद्दाम साटिणीवर अक्षरें लिहून ठेवण्यास सांगितलें होतें; आणि त्याला असें वचन दिलें होतें कीं, 'तुला दिलेल्या आठ पुतळ्यांपेक्षांही सुंदर असा जो नववा पुतळा मजजवळ आहे तो मी तुझ्या मुलास देईन.' तुला स्वप्नांत दिसलेला वृद्ध मनुष्य मीच. मीं तुझ्या पित्याला दिलेल्या वचनानुसार तो नववा पुतळा तुला देईन. पण माझी एक अट आहे. ती अशी कीं, 'एक अत्यंत रूपवती अशी सोळा वर्षांची अविवाहित मुलगी मी तुम्हांस आणून देईन,' अशी तुला शपथ घेतली पाहिजे. तसेंच तुझ्या मनांत तिच्याविषयीं लोभ उत्पन्न होतां कामा नये.

झेननें कांहीं विचार न करितां ती गोष्ट करण्याविषयीं प्रथम शपथ घेतली. पण मग तो राजास म्हणाला, 'महाराज,

सुदैवेंकरून आपण म्हणतां तशी मुलगी सांपडली, तर तिच्या अंगीं दुसरे पाहिजे असलेले गुण आहेत कीं नाहींत हें कसें समजावें?' तेव्हां राजा म्हणाला, 'त्यासाठीं मी तुला एक आरसा देतों. तुला एकादी कुमारिका आढळली कीं, तूं त्या आरशांतून तिला पाहा. ती जर निर्दोष असेल तर आरसा स्वच्छ राहील, त्यावर डागबीग पडणार नाहींत व नसेल तर तो मळकट दिसूं लागेल. असो. तूं घेतलेली शपथ लक्षांत ठेव व आपले शब्द खरे करून दाखव. जर विसरलास तर मात्र माझी तुझ्यावर मोठी अवकृपा होईल.' त्यावर झेननें 'मी बोलल्याप्रमाणें वागण्यास कदापि चुकणार नाहीं' असें त्यास पुनः प्रतिज्ञापूर्वक सांगितलें.

नंतर त्या यक्षराजाकडून तो आरसा घेऊन व त्याचा निरोप घेऊन ते दोघे परत फिरले व त्या तलावापाशीं आले. तेथें तो कोळी होडी घेऊन तयार होताच. पूर्वीप्रमाणेंच त्यानें त्या दोघांस होडींतून पैलतीरास नेऊन पोहोंचविलें. आणि ते आपले घोडे व चाकर बरोबर घेऊन कैरो शहरास परत आले.

कांहीं दिवस तेथेंच राहिल्यावर झेननें मुबारिकच्या साह्यानें यक्षराजाकरितां मुलगी शोधण्यास सुरुवात केली. त्यांनीं कैरो शहरांतील सर्व मुली पाहिल्या. परंतु एकही पाहिजे तशी मिळाली नाहीं. नंतर ते बगदाद येथें जाऊन एक वाडा भाड्यानें घेऊन तेथें मोठ्या थाटामाटानें राहूं लागले. त्यांच्या घरीं गरीबगुरीबांस भोजन मिळूं लागलें व ते दानधर्मही

मोठ्या प्रमाणांत करूं लागले. ह्यामुळें लवकरच त्यांची कीर्ति शहरभर पसरली.

ते राहत होते त्याच पेठेंत आबूबेकर नांवाचा एक इमाम राहत असे. त्याला दुसऱ्याचें चांगलें कधीं पाहवत नसे. झेन हा मोठा श्रीमंत व उदार आहे हें ऐकून त्याला त्याचा हेवा वाटूं लागला. एके दिवशीं मशिदीमध्यें नमाज पढून झाल्यावर सर्व लोकांना त्यानें झेन याच्याविषयीं पुष्कळ खोट्यानाट्या गोष्टी सांगून त्यांचीं मनें त्याच्याविषयीं कलुषित करण्याचा प्रयत्न केला. त्या वेळीं मुबारिक तेथें होता. त्यानें तें सर्व ऐकून घेतलें व घरीं आल्यावर पांचशें मोहोरांची एक थैली व एक उंची कापडाचा बस्ता घेऊन तो आबूबेकर याच्या घरीं गेला व हात जोडून म्हणाला, 'इमामसाहेब, आपल्याच आळींत आपल्या कृपाछायेखालीं झेन राजा राहत आहे, त्याजकडून मी आलों आहें. आपली लोकोत्तर पवित्रता व सौजन्य ऐकून आपला परिचय व्हावा अशा इच्छेनें त्यांनीं ही अल्पशी भेट पाठविली आहे. तिचा स्वीकार करून त्यांच्यावर कृपादृष्टि ठेवावी अशी विनंती आहे.' तें ऐकून आबूबेकरला अत्यानंद झाला. तो म्हणाला, 'तर मग तुमच्या राजेसाहेबांचा मजकडून मोठाच अपराध घडला. मी उद्यां खास त्यांच्या भेटीस येऊन त्यांची क्षमा मागेन.'

दुसरे दिवशीं आबूबेकरनें मशिदींत नमाज पढणें झाल्यावर सर्वांस सांगितलें कीं, 'गृहस्थ हो, काल संध्याकाळीं मीं ज्या

गृहस्थाविषयीं तुम्हांस कांहीं सांगितलें त्याच्यासंबंधानें कोणीं दुष्टानें माझे कान फुंकले म्हणून मी तसें बोललों. वास्तविक तो फार सज्जन व सत्त्वशाली गृहस्थ असून मोठा उदार आहे.' याप्रमाणें झेनविषयींचा आदल्या दिवशींचा वाईट ग्रह दुसऱ्या दिवशीं आबूबेकरनें नाहींसा करून टाकिला व तो झेनच्या भेटीस गेला. झेननें त्याचा मोठा सत्कार केला. मग थोड्याशा औपचारिक गोष्टी झाल्यावर आबूबेकरनें विचारिलें, 'आपला येथें येण्याचा हेतु काय?' तेव्हां झेन यानें आपला हेतु त्यास सांगून त्याला एकादी कुमारिका माहीत आहे कीं काय असें विचारिलें. त्यानें माजी वजिराची मुलगी असल्याचें सांगितलें व झेनला तिच्या बापाकडे नेण्याचें कबूल केलें.

पुढें ठरल्या दिवशीं आबूबेकर झेनला घेऊन वजिराच्या घरीं गेला. त्यानें झेन याचें कुलशील व थोर पदवी ह्यांविषयीं वजिरास माहिती देतांच तो खूश झाला व त्यानें मुलीस बाहेर बोलाविलें आणि तिला बुरखा काढण्यास सांगितलें. तिचें तें अप्रतिम लावण्य पाहून झेन तिच्याकडे पाहत चित्रासारखा स्तब्ध राहिला. परंतु क्षणांत त्यानें आपलें मन आवरिलें आणि आपल्याजवळचा आरसा काढून त्यांत तिचें प्रतिबिंब पाहिलें. तों आरसा जशाचा तसा स्वच्छ राहिला. त्यावर यत्किंचित्‌ही डाग दिसला नाहीं.

याप्रमाणें मुलगी पूर्ण कसोटीस उतरल्यावर झेननें वजिरापाशीं तिची मागणी केली. त्यानें ती ताबडतोब मान्य करून लागलीच काजीला बोलाविलें व तेथल्या तेथेंच धार्मिक

लग्नविधि करविला. झेननें दुसऱ्या दिवशीं वजिरास मोठी थाटाची मेजवानी दिली व मुबारिकबरोबर मुलीस बहुमोल दागिन्यांची पेटी पाठवून तिला आपल्या घरीं आणविलें. नंतर मोठ्या थाटानें लग्नाचा सोहळा झाला. हें सर्व आटोपल्यावर मुबारिकनें झेनला यक्षांच्या राजाकडे जाण्याची आठवण दिली. झेनचें मन त्या मुलीवर अत्यंत बसलें असल्यामुळें तो कांकूं करूं लागला. परंतु मुबारिकनें त्याला दूरवर विचाराच्या गोष्टी सांगून ताळ्यावर आणिलें.

निघण्याची तयारी झाल्यावर ते त्या मुलीसह कैरो शहरीं पोहोंचले व तेथून लागलीच पुढें यक्षांच्या राजाच्या मुलखांत गेले. तेथें गेल्यावर ती मुलगी मुबारिक यास म्हणाली, 'आपलें राज्य अजून नाहीं का आलें ?' तेव्हां मुबारिकनें त्या मुलीस खरी हकीकत सांगितली. तो म्हणाला, 'मुली, झेन राजानें यक्षांच्या राजाला एक अत्यंत पवित्र स्त्री देण्याचें वचन दिलें होतें व त्याकरितां त्यानें तुला येथें आणिलें आहे. तुमचें लग्न झालें तें केवळ ढोंग आहे. तुझ्या बापानें एरवीं तुला आमच्या स्वाधीन केलें नसतें. त्यानें पुष्कळ मुली पाहिल्या. तूं एकच पाहिजे तशी मिळालीस. आतां तो तुला यक्षांच्या राजाच्या स्वाधीन करणार आहे.'

तें ऐकून ती बिचारी मुलगी घाबरून रडूं लागली. आपला व आपल्या बापाचा विश्वासघात केल्याबद्दल तिनें त्यांना फार फार दोष दिला. परंतु तिच्या म्हणण्याकडे लक्ष न देतां त्यांनीं तिला यक्षांच्या राजाच्या स्वाधीन केलें. तिला पाहतांच

त्याला मोठा आनंद झाला. तो म्हणाला, 'झेन, तूं आपला शब्द खरा केलास हें पाहून मला फार संतोष झाला. आतां तूं आपल्या घरीं जा. तेथें तळघरांत तुला नववा पुतळा तिवईवर उभा असलेला दिसेल. मी तो यक्षांकडून तेथें नेऊन ठेववितों.' तें ऐकून झेन यानें यक्षराजाचे फार आभार मानिले व त्याचा निरोप घेऊन ते परत कैरो शहरीं आले. तेथून झेन लागलाच निघून बसोरा शहरास गेला. तो नववा पुतळा केव्हां पाहीन असें त्यास झालें होतें. मात्र, त्या लावण्यवती स्त्रीचा विश्वासघात करून आपण तिला यक्षांच्या राजाच्या स्वाधीन केलें ही मोठी चूक केली, असें एकसारखें त्याच्या मनांत घोळत होतें.

तो बसोऱ्यास पोहोंचतांच प्रजाजनांनीं मोठा उत्सव करून त्याचें स्वागत केलें. वाड्यांत येतांच तो प्रथम आपल्या आईस भेटला व झालेली सर्व हकीकत त्यानें तिला सांगितली. त्याचा हेतु सिद्धीस गेल्याचें ऐकून तिलाही फार आनंद झाला. नंतर तीं दोघें तळघरांत गेलीं. पाहतात तों नवव्या तिवईवर पुतळ्याऐवजीं एक अतिलावण्यवती मुलगी त्यांच्या दृष्टीस पडली. त्यांना मोठें आश्चर्य वाटलें. त्यांतही, आपण यक्षांच्या राजाला दिली तीच ही मुलगी आहे हें झेनच्या लक्षांत आल्यावर तर त्यास पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें. तेव्हां ती मुलगी म्हणाली, 'महाराज, मला या ठिकाणीं पाहून आपणाला नवल वाटलें असेल यांत संशय नाहीं. आपणास आपल्या श्रमाच्या मानानें याहूनही मौल्यवान् वस्तु मिळावयास

पाहिजे होती.' झेन म्हणाला, 'छे छे, असें म्हणूं नको. माझ्या अंतःकरणांत काय आहे तें एक परमेश्वराला ठाऊक. तुझ्यावरून एकसा काय, शेंकडों पुतळे ओंवाळून टाकावे अशी तुझी योग्यता आहे. जगांतल्या सर्व संपत्तीपेक्षां मला तुझ्या सहवासाचें सुख अधिक प्रिय आहे.'

इतक्यांत एकाएकीं मेघगर्जना झाली. तें तळघर हालल्याचा भास झाला व तो यक्षांचा राजा तेथें प्रगट झाला. तो झेनच्या आईस म्हणाला, 'बाई, तुमच्या मुलाचें रक्षण करण्याचा मीं पत्कर घेतला आहे. माझी त्याच्यावर पूर्ण कृपा आहे. त्याला अल्पवयांत मनोविकार स्वाधीन ठेवतां येतात कीं नाहीं हेंच मला पाहावयाचें होतें. त्याच्या हातून दोष घडले तथापि ते मानवी स्वभावानुसारच होत.' नंतर तो झेनला म्हणाला, 'मुला, नववा पुतळा तो हाच. ह्या स्त्रीसह तूं सुखानें राज्य कर. हिच्याशिवाय सर्व स्त्रिया मातेसमान पूज्य मान. म्हणजे तुमचें प्रेम अखंड राहील.' असें सांगून तो अदृश्य झाला.

नंतर झेन यानें मोठा दरबार भरवून तिला आपली पट्टराणी केल्याविषयीं रयतेस जाहीर केलें. पुढें तिच्यासह त्यानें पुष्कळ वर्षं सुखानें राज्य केलें.

१२

# आंब्यानें केलेला अनर्थ

बगदाद शहरांत कालीफ हारून अल्‌रशीद् हा मोठा प्रजावत्सल बादशाह राज्य करीत होता. तो रात्रीं नेहमीं वेष पालटून शहरांत गस्त घालीत असे. एके रात्रीं असाच तो गस्तीस निघाला होता. त्याजबरोबर त्याचा वजीर जाफर व जनानखान्यावरील अधिकारी मश्रूर हे होते. जातांना वाटेंत त्यांना एक म्हातारा भेटला. तो उंच असून त्याची दाढी पांढरी व लांब होती. त्याच्या डोक्यावर एक पाटी व खांद्यावर मासे धरण्याचें जाळें होतें, व हातांत एक लांब काठी होती. त्याची चौकशी करण्यास बादशाहानें वजिरास सांगितलें, म्हणून वजिरानें त्याला विचारलें, 'म्हातारेबावा, कोणीकडे चाललां? आपण काय उद्योग करतां?' म्हातारा म्हणाला, 'मी मासे धरणारा आहें. माझी स्थिति अत्यंत गरिबीची आहे. आज दोन प्रहरांपासून मी नदीवर मासे पकडीत बसलों होतों; परंतु एकही मासा मिळाला नाहीं. माझ्या घरीं बायको व पांच सहा मुलें आहेत. आणि माझें नशीब तर

हें असें माझ्या पाठीस हात धुऊन लागलें आहे. आतां पोट कसें भरावें ह्या मोठ्या फिकिरींत मी पडलों आहें.'

त्याचें तें दीनवाणें बोलणें ऐकून बादशाहास दया आली. तो म्हणाला, 'गड्या, तूं पुनः एकदां आमच्याबरोबर नदीवर चल व एक वेळ नदींत जाळें टाक. आमच्या दैवानें जें कांहीं मिळेल तें घेऊन आम्ही त्याबद्दल तुला शंभर मोहरा देऊं. चलतोस का?' बादशाहाच्या ह्या भाषणानें त्या म्हाताऱ्याला फार आनंद झाला. हे गृहस्थ थोर दिसतात; हे आपणांस फसवणार नाहींत; असा मनांत भरंवसा धरून तो त्यांज-बरोबर नदीवर गेला.

तैग्रीस नदीच्या कांठीं आल्यावर त्यानें आपलें जाळें नदींत टाकिलें व कांहीं वेळानें वर काढिलें. पाहतो तों, जाळ्यांतून एक भली मोठी पेटी वर आली होती. मग बादशाहानें ठरल्याप्रमाणें त्या म्हाताऱ्यास शंभर मोहरा देवविल्या व ती पेटी मश्रूरच्या खांद्यावर देऊन वजिरा-सह तो राजवाड्यांत परत आला. पेटींत काय आहे हें पाहण्याची त्यास अत्यंत उत्कंठा लागल्यामुळें त्यानें ती पेटी दिवाणखान्यांत आणवून फोडविली. तेव्हां तींतून खजुरीच्या पातींच्या चटईत बांधलेलें एक गांठोडें निघालें. चटईचीं टोंकें तांबड्या मजबूत दोऱ्यानें शिवलेलीं होतीं. तीं सुरीनें तोडून चटई फाडून पाहतात तों आंत एक जुन्या सतरंजीचें वेष्टण होतें. तें उघडतात तों आंत एका स्त्रीचें प्रेत दृष्टीस पडलें. ती स्त्री अत्यंत सुंदर व तरुण होती; पण तिच्या शरीराचे

तुकडे तुकडे केलेले होते. हा भयंकर प्रकार पाहून बादशाहास प्रथम मोठें आश्चर्य वाटलें; परंतु एका क्षणांत तें नाहींसें होऊन त्याला वजिराचा अत्यंत क्रोध आला. डोळे वटारून त्याकडे पाहून तो म्हणाला, ' दुष्टा, अधमा, माझ्या रयतेचा तूं असा बंदोबस्त ठेवतोस का ? तुझ्या अमलांत खुनी लोक निर्धास्तपणें माझ्या गरीब प्रजेचा जीव घेतात आणि तूं खुशाल घरीं मौजा मारतोस ? हें सर्व पाप माझ्या माथीं पडतें. ह्याचा जाब मी ईश्वरापुढें कसा देऊं ? तर पाहा, ह्या स्त्रीचा खून करणाऱ्या दुष्टाचा शोध लावून त्याला तीन दिवसांच्या आंत माझ्यासमोर शासन करण्यासाठीं न आणिलेंस तर मी तुला व तुझ्या घराण्यांतल्या चाळीस माणसांना राजवाड्यासमोर सुळावर चढवीन. असें न करीन तर मला परमेश्वराची शपथ आहे !' ती आज्ञा ऐकून वजीर मोठ्या दुःखी अंतःकरणानें घरीं गेला.

तीन दिवस त्यानें कोतवाल व इतर अधिकारी ह्यांच्या साह्यानें गुन्हेगाराचा शोध लावण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न करून पाहिला. पण यत्किंचितही पत्ता लागला नाहीं. चौथा दिवस उजाडतांच कालिफानें वजिरास बोलावून नेलें आणि ' गुन्हेगार सांपडला कीं नाहीं ?' असा त्यास प्रश्न विचारला. तेव्हां वजिरानें डोळ्यांत पाणी आणून सांगितलें, ' महाराज, मीं आपली शिकस्त केली, परंतु अपराधी सांपडला नाहीं.' तें ऐकून बादशाहाला अत्यंत संताप आला व त्यानें वजीर जाफर व त्याच्या घरचीं चाळीस

माणसें ह्यांना सुळावर चढविण्याचा हुकूम केला. तसेंच हें दृश्य पाहण्यास लोकांनीं यावें म्हणून त्यानें गांवांत दवंडी पिटवून लोकांना जाहीर केलें.

राजवाड्यापुढें लोकांची अतिशय गर्दी जमली. वजीर व त्याचे भाऊबंद हे फार सज्जन व उदार असल्यामुळें व त्यांनीं लोकांवर फार उपकार केले असल्यामुळें, सर्व लोकांना त्यांच्या विषयीं फार हळहळ वाटत होती. शेवटीं कोतवाल राजाचा कडक हुकूम बजावणार, इतक्यांत काय चमत्कार झाला कीं, भोंवतालच्या गर्दीतून एक तरुण पुरुष लोटालोटी करीत मोठ्या त्वरेनें वजिरापाशीं आला व म्हणाला, ' वजीरसाहेब, आपण फार थोर व गरिबांचे पोशिंदे आहां. हा गुन्हा मीं केला आहे. तेव्हां आपण बाजूस व्हावें व मला शिक्षा भोगूं द्यावी. ज्या स्त्रीचा मुर्दा तैग्रीस नदींत बादशाहास सांपडला, तिचा खून मींच केला आहे. '

हें त्याचें भाषण ऐकून वजिरास आपला जीव वांचल्या-बद्दल आनंद झाला; तथापि त्या तरुण मनुष्याच्या मुद्रेवरून तो इतका दुष्ट असेल असें त्यास वाटेना. म्हणून तो त्याच्याशीं कांहीं बोलणार इतक्यांत पुनः गर्दीतून वाट काढीत एक म्हातारा पुढें आला व तो वजिरास म्हणाला, ' महाराज, आपण ह्या मुलाचें म्हणणें अगदीं खरें मानूं नये. त्या बाईचा खून मीं केला आहे. करितां मलाच शिक्षा मिळणें योग्य आहे. ' तेव्हां तो तरुण मनुष्य म्हणाला, 'सरकार, मी शपथ वाहून सांगतों कीं, हें कृत्य माझें एकट्याचेंच आहे. मलाच शिक्षा मिळणें

न्याय्य आहे.’ म्हातारा म्हणाला, ‘अरे मुला, तूं दुःखानें वेडा होऊन उगाच कां मरत आहेस? मी म्हातारा झालों आहें. मी मेलों तर त्यांत कांहीं वाईट नाहीं. तेव्हां मलाच तुझ्या जागीं मरूं दे.’

याप्रमाणें त्या दोघांचें भांडण लागल्यामुळें वजिरास तें प्रकरण कालिफाकडे नेणें योग्य वाटलें व त्यानें कोतवालाच्या परवानगीनें त्या दोघांस कालिफासमोर नेऊन उभें केलें. नंतर चालीप्रमाणें सात वेळ नमस्कार करून त्यानें विनंती केली कीं, ‘सरकार, हे दोघेही त्या स्त्रीचा खून आपण केला असें म्हणत आहेत, म्हणून ह्यांस हुजूरच्या पायांपाशीं आणिलें आहे.’ तेव्हां कालिफानें स्वतः त्यांस विचारिलें कीं, ‘तुमच्यापैकीं खरोखर खून करणारा कोण?’ तो तरुण म्हणाला, ‘खुदावंत, मी स्वतः निर्दयपणें त्या स्त्रीचा खून करून तिचा मुर्दा तैग्रीस नदींत टाकिला.’ म्हातारा म्हणाला, ‘छे, छे, सरकार, मींच टाकिला.’ त्या दोघांपैकीं कोणीच ऐकेना असें पाहून, कालिफानें दोघांसही सुळीं देण्यास फर्माविलें. तेव्हां वजीर म्हणाला, ‘सरकार, जर एकानेंच खरा गुन्हा केला असला, तर दुसऱ्याचा जीव घेणें अन्यायाचें होईल.’

वजीर इतकें बोलत आहे तोंच तो तरुण म्हणाला, ‘दयावंत महाराज, सर्व दुनियेचा निर्माणकर्ता जो परमेश्वर त्याची शपथ घेऊन मी सांगतों कीं, त्या स्त्रीचा वध करून तिचे तुकडे तुकडे करून ते मीं नदींत टाकिले. हें जर खोटें असेल तर न्यायाच्या दिवशीं ईश्वर मला पापाची क्षमा करणार

नाहीं. तेव्हां मलाच शिक्षा होणें रास्त आहे.' ह्यावर म्हातारा कांहींच बोलला नाहीं. म्हणून कालिफास तें म्हणणें खरें वाटलें व त्यानें त्याला विचारिलें, 'अरे हतभाग्या, चांडाळा, अगोदर तूं असलें भयंकर कृत्य केलेंस कां? आणि इतक्या लवकर त्याबद्दल तुला पश्चात्ताप होऊन शिक्षा भोगण्यास पुढें आलास कां?' त्या तरुणानें उत्तर दिलें, 'सद्धर्मपालक-महाराज, ह्या स्त्रीचा व माझा संबंध आल्यापासून इतक्या विलक्षण गोष्टी घडून आल्या आहेत कीं, त्या सर्व एकत्र केल्या तर त्यांचा एक लोकोपयोगी ग्रंथ होईल.' कालिफ म्हणाला, 'असें आहे तर तो सर्व वृत्तांत आम्हांस सांग.' तेव्हां तो तरुण आपली हकीकत सांगूं लागला. तो म्हणाला, 'महाराज, ज्या स्त्रीचा मीं खून केला, ती माझी बायको व ह्या म्हाताऱ्याची मुलगी. अकरा वर्षांपूर्वी ह्यानें माझ्याशीं तिचें लग्न करून दिलें. तिच्यापासून मला तीन मुलगे झाले. ईश्वरकृपेनें ते सर्व जीवंत आहेत. माझी बायको फार चतुर व सुशील असून माझी मर्जी राखण्यासाठीं सदैव तत्पर असे. माझें तिच्यावर फार प्रेम होतें. तिची प्रत्येक इच्छा पुरी करण्याचा मी आटोकाट प्रयत्न करीत असें. सुमारें दोन महिन्यांपूर्वी ती आजारी पडली. त्या दुखण्यांत मीं तिची सेवाशुश्रूषा पुष्कळ केली व पैसाही पुष्कळ खर्च केला. एक महिन्यानंतर तिला थोडा आराम पडला. एकदां ती मला म्हणाली, 'मला आंबे खावेसे वाटतात. तेव्हां कांहींही करून तुम्ही मजकरितां आंबे घेऊन या. माझी वासना इतकी

तीव्रतेला पोंचली आहे कीं, ती लवकर पुरी न झाल्यास पुनः माझी तब्येत बिघडेल कीं काय असें वाटतें.' तेव्हां मीं तिला उत्तर दिलें कीं, 'तुझी इच्छा पूर्ण करण्याचा मी माझ्याकडून पराकाष्ठेचा प्रयत्न केल्यावांचून राहणार नाहीं.'

नंतर मी आंब्यांच्या शोधार्थ निघालों. बाजारांतील दुकान नी दुकान धुंडलें. एका आंब्यास एक रुपया द्यावयास तयार झालों, परंतु उपयोग झाला नाहीं. शेवटीं एका म्हाताऱ्या माळ्यानें सांगितलें कीं, 'तुम्हांला बसोऱ्याच्या राजाच्या बागेंत आंबे मिळतील. त्याशिवाय इतर कोठेंही मिळणार नाहींत. कारण हा आंब्यांचा हंगाम नाहीं.' ती बातमी ऐकून मला फार आनंद झाला. माझ्या आवडत्या बायकोची इच्छा पूर्ण करण्याचा माझ्या मनाला ध्यास लागला होता. म्हणून मी घरीं बायकोला कळवून बसोऱ्यास गेलों व पंधराव्याच दिवशीं परत आलों. तेथें मला राजाच्या बागेंत तीन आंबे मिळाले. पण एकेका आंब्यास एक एक मोहोर द्यावी लागली. मी जरी पंधराच दिवसांत परत आलों तरी त्या अवधींत माझ्या बायकोची वासना आपोआप नाहींशी झाली होती व मीं ते तीन्ही आंबे तिला दिले तरी त्यामुळें तिला फारसा आनंद झाला नाहीं. तिनें ते एकीकडे ठेवून दिले. तिची प्रकृति चांगली बरी झालीच नव्हती. ती सुधारण्यास काय उपाय करावा हें मला कांहीं सुचेना.

एके दिवशीं मी कापडबाजारांत आपल्या दुकानांत बसलों असतां रस्त्यानें एक काळा उंच दास जात होता. त्याच्या

हातांत एक आंबा होता. तो आंबा मी बसोऱ्याहून आणिलेल्या आंब्यांपैकींच असावा अशी मला जबरदस्त शंका आली. म्हणून मी त्या दासाला हांक मारून विचारिलें कीं, 'भल्या माणसा, हा आंबा तुला कोठें मिळाला ?' त्यानें हसत हसत उत्तर दिलें, ' माझ्या मैत्रिणीची प्रकृति बिघडली होती, म्हणून तिला मी भेटावयास गेलों होतों. तिनें मला हा भेट म्हणून दिला. तिच्या घरीं आणखी असे दोन आंबे आहेत !'

हें ऐकून माझ्या मनांत शंकांचें भयंकर काहूर माजलें. मी तावडतोब दुकान बंद करून घरीं आलों आणि तडक बायकोच्या खोलींत जाऊन आंबे पाहिले. तों दोनच आंबे माझ्या दृष्टीस पडले. मीं बायकोला विचारलें, ' तिसरा आंबा कोठें आहे ? ' तिनें आंबे पडले होते तिकडे वळून पाहिलें व तेथें दोनच आंबे आहेत असें दिसल्यावर उत्तर दिलें, ' मला नाहीं ठाऊक काय झाला तो. ' ह्या बेपर्वाईच्या उत्तरावरून माझी खात्री झाली कीं, दासानें सांगितलेली हकीकत खरी असून माझी बायको माझ्याशीं बेइमानीपणानें वागते. त्यामुळें मला इतका त्वेष आला कीं, त्याच्या सपाट्यांत मी बेफामपणें कमरेची कट्यार काढून तिच्या छातींत खुपसली आणि तिच्या शरीराचे तुकडे तुकडे करून ते एका सतरंजींत गुंडाळले व वरून एक चटईचें वेष्टन शिवून तें गांठोडें एका पेटींत घातलें आणि काळोख पडल्यावर ती पेटी तैग्रीस नदींत नेऊन टाकिली. '

' त्या वेळीं माझीं धाकटीं दोन मुलें निजलीं होतीं व तिसरा मोठा मुलगा बाहेर गेला होता. मी परत आलों तेव्हां तो

दरवाजांत रडत बसला होता. मीं त्यास रडण्याचें कारण विचारिलें. तेव्हां तो म्हणाला, ‘ बाबा, तुम्हीं गांवाहून आणलेल्या आंब्यांपैकीं एक आंबा आईच्या नकळत मीं आज दुपारीं घेतला व त्याच्याशीं रस्त्यांत खेळत होतों. इतक्यांत वाटेनें एक मोठा काळा दास आला व माझ्या हातून आंबा हिसकून घेऊन चालता झाला. तो परत मागत मी त्याच्या पाठोपाठ पुष्कळ लांब गेलों. ‘ माझी आई दुखणेकरी आहे. तिच्याकरितां बाबांनीं फार लांबून तीन आंबे आणिले आहेत. त्यांतला हा आहे म्हणून तो मला परत दे, ’ असें मीं त्यास पुष्कळ सांगितलें. परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं.

‘ माझ्या मुलाच्या तोंडून ही हकीकत ऐकतांच मला इतका खेद झाला कीं, सांगतां येत नाहीं. माझी तावडतोब खात्री पटली कीं, मुलानें सांगितलेल्या माहितीवरून त्या दुष्ट दासानें खोटी गोष्ट रचून मला सांगितली व मीं मूर्खानें कांहीं एक विचार न करितां ती खरी मानून अत्यंत घोर हत्या केली. याप्रमाणें मला अत्यंत पश्चात्ताप होऊन मी दुःखी मनानें बसलों असतां, हे माझे सासरे आपल्या मुलीच्या समाचारास आले. त्यांना मीं घडलेला सर्व वृत्तांत, कांहींएक चोरून न ठेवितां, सांगितला आणि स्वतःची खूप निर्भर्त्सना केली. परंतु हा सज्जन गृहस्थ माझी निंदा न करितां मजबरोबर शोक करूं लागला. याप्रमाणें आज तीन दिवस आम्ही शोक करीत बसलों होतों, तोंच आपली दवंडी ऐकिली व दयाळु वजीर-

साहेबांचा जीव वांचविण्याकरितां मी आपला गुन्हा कबूल करण्यास पुढें आलों.'

'हे राजाधिराज, मीं सर्व खरी हकीकत आपल्या पायांपाशीं निवेदन केली आहे. तीवरून आपली खात्री होईल कीं, गुन्हा मीं केला व मलाच शिक्षा मिळणें रास्त आहे. कोणतीही कडक शिक्षा मला दिली तरी ती भोगण्यास मी तयार आहें.'

पातशाहाला ही हकीकत ऐकून पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें. तथापि तो मोठा विचारी व न्यायी होता. त्याच्या मनांत आलें कीं, हा मनुष्य शिक्षेपेक्षां दया करण्यास अधिक पात्र आहे. म्हणून तो म्हणाला, 'या मनुष्याचें कृत्य ईश्वराचे दृष्टीनें क्षमा करण्यास योग्य आहे. तेव्हां मीं मानवानें त्याला क्षमा करण्यास कांहीं हरकत नाहीं. ह्या गुन्ह्याचा वास्तविक दोष त्या दासाकडे जातो. त्यालाच शिक्षा होणें योग्य आहे.' असें म्हणून तो वजिरास म्हणाला, 'वजीर, मी तुला तीन दिवसांची मुदत देतों. तितक्या अवधींत त्या दुष्ट दासास माझ्यापुढें हजर कर, नाहींतर त्याच्या जागीं तुला मरणाची शिक्षा भोगावी लागेल.'

बिचाऱ्या वजिराला आपला जीव बचावल्याबद्दल नुकताच आनंद झाला होता. परंतु बादशाहाची ही आज्ञा ऐकून तो पार मावळला. तीन दिवस त्यानें पराकाष्ठेच्या दुःखांत घालविले. चौथ्या दिवशीं बादशाहाकडून एक अधिकारी आला व त्यानें सांगितलें कीं, 'त्या काळ्या दासाचा आपण अद्याप कांहींच

शोध केल्याचें समजलें नाहीं. ह्यामुळें सरकारची आपल्यावर फार इतराजी झाली आहे व त्यांनीं आपणास तावडतोब वाड्यांत बोलाविलें आहे.' बिचारा वजीर कपडे करून त्या अधिकाऱ्याबरोबर जावयास निघाला. इतक्यांत त्याची पांचसहा वर्षांची धाकटी मुलगी त्याला भेटवावयास कुणबिणींनीं आणिली.

त्या मुलीवर त्याचें अतिशय प्रेम होतें. त्या अधिकाऱ्याच्या अनुमतीनें त्यानें आपल्या मुलीला उचलून पोटाशीं धरलें व तिचे पुष्कळ मुके घेतले. इतक्यांत तिच्या खिशांत कांहीं मोठा व कठीण पदार्थ त्याच्या हातास लागला. त्याला वास येत होता. त्यानें विचारिलें, 'बेटा, तुझ्या खिशांत काय आहे?' ती म्हणाली, 'बाबा, माझ्या खिशांत एक आंबा आहे. त्यावर आपले धनी बादशाह यांचें नांव आहे. आपला दास रिहान ह्यानें मला तो दोन मोहोरांना विकत दिला.'

आंबा आणि दास हे शब्द ऐकतांच वजिरास अत्यंत आनंद झाला. त्यानें तावडतोब मुलीच्या खिशांतून तो आंबा काढिला व त्या दासास बोलावून आणिलें. तो आल्यावर वजिरानें त्यास विचारिलें, 'काय रे, हा आंबा तूं कोठून आणिलास?' दासानें उत्तर दिलें, 'वजीरसाहेब, मी शपथ घेऊन सांगतों कीं, हें फळ मीं चोरून आणिलें नाहीं. दोन चार दिवसांपूर्वीं मी रस्त्यांतून जात असतां एका ठिकाणीं कांहीं पोरें खेळत होतीं. त्यांपैकीं एकाच्या हातांत हा आंबा होता. तो त्याच्या हातून मीं हिसकावून घेतला. त्या पोरानें

माझी पुष्कळ विनवणी केली. तो म्हणाला, 'हा आंबा माझ्या आईचा आहे. ती आजारी आहे. तिच्याकरितां बाबांनीं पुष्कळ लांबून असे तीन आंबे आणिले आहेत; मी हा नकळत घेतला असल्यामुळें आई मजवर रागावेल. तेव्हां तो मला परत दे.' परंतु त्याच्याकडे लक्ष न देतां त्यास झुकांडी देऊन आलों व तो आंबा मी धाकट्या ताईसाहेबांना विकला.'

केवळ ह्या दासाच्या लुच्चेगिरीनें त्या स्त्रीचा प्राण गेला व आपलाही जीव जाण्याच्या बेतांत होता, हें मनांत येऊन वजिरास मोठा राग आला. तो ताबडतोब त्यास घेऊन बादशाहाकडे गेला व त्यानें सर्व मजकूर त्यास विदित केला. आतां आपल्याला भयंकर शिक्षा होणार ह्या भीतीनें तो दास कांपूं लागला. त्यानें बादशाहापुढें साष्टांग नमस्कार घातला. तो म्हणाला, 'खुदावंत, त्या आंब्याच्या मोहामुळें माझ्या हातून हा अपराध घडला, त्याबद्दल मला क्षमा करावी.' बादशाह विचार करून म्हणाला, 'तुझें म्हणणें खरें आहे. त्या आंब्यानेंच हा सगळा अनर्थ केला.' नंतर त्यानें त्या सर्वांनाच क्षमा केली.

BVBK-0402041